
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, १२ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारतीयत्व, धर्म, धर्मराज्य, राष्ट्रवाद आणि अंत्योदय या संकल्पनांद्वारेच भारत विश्वगुरुपदी पोहोचू शकतो. सर्वांसाठी शिक्षण आणि प्रत्येक हाताला काम, प्रत्येक शेतीला पाणी या दृष्टिकोनातून लोकशाही आर्थिक व्यवस्थेत आत्मनिर्भर होण्याचा मार्ग प्रशस्त केला जाऊ शकतो.
- पं. दीनदयाल उपाध्याय
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

## आज बुद्धपौर्णिमा






रविवारी पत्रकार परिषद घेऊन तिन्ही सेनादलांच्या डीजीएमओंनी ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली.

# शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्यास कठोर प्रहार

## भारताने पाकिस्तानला ठणकावले

- ७ मे च्या कारवाईत १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार
- ९ आणि १० मे च्या रात्री घनघोर लढाई
- फक्त सीमेवरच ३५ ते ४० पाकिस्तानी सैनिक ठार
- पाकिस्तानच्या अनेक हवाईतळांचे नुकसान
- पाकिस्तानचे एकही विमान भारतीय सीमेत घुसू शकले नाही
- भारताचे सर्व पायलट सुरक्षित परतले
- तीन दिवसांचा संघर्ष युद्धापेक्षा कमी नव्हता
- ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचे पाच जवान हुतात्मा

### ८ आणि ९ मे च्या रात्री घनघोर संघर्ष



८ आणि ९ मे च्या रात्री दोन्ही बाजूंनी घनघोर संघर्ष उडाला. पाकिस्तानने ड्रोन आणि मानवरहित हवाई वाहनांनी श्रीनगरपासून तर गुजरातच्या भूजपर्यंत भारतीय शहरांवर हल्ले केले. पण, आम्ही तयारीतच होतो. रात्री ८.३० नंतर केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देताना पाकिस्तानचे प्रचंड नुकसान केले. त्यांचा प्रत्येक हल्ला परतवून लावला. त्यानंतर आम्ही त्यांचे सैन्यतळ आणि हवाई तळांना लक्ष्य केले. त्यांचे एकही विमान भारतीय सीमेत प्रवेशही करू शकले नाही. याउलट आमचे सर्व पायलट सुरक्षित परतल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.


◆ नवी दिल्ली, ११ मे

पाकिस्तानने काय करावे आणि काय करू नये, हे आमच्या हाती नाही. पण, भविष्यात आमच्या शेजाऱ्याने शस्त्रसंधींचे उल्लंघन केल्यास कठोरातील कठोर लष्करी कारवाई केल्या जाईल, असा थेट इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती देण्यासाठी रविवारी तिन्ही सेनादलांच्या डीजीएमओंनी पत्रकार परिषद घेतली. यामध्ये लेफ्टनंट जनरल राजीव घई, एअर मार्शल ए.के. भारती आणि व्हाईस ॲडमीरल ए.एन. प्रमोद सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूर म्हणजे भारतीय सेनादलांच्या शौर्याचे प्रतीक ठरले, असेही वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी सांगितले.

पहलगाम हल्ल्यानंतर केवळ दहशतवादी तळ नष्ट करण्याचा निर्णय घेऊन ७ मे रोजी व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे ९ तळ उध्वस्त केले. या कारवाईत शंभरपेक्षा जास्त दहशतवादी ठार तर शेकडो जखमी झाले. यामध्ये पुलवामा हल्ला आणि कंदहार विमान अपहरण कांडातील यूसूफ अजहर, अब्दुल मलिक रौफ आणि मुदस्सीर अहमद या कुख्यात दहशतवाद्यांचा समावेश आहे. नागरी वस्त्या अथवा लष्करी तळांना लक्ष्य करण्याचे आमचे उद्दिष्ट नव्हते. आम्ही दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली पण पाकिस्तानने गोळीबार आणि घुसखोरी करीत शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. याला भारताने जोरदार प्रत्युत्तर देत पाकिस्तानचे अनेक हवाई तळ जमीनदोस्त केले तर काही तळांचे जबर नुकसान झाले.

भारताने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात खोलवर घुसून केलेल्या कारवाईनंतर घाबरलेल्या पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन करीत नागरीक, गावे आणि धार्मिक स्थळांना लक्ष्य केले ज्यात काही नागरिकांचा मृत्यू झाला, असे ए.के. भारती यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### तीन तासांत ११ हवाई तळांवर हल्ले



पाकिस्तानच्या ड्रोन्स आणि क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर ९ मे च्या रात्री भारताने अवघ्या तीन तासांत पाकिस्तानच्या अकरा हवाई तळांवर हल्ले चढविले. यामध्ये नूर खान , रफिकी, मुरिद, सुक्कूर, सियालकोट, पसरूर, चुनिया, सरगोधा, सकरू, भोलारी आणि जाकोबाबाद हवाई तळांचा समावेश आहे. सरगोधा आणि भोलारा येथील तळावंर एफ-१६ आणि जेएफ-१७ ही लढाऊ विमाने उभी होती. भोलारी तळावर तर ५० पेक्षा जणांचा मृत्यू झाला आणि अनेक विमाने नष्ट झाल्याचे एअर मार्शल भारती यांनी सांगितले.

### पाकिस्तान आला चर्चेसाठी पळत

भारताने थेट रावळपिंडी, लाहोरमध्ये कठोर आणि निर्णायक हल्ले चढविल्यानंतर घाबरलेल्या पाकिस्तानने चर्चेची तयारी दर्शविली. प्रचंड नुकसान होत असल्याने पाकिस्तानच्या डीजीएमओंनी भारताच्या डीजीएमओंना १० तारखेला दुपारी ३.३५ ला फोन केला. यावेळी ते प्रचंड घाबरले होते, असे राजीव घई यांनी सांगितले.

## 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच राहणार

◆ नवी दिल्ली, ११ मे

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव कमी करण्यासाठी शनिवारी सायंकाळी युद्धबंदीची घोषणा करण्यात आली. पण, आता पाकिस्तानसोबत युद्धविराम जाहीर झाल्यानंतर भारतीय हवाई दलाने त्यांचे समाज माध्यम खाते एक्सवर पोस्ट लिहित म्हटले की, आम्ही लक्ष्य साध्य केले असून, 'ऑपरेशन सिंदूर' अजूनही सुरू आहे आणि येत्या काळात यासंबंधी अधिक माहिती दिली जाईल.

हवाई दलाने पुढे म्हटले की, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत नेमून दिलेली सर्व कामे अचूकतेने आणि जबाबदारीने यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत. ही कारवाई देशाच्या हिताच्या अनुषंगाने विचारपूर्वक आणि काळजीपूर्वक पार पाडण्यात आली. ही कारवाई अजूनही सुरू असल्याने त्याची संपूर्ण माहिती लवकरच दिली जाईल. हवाई दलाने लोकांना कुठल्याही प्रकारची अफवा टाळण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान पाकिस्तानच्या आवाहनावरून दोन्ही देशांमध्ये युद्धबंदी लागू करण्यात आली. पण, तीन तासांच्या आत पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि जम्मू-काश्मीरसह अनेक ठिकाणी ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागली. पाकिस्तानच्या या कृत्याला भारतानेही चोख प्रत्युत्तर दिले आणि सर्व क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हाणून पाडले. मात्र, शनिवारी रात्री १० वाजल्यानंतर पाकिस्तानकडून कोणतीही हालचाल दिसली नाही. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### एप्रिलमध्ये एसआयपी योगदान विक्रमी पातळीवर

**मुंबई** : एप्रिल २०२५ मध्ये एसआयपी योगदानाने २६,६३२ कोटींचा विक्रमी उच्चांक गाठला. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (एएमएफआय) ने जारी केलेल्या आकडेवारीत ही माहिती देण्यात आली आहे. एएमएफआयच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२५ मध्ये भारताच्या म्युच्युअल फंड उद्योगाने विक्रमी सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन



(एसआयपी) योगदान नोंदवले. ज्यामध्ये एकूण आवक २६,६३२ कोटींवर पोहोचली, जी कोणत्याही एका महिन्यातील आतापर्यंतची सर्वाधिक आहे. एप्रिलमध्ये १.३६ कोटी एसआयपी खाती बंद करण्यात आली किंवा मॅच्युअर झाली. असे असूनही, योगदान देणाऱ्या खात्यांची संख्या मार्चमध्ये ८.११ कोटींवरून ८.३८ कोटींवर पोहोचली आहे. हे दीर्घकालीन संपत्ती निर्मितीमध्ये गुंतवणूकदारांची सततची आवड दर्शवते. एप्रिलमध्ये ४६ लाख नवीन एसआयपी खाती जोडण्यात आली. तर गेल्या महिन्यात मार्चमध्ये ४०.१९ लाख खाती जोडली गेली.

## पाककडून गोळी चालवल्यास आमच्याकडून तोफगोळा चालेल!

### पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानला इशारा

◆ नवी दिल्ली, ११ मे

'ऑपरेशन सिंदूर' सुरू झाल्यापासून पंतप्रधान मोदी यांच्याकडून कोणते वक्तव्य येणार याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. अखेर पंतप्रधानांनी पाकला ठणकावत, गोळी चालवाल तर तोफगोळे चालवले जातील, अशा शब्दात सुनावले आहे. एवढेच नाही तर कोणत्याही कारवाईसंदर्भात भारताला



कोणाचीही मध्यस्थी मान्य नाही, असेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही, असे म्हटले आहे. पाकिस्तानने जर पुन्हा गोळीबार केला तर आम्ही देखील गोळीबार करू आणि जर त्यांनी हल्ला केला तर आम्ही देखील त्यांना चोख प्रत्युत्तर देऊ, असे स्पष्टच सांगितले आहे. रविवारी झालेल्या तिन्ही दलाच्या बैठकीदरम्यान पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला थेट इशाराच दिला आहे. तिथून गोळ्या झाडल्यास, येथून तोफगोळे झाडले जातील, असा इशारा मोदींनी पाकिस्तानला दिला आहे की. तसेच ऑपरेशन सिंदूरमधील पाकिस्तानमधील हवाई तळांवरील हल्ले हा महत्त्वाचा टप्पा असल्याचेही पंतप्रधान मोदी यांनी म्हटल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. (वृत्तसंस्था)

## आमच्यावर पहिला हल्ला भारताने केला

### पाकिस्तानी लष्कराचा दावा, पत्रपरिषद घेऊन मांडली भूमिका

◆ इस्लामाबाद, ११ मे

पाकिस्तानने भारतावर हल्ला अजिबात केलेला नाही. भारताने पहिला हल्ला केला आणि आम्ही केवळ स्वसंरक्षणार्थ त्याला प्रत्युत्तर दिले. भारताने आम्हाला हरवण्याचा विचार सोडून द्यावा, अशी दर्पोक्ती पाकिस्तानी लष्कराने केली आहे.

एकीकडे भारतीय सैन्याच्या तिन्ही प्रमुखांची पत्रकार परिषद झाली त्यापाठोपाठ पाकिस्तानी लष्करानेही पत्रपरिषद घेतली. पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी आज



म्हणजेच रविवारी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, भारताला माहित नाही का की आपण एक अणुशक्ती आहोत. पाकिस्तान स्वसंरक्षणार्थ हल्ला करतो. पाकिस्तानला त्याचे हक्क समजतात.

चौधरी म्हणाले की, भारतीय सैन्य स्वप्न पाहत आहे, की ते पाकिस्तानी सैन्याला पराभूत करू शकतात. भारताला योग्य उत्तर दिले जाईल. पाकिस्तानी सैन्य आणि जनता पूर्णपणे तयार आहे.

पाकिस्तानने आज भारताविरुद्धच्या ऑपरेशन बनायन-उम-मर्सूसचा यूम-ए-तशक्कूर (धन्यवाद दिन) साजरा केला. चार दिवसांच्या संघर्षानंतर काल भारत आणि पाकिस्तानी सैन्यात युद्धबंदी जाहीर करण्यात आली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्विट करून याबद्दलची माहिती सर्वप्रथम दिली.

शनिवारी संध्याकाळी ५:३० वाजता युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर तीन तासांनी, भारताने युद्धबंदीचे उल्लंघन केल्याचा दावा पाकिस्तानने केला. पाकिस्तानचा दावा आहे की, हवाई संरक्षण यंत्रणेने पेशावर विमानतळाजवळ भारतीय ड्रोन पाडले. पेशावरमध्ये ड्रोन दिसताच हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय करण्यात आली. काही लोकांना अँटी एअरक्राफ्ट गन फायरिंगचा आवाज ऐकू आला. (वृत्तसंस्था)

## छत्रपतींचा भव्य पुतळा पुढील पिढ्यांना स्फूर्तिदायक

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन
- विक्रमी वेळेत आकर्षक पुतळ्याची उभारणी



सिंधूदुर्गात मालवणच्या राजकोटमधील समुद्रकिनाऱ्याजवळ नव्याने उभारलेल्या छत्रपती शिवरायांच्या दिमाखात उभारलेल्या पुतळ्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. जगविख्यात शिल्पकार आणि पद्मश्री राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल सुतार यांनी छत्रपती शिवरायांचा तब्बल ८३ फूट उंच पुतळ्याची उभारणी केली.

### ३१.७५ कोटींचा खर्च

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३१ कोटी ७५ लाख रकमेतून हा पुतळा उभारण्यात आला आहे. ज्येष्ठ मूर्तिकार राम सुतार यांच्या कंपनीमार्फत हे काम पूर्ण करण्यात आले आहे. पुतळा उभारण्याचे काम ईपीसी तत्त्वावर झालेले आहे. तलवारधारी पुतळ्याची उंची ६० फूट इतकी असून संपूर्ण पुतळा ब्राँझ धातूमध्ये उभारण्यात आलेला आहे. पुतळ्याच्या आधारासाठी स्टेनलेस स्टील सपोर्ट फ्रेमवर्क करण्यात आले आहे . तसेच चौथऱ्यासाठी ५० या उच्च दर्जाचे काँक्रीट व स्टेनलेस स्टील सळईचा वापर करण्यात आलेला आहे.

◆ सिंधुदुर्गनगरी, ११ मे

छत्रपती शिवाजी महाराज हे महान योद्धा होते. त्यांचे विचार सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने विक्रमी वेळेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वास साजेसा भव्य पुतळा उभारला असून महाराजांचा हा पुतळा पुढील पिढ्यांना स्फूर्तिदायक ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन व पूजन समारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री नितेश राणे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार नारायण राणे, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य दीपक केसरकर, रवींद्र चव्हाण, नीलेश राणे, जिल्हाधिकारी अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक दिवे, प्रभारी पोलिस अधीक्षक ऋषिकेश रावले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किणी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सार्वजनिक बांधकाम विभागाने विक्रमी वेळेत या पुतळ्याचे काम पूर्ण करून महाराजांच्या कर्तृत्वास साजेसा भव्य पुतळा उभारला आहे. मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच यंत्रणांनी अतिशय वेगाने काम केले आहे. ज्येष्ठ मूर्तिकार राम सुतारांनी कमी वेळेत आकर्षक आणि देखणा पुतळा साकारला आहे. आयआयटी, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे देखील पुतळा उभारणीत मोलाचे योगदान लाभले असून मी सर्वांचे अभिनंदन करतो. पुतळा उभारताना कोकणातील वेगवान वारे व वादळांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची उंची पाहता हा महाराजांचा बहुधा देशातील सर्वांत उंच पुतळा ठरेल, असे मुख्यमंत्री म्हणाले.


उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, शिवप्रभूंच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांचा हा भव्य पुतळा अभिमान, स्वाभिमान आणि शौर्याचे प्रतीक आहे. यावेळी ज्येष्ठ मूर्तिकार अनिल सुतार, बांधकाम विभागाचे अधिकारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. (तभा वृत्तसेवा)

## देवदर्शनाला आलेल्या वाहनाला अपघात

**मानोरा, ११ मे**

तालुक्यातील तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे दर्शनासाठी आलेल्या औंढा नागनाथ जि. हिंगोली येथील क्रुझर वाहन उलटून झालेल्या अपघातात १२ महिला जखमी झाल्या असून, एक मुलगा व एक मुलगी गंभीर अवस्थेत असल्याची माहिती आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील क्रुझर वाहनातून तीर्थदर्शनासाठी आलेल्या श्रद्धाळूंनी भरलेले हे वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने पोहरादेवी पंचाळा फाटादरम्यान उलटले. पोहरादेवीचे दर्शन आटोपून पुढील दर्शनासाठी शेगाव येथे जात असताना हा अपघात घडला. पंचाळा येथील प्रत्यक्षदर्शी राज्य परिवहन महामंडळाचे निवृत्त वाहक पुंडलिक राठोड यांनी दुपारी झालेल्या या अपघाताबद्दल प्रस्तुत प्रतिनिधीला माहिती दिली. अपघातात १२ महिला जखमी झाल्या असून, नऊ वर्षांचा मुलगा व १३ वर्षांची मुलगी गंभीर जखमी असल्याची माहिती राठोड यांनी दिली. अपघातग्रस्तांना स्थानिक महाराज परिवारातील सदस्यांनी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**१२ महिला जखमी, दोघे गंभीर**



## सोलापूरला अवकाळी पावसाने झोडपले

### तापलेल्या सोलापूरकरांना दिलासा

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ११ मे-**

काही दिवसांपूर्वी सोलापूरच्या तापमानाने यंदाचा उच्चांकी विक्रम करत ४४.७ अंश सेल्सियस इतकी नोंद केली होती. त्यानंतर मात्र हलकासा पाऊस पडल्यानंतर तापमान ३६ अंशांपर्यंत खाली घसरले होते. रविवारी मात्र तापमान पुन्हा ४० अंशावर पोहचले होते. परंतु रात्री दहाच्या सुमारास वारे सुटले आणि पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला हलका वाटणाऱ्या पावसाचा जोर वाढला. सोलापूर शहराच्या बहुतांशी भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. सकाळपासून उकाड्याने हैराण झालेल्या सोलापूरकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. अद्याप उन्हाळा सुरु असून सोलापूरला खऱ्या अर्थाने जुलैपासून मोठ्या पावसाला सुरुवात होते. परंतु गेल्या काही वर्षात मान्सूनच्या आगमनानंतर ७ जूनला सोलापुरात पाऊस हजेरी लावत आहे. रविवारी रात्री सुमारे वीस ते पंचवीस मिनिटे दमदार पावसाने हजेरी लावल्याने नेहमी प्रमाणे होटगी रोडवर ठरलेल्या ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात जमल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागली. मोहोळ तालुक्यासह जिल्ह्यातील काही भागात पावासाने हजेरी लावली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### गुजरातच्या सीमावर्ती भागात परिस्थिती सामान्य

**अहमदाबाद** : भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतर गुजरातच्या सीमावर्ती भागात परिस्थिती सामान्य आहे. रस्त्यांवरील गर्दी वाढली आहे आणि दुकाने आणि हॉटेल्स उघडली आहेत. १० मे रोजी युद्धबंदी असूनही, पाकिस्तानने पुन्हा गुजरातच्या सीमावर्ती भागात हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यामुळे भुज, जामनगर आणि द्वारका या तीन जिल्ह्यांतील ९४ गावांमध्ये वीजपुरवठा खंडित केला होता. रात्री १० वाजता कच्छमध्ये पाकिस्तानी ड्रोन दिसले. गृह राज्यमंत्री हर्ष संघवी यांनी याची पुष्टी केली होती. यानंतर, भुजमध्ये लोकांना सावध करण्यासाठी सायरन वाजवण्यात आला. दिव्य मराठीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कच्छमधील नलिया आणि जखौ भागात सुमारे १५ स्फोटांचे आवाज ऐकू आले.

### ३९ हल्ल्यांची जबाबदारी बीएलएने स्वीकारली

**क्वेटा** : बलुचिस्तानमधील ३९ वेगवेगळ्या ठिकाणी हल्ले केल्याचे बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलएचे प्रवक्ते झीनद बलोच यांनी मान्य केले आहे. त्यांनी म्हटले की, मागील तीन दिवसात बीएलएने प्रमुख महामार्गांवरील पोलिस ठाणी, लष्करी तळ आणि पायाभूत सुविधांच्या ठिकाणांवर हल्ले केले आणि ते ताब्यात घेतले. बीएलएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, बीएलएने काही पोलिस ठाणी ताब्यात घेतली आहेत आणि परिसरातील प्रमुख रस्ते रोखले. हल्ल्यात अनेक लष्करी तळ नष्ट झाले असून पाकिस्तानी सैन्य तेथून पळून गेले आहे. पाकिस्तानविरोधात आमचा लढा सुरूच राहणार आहे.

### उत्तरप्रदेशात नवीन वीज प्रकल्प बांधणार अदानी

**नवी दिल्ली** : अदानी पॉवरला उत्तरप्रदेशात १५०० मेगावॅट (मेगावॅट) वीज पुरवण्याचे कंत्राट मिळाले आहे. यासाठी, कंपनी उत्तरप्रदेशात एक नवीन अल्ट्रा-सुपरक्रिटिकल पॉवर प्लांट बांधेल. या प्रकल्पातून ५.३८३ रुपये प्रति युनिट दराने वीजपुरवठा केला जाईल. हा प्लांट डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ओन अँड ऑपरेट मॉडेल अंतर्गत विकसित केला जाईल. २०३३-३४ पर्यंत उत्तर प्रदेशातील विजेची मागणी ११,००० मेगावॅटने वाढण्याचा अंदाज आहे. यामुळे अदानीला अधिक कंत्राटे दिली जाऊ शकतात.

### पंजाब सीमेलगतच्या शाळा, महाविद्यालये बंद

**चंदिगड** : भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीची घोषणा झाल्यानंतर पंजाबला लागून असलेल्या पाकिस्तान सीमेवरील परिस्थिती सामान्य होऊ लागली आहे. सर्व बंद शाळा आणि महाविद्यालये १२ मेपासून उघडतील. तथापि, पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या अमृतसर आणि फिरोजपूरच्या डीसींनी जिल्ह्यांमधील सर्व शाळा बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. अमृतसर, फिरोजपूर, फाजिल्का, तरनतारन, पठाणकोट आणि गुरुदासपूरमध्ये लोकांनी सीमेलगतची गावे रिकामी केली होती. आता ते घरी परतू लागले आहेत. पठाणकोट आणि जम्मू सीमेवरही बाजारपेठा उघडल्या आहेत.

### पंजाबमध्ये दोन पाकिस्तानी हेरांना अटक

**मालेरकोटला** : पंजाबच्या मालेरकोटला पोलिसांनी भारतीय सैन्याशी संबंधित गोपनीय माहिती पाकिस्तानला पाठवणाऱ्या दोघांना अटक केली आहे. ही माहिती दिल्लीतील पाक उच्चायुक्तालयात (राजनयिक दूतावास) तैनात असलेल्या एका पाकिस्तानी अधिकाऱ्याला पाठवली जात होती. या आरोपींना ऑनलाइन पेमेंट मिळत होते. ते पैशाच्या बदल्यात भारतीय सैन्याच्या कारवायांची माहिती पाकिस्तानला पाठवत असे. पोलिसांना ठोस माहिती मिळाल्यावर, प्रथम एका व्यक्तीला पकडण्यात आले, ज्याने चौकशीदरम्यान दुसऱ्या व्यक्तीचे नाव सांगितले आणि त्यालाही अटक करण्यात आली.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३९.९ | २६.६ |
| अमरावती | ४१.४ | २१.८ |
| भंडारा | ४०.० | २२.० |
| बुलडाणा | ३६.६ | २४.० |
| चंद्रपूर | ३८.६ | २६.४ |
| गडचिरोली | ३८.७ | २४.८ |
| गोंदिया | ३७.७ | २३.२ |
| नागपूर | ३९.६ | २६.६ |
| वर्धा | ३९.५ | २६.७ |
| वाशीम | ३८.२ | -.- |
| यवतमाळ | ४०.० | २७.० |

# अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच ‘स्व-निर्वासन’ कार्यक्रम

### राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची आदेशावर स्वाक्षरी

◆ **वॉशिंग्टन डीसी, ११ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका नवीन कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी करत देशाच्या इतिहासात प्रथमच ‘स्व-निर्वासन’ कार्यक्रम सुरू केला आहे.या कार्यक्रमांतर्गत, अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या स्थलांतरितांना मोफत विमान तिकिटे आणि प्रोत्साहन रक्कम देऊन स्वेच्छेने त्यांच्या देशात परतण्याचा पर्याय देण्यात आला आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने म्हटले आहे की, देशात राहणारे जे बेकायदेशीर स्थलांतरित त्यांच्या मायदेशात जाण्याचा निर्णय घेतील त्यांना १००० अमेरिकन डॉलर्स इतकी आर्थिक मदत देणार आहेत. याचबरोबर त्यांच्या विमान प्रवासचा खर्च देखील अमेरिकन प्रशानसन करणार आहे. व्हाईट हाऊसच्या वेबसाइटवरील निवेदनात, ट्रम्प यांनी स्थलांतरितांवर टीका केली. अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांनी आक्रमण केले असल्याचा आरोप केला.

#### आम्ही ठरवू त्या ठिकाणी आणि त्या पद्धतीने

अमेरिकेत राहणाऱ्या सर्व बेकायदेशीर परदेशी नागरिकांनी आत्ताच मोफत उड्डाण बुक करावे. अन्यथा आम्ही ठरवू त्या पद्धतीने आणि आम्ही ठरवू त्या प्रकारे शिक्षा भोगावी लागेल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. जो परदेशी नागरिक स्वतःहून हद्दपार होणार नाही, त्याला मोठा आर्थिक दंड, मालमत्ता जप्त करणे, वेतन जप्त करणे, तुरुंगवास आणि आम्ही ठरवू त्या ठिकाणी आणि आम्ही ठरवू त्या पद्धतीने अचानक हद्दपारी करण्यात येईल, असे ट्रम्प यांनी पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

#### अमेरिका सोडणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरितांना आर्थिक मदत

तत्पूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रकारांसमोर आश्वासन दिले होते की, जो बेकायदेशीर प्रवासी स्वतःहून अमेरिका सोडेल त्याला आर्थिक मदत आणि ते जिथून आले आहे तिथे परतण्यासाठी एका सुंदर विमान प्रवासाची व्यवस्था करणार आहोत. होमलँड सिक्युरिटी सेक्रेटरी क्रिस्टी नोएम यांनी स्पष्ट केले होते की, त्यांचा विभाग एक कार्यक्रम सुरू करणार आहे. ज्याद्वारे जे बेकायदेशी स्थलांतरित माघारी जातील याची सीबीपी ॲपद्वारे पुष्टी झाल्यानंतर त्यांच्या खात्यात एक हजार अमेरिकन डॉलर्स आर्थिक मदत म्हणून पाठवले जातील.


# वैनगंगेत बुडालेल्या तीन विद्यार्थ्यांचे मृतदेह सापडले

### उत्तरीय तपासणीनंतर स्वगावी पार्थिव रवाना

◆ **सावली, ११ मे**

सावली तालुक्यातील व्याहाड बुज. जवळील वैनगंगा नदीत शनिवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास गडचिरोली येथील वैद्यकीय महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. पोलिस विभाग व आपत्ती व्यवस्थापन चमूच्या सहकार्याने शोधमोहीम राबविण्यात आली. रविवार, ११ मे रोजी सकाळी तीनही विद्यार्थ्यांचे मृतदेह सापडले. उत्तरीय तपासणीनंतर त्यांचे पार्थिव त्यांच्या गावी पाठविण्यात आले आहे.

चंद्रपूर-गडचिरोली महामार्गावरील व्याहाड बुज. जवळील वैनगंगा नदीच्या पुलाखाली शनिवारी गडचिरोली येथील वैद्यकीय महाविद्यालयाचे गोपाल गणेश साखरे, पार्थ बाळासाहेब जाधव, स्वप्निल उद्धवसिंग शिरे, शिवम श्रीधर जायभाई, सार्थक राजेश पाठक, सुजित धनाजी देशमुख हे विद्यार्थी आंघोळीसाठी गेले होते. आंघोळ करीत असताना गोपाल साखरे (२०) रा. चिखली, जि. बुलढाणा, पार्थ जाधव (२०) रा. शिर्डी, जिल्हा अहमदनगर, स्वप्निल शिरे (२०) संभाजीनगर हे प्रथम वर्षात शिकणारे तीनही विद्यार्थी बुडाले. याबाबतची माहिती अन्य विद्यार्थ्यांनी पोलिसांना कळवली. माहिती मिळताच सावली पोलिस ठाणे व आपत्ती व्यवस्थापन



स्वप्निल शिरे



गोपाल साखरे



पार्थ जाधव

चमूने शोधमोहीम राबविली. मात्र, अंधार झाल्यामुळे शोधमोहीम थांबविण्यात आली. रविवारी सकाळपासून पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली असता, तीनही विद्यार्थ्यांचे मृतदेह सापडले. मृतदेह सावली येथील ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

#### मृत विद्यार्थ्यांच्या परिवारांना प्रत्येकी ५ लाख द्या : मुनगंटीवार

चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीत पोहण्यासाठी गेलेल्या तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे त्यांच्या परिवारांवर मोठा आघात झाला आहे. अशा परिस्थितीत त्या तीनही विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत करावी, अशी मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासोबतच मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या सोबत मदतीसंदर्भात दूरध्वनीवर मुनगंटीवार यांनी चर्चाही केली.

## काश्मीरमध्ये २० ठिकाणी छापे, स्लीपर सेल मॉड्यूलचा भंडाफोड

◆ **श्रीनगर, ७ मे**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, सरकारने दहशतवादी आणि त्यांना मदत करणाऱ्यांविरोधात मोहीम तीव्र केली. यादरम्यान पोलिसांनी दक्षिण काश्मीरमध्ये २० ठिकाणी छापे टाकून स्लीपर सेल मॉड्यूलचा भंडाफोड केला. यावेळी मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह वस्तूही जप्त करण्यात आल्या. तसेच, काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. राज्य तपास संस्था अर्थात् एसआयएने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, जम्मू-काश्मीर पोलिस दहशतवाद्यांसाठी काम करणारे आणि ओव्हरग्राउंड वर्करवर लक्ष ठेवून आहेत. गुप्तचर यंत्रणेने उघड केले की, काश्मीरमधील अनेक स्लीपर सेल पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या नेत्यांच्या थेट संपर्कात होते आणि व्हॉट्सॲप, टेलिग्राम, सिग्नल आदी मेसेजिंग ॲप्सद्वारे सुरक्षा दल आणि महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती पुरवत होते. (वृत्तसंस्था)

## समृद्धी महामार्गावरील कार अपघातात एक गंभीर जखमी

◆ **कारंजा लाड, ११ मे**

शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन परतत असताना झालेल्या कार अपघातात एक जण गंभीर जखमी झाला. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर शनिवारी रात्री ११.३० वाजता ही घटना घडली. रोशन राजेंद्र वर्दने असे जखमीचे नाव असून, ते वरोरा जिल्ह्याचा रहिवासी आहे.

प्राप्त माहितीनुसार, ते कारने शेगाव येथे दर्शनासाठी गेले होते. तेथून घरी परतत असताना मार्गातील चॅनल १६१ जवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार अनियंत्रित झाली आणि रस्ता सुरक्षा भिंतीवर आदळली. घटनेची माहिती मिळताच समृद्धी रुग्णवाहिका पायलट रवी शिंदे व डॉ. भास्कर राठोड यांनी त्यांना उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु, प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आल्याची माहिती आहे. (तभा वृत्तसेवा)



उत्तराखंडच्या चंपावत जिल्ह्यात भारत-नेपाळ सीमेजवळ बनबासा येथील सशस्त्र सीमा बलच्या ५७ व्या बटालियनला भेट दिल्यानंतर तेथे तैनात महिला सैनिकांशी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी चर्चा केली

# इस्रायली हवाई हल्ल्यात २३ पॅलेस्टिनी नागरिक ठार

### जीवनावश्यक सेवेच्या नाकेबंदीने उपासमारीचे संकट

◆ **तेल अवीव, ११ मे**

गाझा पट्टीवर इस्रायलने शनिवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात २३ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन मुले आणि त्यांच्या पालकांचा समावेश आहे ज्यांचे तंबू गाझा शहरातील साब्रा भागात झालेल्या बॉम्बस्फोटात उद्ध्वस्त झाले होते. यापूर्वी, शुक्रवारी रात्री उशिरा झालेल्या आणखी एका हल्ल्यात, जबालिया परिसरात असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या एजन्सीच्या गोदामाला लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला.

इस्रायली सैन्याने सांगितले की, गाझा शहरातील शुजैया भागात शोध मोहिमेदरम्यान स्फोट झाल्याने त्यांचे नऊ सैनिक जखमी झाले. पॅलेस्टाइनच्या आरोग्य विभागाने सांगितले की, मध्यरात्रीनंतर झालेल्या इस्रायलच्या हवाई हल्ल्यात २३ नागरिक झाले. इस्रायलने जीवनावश्यक साहित्यांची मदत रोखल्याने नागरिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. नागरिकांना प्राण्यांचे मांस भाजून खावे लागत आहे. अन्नसाठा संपत असल्याने स्वयंपाकघरे आणि मदत केंद्रे बंद होत आहेत.

हमासला ओलिसांना सोडण्यासाठी आणि शस्त्रे टाकण्यासाठी दबाव आणला जात असल्याचे इस्रायल म्हणत असताना, मानवाधिकार गटांनी याला उपासमारीचे शस्त्र आणि संभाव्य युद्ध गुन्हा म्हणून वर्णन केले आहे.



#### मदतीबद्दल आंतरराष्ट्रीय चिंता

मदत साहित्याच्या वितरणावर नियंत्रण ठेवण्याच्या इस्रायलच्या योजनेचा संयुक्त राष्ट्र संघ आणि अनेक मदत संघटनांनी निषेध केला आहे. गाझा ह्युमॅनिटेरियन फाउंडेशन नावाच्या अमेरिकन गटाची योजना देखील नाकारण्यात आली आहे. गाझा आरोग्य मंत्रालयाच्या मते, या युद्धात आतापर्यंत ५२,८०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, ज्यात बहुतेक महिला आणि मुलांचा समावेश आहेत. (वृत्तसंस्था)

# चीन पाकिस्तानच्या कायम पाठीशी राहणार

### परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांची टिप्पणी

◆ **बाजिंग, ११ मे**

पाकिस्तानचे सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठी चीन त्यांच्या कायम पाठीशी असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांनी म्हटले आहे.

चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी उपपंतप्रधान इशाक डार यांच्याशी दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणादरम्यान या टिप्पण्या केल्या असल्याचे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. संभाषणादरम्यान, डार यांनी वांग यी यांना पाकिस्तानातील परिस्थितीविषयी माहिती दिली. वांग यी यांनी पाकिस्तानच्या संयमाची आणि आव्हानात्मक परिस्थितीत त्याच्या जबाबदार दृष्टिकोनाची प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, पाकिस्तानचा सर्वकालीन धोरणात्मक सहकारी भागीदार आणि मित्र म्हणून चीन, पाकिस्तानचे सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. काही दिवसांपूर्वी चीनने दहशतवादाचा तीव्र निषेध केला होता, यावरून त्यांचा दुटप्पीपणा स्पष्ट होतो. त्यांनी कोणत्याही परिस्थितीत दहशतवादाचे समर्थन करत नसल्याचे म्हटले होते. (वृत्तसंस्था)

#### ग्लोबल टाईम्ससमधून भारताची बदनामी

चीन सरकारचे मुखपत्र ग्लोबल टाईम्सने युद्धविरामावर पाकिस्तानचे कौतुक केले आहे आणि भारताची बदनामी करणारे वृत्त आणि लेख प्रकाशित केले आहे. पाकिस्तानी सैन्याचा हवाला देत दावा केला की, पाकिस्तानच्या सायबर हल्ल्यामुळे भारताचा ७० टक्के वीजपुरवठा खंडित झाला होता. यावर भारतीय दूतावासाने म्हटले की, चिनी माध्यमांचे वृत्त दिशाभूल करणारे आणि खोटे आहे.

## रंग राजधानीचे




### स्मृती इराणी आता नव्या भूमिकेत

**२०२४** च्या लोकसभा निवडणुकीत अमेठी मतदारसंघात पराभव झाल्यानंतर ज्येष्ठ भाजपा नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी मुख्य राजकीय प्रवाहातून मागे गेल्यासारख्या दिसत आहेत. २०१४ मध्ये पहिल्यांदा अमेठी लोकसभा मतदारसंघात राहुल गांधींकडून पराभूत झाल्यानंतरही स्मृती इराणी यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झाला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राहुल गांधी यांचा पराभव केल्यानंतर तर त्यांचे जायंटकिलर म्हणून राजकीय महत्त्व खूप वाढले होते. मात्र, यावेळी झालेल्या पराभवाने त्यांचे राजकीय भवितव्य धोक्यात आल्यासारखे दिसत आहे. जवळपास वर्षभरापासून त्या नव्या जबाबदारीच्या प्रतीक्षेत आहे, पण त्यांना कोणतीही जबाबदारी मिळाली नाही. नाही म्हणायला दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या नावाची चर्चा झाली होती, पण ती फक्त चर्चाच राहिली.

त्यामुळे कामाच्या शोधात असलेल्या इराणी यांनी आता शिक्षण क्षेत्रात काम करण्याचे ठरवलेले दिसते. स्मृती इराणी यांनी वाहिन्यांवरील लोकप्रिय मालिकांच्या क्षेत्रातून कधीच संन्यास घेतला आहे. त्यामुळे त्या क्षेत्रात त्या परत जाऊ शकत नाही, तसे करणे त्यांना आता शोभणारही नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षण क्षेत्रात काम करण्याचे ठरवलेले दिसते. याचा अर्थ त्या नेहमीसाठी राजकारण सोडून शिक्षण क्षेत्रात जाणार, असे नाही, तर ही तात्पुरती व्यवस्था आहे. इराणी यांनी मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात मानव संसाधन विकास म्हणजे शिक्षण मंत्री म्हणून काम केले आहे. त्याचा आधार घेत कॅलिफोर्नियातील बर्कले विद्यापीठात त्या अतिथी प्राध्यापक म्हणून आता विद्यार्थ्यांना शिकवणार आहे. इराणी पहिल्यांदाच विद्यार्थ्यांना शिकवणार आहेत, असे नाही. या आधी त्यांनी आयआयएम बोधगया आणि आयआयएम उदयपूर येथेही अतिथी प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना मानवसंसाधन या विषयाचे धडे दिले होते.

●● ●●

### सेंद्रिय शेती आणि शिवराजसिंह चौहान

**शेतीत** रासायनिक खते आणि किटकनाशके यांचा वापर वाढल्यामुळे त्या शेतीतून होणाऱ्या पिकांमुळे विविध रोगांची लागण सुरू झाली आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांत सेंद्रीय शेतीतून मिळणाऱ्या पिकांकडे लोकांचा कल वाढला आहे. सेंद्रीय शेतीतून मिळणारे अन्नधान्य, भाजीपाला तसेच फळे महाग असली तरी, लोकांची त्याला पसंती मिळत आहे. त्यामुळे सरकारही सेंद्रीय शेतीचा आग्रह धरत आहे. सेंद्रीय शेती करण्यासाठी सरकार शेतकऱ्यांना प्रोत्साहन देत आहे, अनेक सवलती देत आहे. राजधानी दिल्लीत मागील आठवड्यात कृषी मंत्रालयातर्फे सेंद्रीय शेतीवर एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन करताना केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आपल्या पाच एकर शेतात यापुढे सेंद्रीय शेती करण्याची घोषणा केली. सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारतर्फे आवश्यक ती मदत करण्याचा निर्देशही चौहान यांनी दिला. सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी सुरू झाली आहे, याकडे अधिकाऱ्यांनी लक्ष वेधले असता, त्यात माझेही नाव नोंदवा, असे चौहान म्हणाले. सेंद्रीय शेतीबाबत शिवराजसिंह यांची कृती आधी केले, मग सांगितले, या प्रकारातील म्हणायला पाहिजे.

●● ●●

### खडगेंच्या तेलंगणा पॅटर्नमुळे कर्नाटक अस्वस्थ

**केंद्र सरकारने** जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी जनगणना करताना जातनिहाय जनगणनाही केली जाणार आहे. जातनिहाय जनगणना कधीपासून सुरू होणार, हे सरकारने अद्याप जाहीर केले नाही. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी तेलंगणा आणि कर्नाटकसारख्या काँग्रेसशासित राज्यांनी आपल्याकडे जातनिहाय सर्वेक्षण केले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने देशात जातनिहाय जनगणना करताना तेलंगणा सरकारने राज्यात राबवलेल्या पॅटर्नचा अवलंब करण्याचे आवाहन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी केले. यामुळे काँग्रेस पक्षात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

कर्नाटक आणि तेलंगणा या दोन्ही राज्यांत काँग्रेसची सत्ता आहे आणि दोन्ही राज्यांनी जातनिहाय सर्वेक्षण केले आहे, मग खडगे यांनी फक्त तेलंगणाचे नाव का घेतले, असा प्रश्न काँग्रेस पक्षात दबक्या आवाजात विचारल्या जात आहे. खडगे हे मूळ कर्नाटकचे आहे. कर्नाटकमधूनच त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला, आमदार, खासदार म्हणून ते कर्नाटकमधूनच निवडून आले होते. त्यामुळे त्यांनी कर्नाटकऐवजी तेलंगणा पॅटर्नचा आग्रह का धरला, असा प्रश्न सगळ्यांना पडला आहे. याचा अर्थ कर्नाटकपेक्षा तेलंगणातील जातनिहाय सर्वेक्षणाचे काम शास्त्रशुध्द पद्धतीने झाले, असे खडगे यांना म्हणायचे होते का? की खडगेंना यातून कर्नाटकमधील आपल्या पक्षाच्या नेत्यांना काही संदेश द्यायचा होता. काही असो, खडगेंच्या या विधानामुळे कर्नाटकातील काँग्रेसचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या अस्वस्थ झाले, हे मात्र खरे.

●● ●●

### नेत्यांच्या सुरक्षेवरून राजकारण

**सरकारकडून** मिळणारी सुरक्षा हा राजकीय नेत्यांसाठी प्रतिष्ठेचा विषय असतो. सुरक्षा जेवढी मोठी, तेवढा तो नेता मोठा आणि प्रतिष्ठित मानला जातो. दिल्ली प्रदेश भाजपा अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांच्या जीवाला धोका असल्याच्या अहवालावरून केंद्र सरकारने त्यांना झेड प्लस सुरक्षा दिली. सचदेवा यांना वाय सुरक्षा मिळत होती. ती वाढवून झेड करण्यात आली. यामुळे सचदेवा यांच्या सुरक्षाताफ्यात आता ६ कमांडोसह २० ते २२ सुरक्षा जवान राहणार आहे, त्याशिवाय पायलट वाहनही राहणार आहे. त्यामुळे सुरक्षा या मुद्याचे राजकारण सुरू झाले आहे. जनतेला वाऱ्यावर सोडत सरकार आपल्या नेत्यांना सुरक्षा देत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेस नेते उदितराज यांनी त्यावर टीका केली. मलाही जीवे मारण्याच्या अनेक धमक्या मिळाल्या. दिल्ली पोलिसांना भेटूनही मला सुरक्षा देण्यात आली नाही, असा आरोप त्यांनी केला. २००९ पासून मला वाय सुरक्षा होती, पण मी भाजपाचा राजीनामा दिल्यानंतर माझी सुरक्षा काढण्यात आली, असा आरोप उदितराज यांनी केला. उदितराज पहिल्या कार्यकाळात भाजपाचे खासदार होते.

● **दिल्लीवाला**

# रशियाचा युद्धबंदीसाठी युक्रेनला चर्चेचा प्रस्ताव

### युरोपीय देशांचा लष्करी मदत करण्याचा इशारा


◆ **मॉस्को, ११ मे**

रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष संपविण्यासाठी राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी रविवारी युक्रेनला थेट चर्चेचा प्रस्ताव दिला. १५ मे रोजी इस्तांबूलमध्ये युक्रेनशी युद्धबंदीवर चर्चा करण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे.

युद्धबंदीवर स्वाक्षरी झाली नाही, तर ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि पोलंडच्या नेत्यांनी शनिवारी युक्रेनला लष्करी मदत पुरविण्याचा इशारा दिला आहे. यावर पुतिन म्हणाले की, कोणत्याही पूर्वअटीशिवाय युक्रेनशी चर्चा करण्यासाठी आमची तयारी आहे. यापूर्वी रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध थांबवण्याबाबत कोणताही करार होऊ शकला नाही. मात्र आता दोन्ही देश युद्धबंदीसाठी तयार असल्याचे दिसून येत आहे. यावर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, सोमवार, १२ मेपासून, किमान ३० दिवसांसाठी पूर्ण आणि बिनशर्त युद्धबंदी असली पाहिजे. आम्ही एकत्रितपणे रशियाकडून ही मागणी करतो. अटी किंवा शर्ती लादण्याचा कोणताही प्रयत्न युद्ध लांबवण्याचे आणि राजनैतिक धोरण कमकुवत करण्याचे लक्षण आहे.

#### शांततेबद्दल गंभीर व्हा अन्यथा..

ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर यांनी म्हटले की, आम्ही रशियाला आवाहन करतो की, त्यांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी गंभीर व्हावे अन्यथा, आम्ही युक्रेनला मदत करण्यासाठी सज्ज आहे. पुतिन यांनी शांततेकडे पाठ फिरवली तर आम्ही प्रत्युत्तर देऊ, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प



यांच्यासोबत काम करून, आमच्या सर्व मित्र राष्ट्रांसोबत काम करून, आम्ही निर्बंध वाढवू आणि युक्रेनचे रक्षण करण्यासाठी आमची लष्करी मदत वाढवू जेणेकरून रशियावर पुन्हा वाटाघाटी करण्यासाठी दबाव येईल.

#### एकतर्फी युद्धबंदी जाहीर

२९ एप्रिल रोजी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी युक्रेनसोबत ३ दिवसांच्या एकतर्फी युद्धबंदीची घोषणा केली. ही युद्धबंदी ८ मे पासून लागू झाली. यापूर्वी रशियाने २० एप्रिल रोजी ईस्टरच्या निमित्ताने एक दिवसाची युद्धबंदी जाहीर केली होती. रशियाच्या ८० व्या विजय दिनानिमित्त हे युद्धविराम करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीवर मिळालेल्या विजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी रशिया दरवर्षी ८ मे रोजी विजय दिन परेड आयोजित करतो. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# संसदेत १९९४ चा ठराव पुन्हा मंजूर करा

## काँग्रेसची मागणी, विशेष अधिवेशन घेण्यासाठी मोदींना पत्र

**नवी दिल्ली, ११ मे**

भारत आणि पाकिस्तानमध्ये अचानक झालेल्या युद्धबंदी आणि त्यानंतर काही तासांतच झालेल्या उल्लंघनावर काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी मोठे विधान केले आहे. भारतीय सैन्याचे कौतुक करतानाच त्यांनी अमेरिकेच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केला आहे. १९९४ चा ठराव संसदेत पुन्हा मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनीही पंतप्रधान मोदींना पत्र लिहून विशेष अधिवेशन घेण्याची मागणी केली आहे.

भारतीय सशस्त्र दलांनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की ते कोणापेक्षाही मागे नाहीत. गेल्या २४ तासांतील घटनांची साखळी वेगाने बदलली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंदीची घोषणा केल्यामुळे आश्चर्य वाटले, असे पहिल्यांदाच घडले आहे. सोशल मीडिया पोस्टमध्ये जे लिहिले गेले ते उल्लेखनीय आहे. काश्मीर प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे. काँग्रेस पक्ष बऱ्याच काळापासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी करत आहे. विशेष अधिवेशन बोलवून १९९४ चा ठराव पुन्हा एकदा सर्वपक्षीय एकमताने मंजूर करावा, असे काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



### १९९४ चा ऐतिहासिक ठराव नेमका काय होता?

२२ फेब्रुवारी १९९४ रोजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात संसदेत एकमताने ठराव केला होता. या ठरावात स्पष्ट म्हटले होते की, व्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तो भारतात पुन्हा आणला जाईल. अटलबिहारी वाजपेयी त्यावेळी विरोधी पक्षनेते होते.

### अमेरिकेकडून काश्मीर मुद्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न

संसदेवरील हल्ल्याच्या वेळीही, जेव्हा अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते आणि सोनिया गांधी विरोधी पक्षाच्या नेत्या होत्या, तेव्हा त्यांनी म्हटले होते की विरोधी पक्ष सरकारसोबत आहे. यावेळीही विरोधी पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला, परंतु अमेरिकेने ज्या पद्धतीने युद्धबंदीची घोषणा केली तो द्विपक्षीय मुद्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न होता, असे पायलट यांनी म्हटले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि युद्धबंदीच्या घोषणांवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी विरोधी पक्षांची केली आहे. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान मोदींना पत्र लिहून पुन्हा एकदा ही मागणी केली आहे.

## भरधाव कारने महिलेसह ४ मुलांना चिरडले

**कोटा, ११ मे**

राजस्थानमधील कोटा येथे एका भरधाव कारने घराबाहेर बसलेल्या एका महिलेसह चार मुलांना चिरडले. या अपघातात महिलेच्या डोक्याला दुखापत झाली, तर चारही मुले गंभीर जखमी आहे. जखमींवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अनंतपूर पोलिस ठाणे परिसरातील रंगबारी येथील अजय आहुजा नगरमध्ये हा अपघात घडला. ही संपूर्ण घटना समोरील एका घरात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. पोलिस अधिकारी घमंडी लाल यांनी सांगितले की, कार चालक चिराग जांगीडविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू करण्यात आला आहे. सध्या आरोपी चालक फरार आहे. (वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मीरमधील राजौरीचे अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त राज कुमार थापा यांचा पाकिस्तानच्या गोळीबारात मृत्यू झाला. राज्याचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी रविवारी थापा यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

# बलुचिस्तान प्रांताच्या स्वातंत्र्याची घोषणा

## बलुच आर्मीचा दावा; पाकिस्तानी सैन्याचे पलायन



**क्वेट्टा, ११**

बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानच्या एक तृतीयांश प्रांतावर ताबा मिळवत स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा केली. बलुचिस्तान प्रांतातून पाकिस्तान सैन्य हाकलून लावले असून बहुतांश चौक्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. आता आमचा प्रांत स्वतंत्र झाल्याची घोषणा बीएलएने जारी केलेल्या व्हिडीओतू केला. बलुचच्या घोषणेमुळे पाकिस्तानपुढे दोन्ही आघाड्यावर गंभीर आव्हान उभे ठाकले आहे.

बीएलएने व्हिडीओत दावा केला की, अफगाणिस्तान आणि इराण सीमेलगत असलेल्या भागावर आम्ही पूर्णपणे नियंत्रण मिळवले आहे. पाकिस्तानी लष्कराने आपल्या काही चौकी सोडून माघार घेतली असून, सध्या पाकिस्तानच्या अनेक भागांत आणीबाणीसदृश परिस्थिती आहे. नागरिकांना घराबाहेर न पडण्याच्या सूचना देण्यात आल्या. बीएलएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मस्टंग आणि लाखी भागात पाक लष्कर व त्यांच्या सहयोगींवर सहा वेगवेगळ्या ठिकाणी हल्ले केले. या कारवायांत रिमोट कंट्रोल आणि इम्प्रोव्हाईज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाईसेस अर्थात् आयईडीचा वापर करून पाकिस्तानी लष्कराच्या गुप्तचर आणि संवाद यंत्रणा असलेल्या टॉवर्सना लक्ष्य करण्यात आले. (वृत्तसंस्था)

### बॉम्ब निकामी पथकावर हल्ला

गुरुवारी पहाटे साडेचार वाजता जमरानच्या ढांग भागात पाक लष्कराच्या बॉम्ब निकामी पथकावर बीडीएसवर हल्ला केला. यामध्ये एका लष्करी अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याचा दावा बीएलएने केल. त्यांनी सांगितले की, पाक लष्कराच्या अनेक तळांवर ग्रेनेड हल्ले करण्यात आले असून, यात अनेक जवान ठार झाले . दरम्यान, बीएलएने अनेक ठिकाणचे पाकिस्तानी झेंडे काढून टाकून त्या ठिकाणी आपले झेंडे फडकावले आहेत.

### पाकी लष्कराची कोंडी

बलुच मजदूर मशिन मॅन संघटनेने स्थानिक नागरिकांना इशारा दिला की, बलपूर्वक ताबा मिळवणाऱ्या शक्तींना कोणतीही मदत देऊ नये किंवा सहकार्य करू नये. परिस्थिती तणावपूर्ण असून, पाकिस्तानी लष्कराची कोंडी झाल्याचे दिसून येत आहे.

# काँग्रेस सरकारला घेरणार

**नवी दिल्ली, ११ मे**

काँग्रेस पक्ष सध्याच्या परिस्थितीबाबात सरकारला प्रश्न विचारणे सुरू करेल. विशेषतः भारत आणि पाकिस्तान यांच्यातील चर्चेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याच्या मुद्यावर काँग्रेसकडून सरकारला घेरले जाऊ शकते.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाटाघाटींमध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप होणार नाही याची सरकारने नेहमीच काळजी घेतली आहे. मग ट्रम्प यांनी शस्त्रविरामाची घोषणा कशी केली? येत्या काळात आम्ही हे प्रश्न उपस्थित करू, असे पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले.

राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी देखील सरकारला विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली आहे. पहलगाम हल्ल्यापासून ते शस्त्रविराम याची माहिती द्यावी, असे ते म्हणाले आहेत. (वृत्तसंस्था)

## अमृतसरमध्ये आरडीएक्स, हॅण्ड ग्रेनेड जप्त

**अमृतसर, ११ मे**

भारत-पाकिस्तान दरम्यान प्रचंड तणावाचे वातावरण असतानाच सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि पंजाब पोलिसांच्या जवानांनी झाडाझडतीदरम्यान आरडीएक्स आणि बॉम्ब बनवण्याचे स्फोटक पदार्थ जप्त केले आहेत.

अजनाला सेक्टरजवळ चक बाला गावातील शेतातून ९७२ ग्रॅम आरडीएक्स, दोन हॅण्ड ग्रेनेड, दोन डिटोनेटर, आयईडी तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे रिमोट कंट्रोल, चार्जर, बॅटरी आणि काळ्या रंगाचा डबा असे साहित्य जप्त करण्यात आले. यासोबतच दोन पिस्तूल, तीस काडतूस, चार मॅगझीनही ड्रोनच्या माध्यमातून परिसरात टाकण्यात आले होते. तेही सुरक्षा दलाने ताब्यात घेतले आहे. (वृत्तसंस्था)



लखनौ येथे ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रकल्पाचे रविवारी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आभासी पद्धतीने उद्घाटन झाले. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ,उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक उपस्थित होते.

# ब्रह्मोसला रोखण्यात पाकिस्तान अपयशी

## बिकानेरमध्ये क्षेपणास्त्राचे बूस्टर, नोज कॅप सापडले

**बिकानेर, ११ मे**

गेल्या दिवसापासून पाकिस्तान आणि भारतामध्ये तणाव निर्माण झाला आहे. दरम्यान, काल या दोन्ही देशांमध्ये युद्धबंदीवर सहमती झाली. यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर याची घोषणा केली. दरम्यान, आता राजस्थानमधील बिकानेरजवळील एका शेतात ब्रह्मोस क्षेपणास्त्राचे बूस्टर आणि नोज कॅप सापडल्याने खळबळ उडाली. गावकऱ्यांनी सांगितले की, रात्री आकाशात मोठ्या प्रकाशासह मोठा स्फोट झाला, त्यानंतर हा ढिगारा शेतात पडला. पाकिस्तानातील बहावलपूर येथे आपले लक्ष्य गाठण्यासाठी ब्रह्मोस क्षेपणास्त्राचा वापर केला.

क्षेपणास्त्र सोडताच त्याचे बूस्टर आणि नोज कॅप लगेच बाहेर आले. यावरून ब्रह्मोसने बहावलपूरमध्ये आपले लक्ष्य यशस्वीरित्या गाठले. यामुळे पाकिस्तानची हवाई संरक्षण प्रणाली देखील उघडकीस आली जी इतकी तयारी आणि वेळ असूनही, ब्रह्मोसला रोखण्यात अपयशी ठरल्याचे दिसत आहे. (वृत्तसंस्था)




### लाँचनंतर नोज आणि बूस्टर वेगळे होतात

गावकऱ्यांनी रात्री एक तेजस्वी चमक आणि मोठा स्फोट पाहिला आणि ऐकला होता, त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी शेतात ही प्रचंड धातूची दंडगोलाकार रचना आढळली. यानंतर, दुसऱ्या दिवशी येथे लोकांची गर्दी जमली. तज्ज्ञांच्या मते, ब्रह्मोस क्षेपणास्त्राचे हे भाग - बूस्टर आणि नोज कॅप - प्रक्षेपणानंतर लगेच वेगळे होतात आणि जमिनीवर पडतात. यावेळी हे तुकडे भारतीय हद्दीत पडले.

## चित्रपट वार्ता

### अरिजितने उघडले स्वस्त, सुंदर हॉटेल







**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीत आवडता गायक कोण असे म्हटल्यानंतर बहुतांश लोक अरिजीतचेच नाव घेतील. अरिजीत अतिशय व्यस्त आणि महागडा गायक असला तरी प्रत्यक्ष जीवनात तो फारच साधा, सरळ आहे. तो कधीही बॉलिवूडच्या पार्ट्यांना हजर राहत नाही. विशेष म्हणजे, त्याला शांतपणे समाजसेवा करायला आवडते. याविषयी तो कधीही गाजावाजा करत नाही. असेच एक काम त्याने केले आहे. त्याचे मूळ घर असलेल्या पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबादमधील जियागंज येथे त्याने हे हॉटेल सुरू केले आहे. याची खास बाब म्हणजे, या हॉटेल हेशेलमध्ये लोकांना अवघ्या ४० रुपयात पोटभर जेवण मिळतं. जेवण स्वस्तात असले तरी चवदेखील उत्तम आहे. त्याने कधीही आपल्या हॉटेलची जाहिरात केली नाही किंवा केलेल्या कामाचा गवगवा केलेला नाही. दान किंवा पुण्याचे काम गुपचूप करायचे असते, या विचारानेच त्याने हे हॉटेल उभारल्याचे समजते.

### अमिताभकडून ऑपरेशन सिंदूरचे कौतुक

**मुंबई** : रविवारी अभिनेते अमिताभ बच्चन यांनी वर मौन सोडले. सुमारे २० दिवस फक्त रिकाम्या नंबरच्या पोस्ट शेअर केल्यानंतर, त्यांनी एक भावनिक आणि देशभक्तीपर पोस्ट लिहिली. या पोस्टमध्ये त्यांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांवर केलेल्या हल्ल्यांचे कौतुक केले आहे. पोस्टद्वारे त्यांनी दहशतवादाच्या क्रूरतेबद्दल आणि सैन्याच्या धाडसाबद्दल बोलले. पहलगाममधील मुलीच्या मानसिक स्थितीबद्दल बोलताना मला पूज्य बाबूजींच्या कवितेतील एक ओळ आठवली: जणू काही, ती मुलगी''.... ती त्यांच्याकडे गेली आणि म्हणाली: है चिता की राख कर में, मांगती सिंदूर दुनिया.. भारतीय सैन्याचे कौतुक करताना अमिताभ बच्चन पुढे लिहिले, जय हिंद, जय हिंद की सेना, तुम्ही कधीही थांबणार नाही; कधीही मागे वळणार नाहीत; कधीही झुकणार नाहीत, अग्निपथ! अग्निपथ! अग्निपथ!!!

### लंडनमध्ये राम चरणचा मेणाचा पुतळा

**लंडन** : दाक्षिणात्य स्टार राम चरणने त्याच्या कारकिर्दीत आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. लंडनमधील प्रतिष्ठित 'मादाम तुसा वॅक्स म्युझियम'मध्ये त्याने त्याच्या मेणाच्या पुतळ्याचे अनावरण केले. चिरंजीवी, सुरेखा आणि उपासना कोनिडेला यांनीही या खास क्षणाला हजेरी लावली. विशेष म्हणजे केवळ राम चरणच नाही तर संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांनी त्याचा पाळीव श्वान राइमची प्रतिकृतीही बनवली आहे. मादाम तुसा वॅक्स म्युझियममधील राम चरणच्या मेणाच्या पुतळ्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये राम चरण त्याचा पाळीव श्वान राइमसह मादाम तुसा स्टेजवर मेणाच्या पुतळ्याचे अनावरण करताना दिसत आहे. या मेणाच्या पुतळ्यात तो सोफ्यावर बसलेला आहे. त्याचा लाडका श्वान राइमदेखील त्याच्या शेजारी आहे. दोघांचा हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.







# 'तिरंग्यातच यावे माझे पार्थिव'

## हुतात्मा अग्निवीर मुरलीची अंतिम इच्छा

**हैदराबाद, ११ मे**

'आई-बाबा मी सीमेवर युद्धासाठी जात आहे. कदाचित परतेन किंवा परतणारही नाही. पण, जर मला या युद्धात वीरमरण आले तर माझे पार्थिव तिरंग्यात गुंडाळले जावे', हे शब्द होते हुतात्मा अग्निवीर मुरली नाईक याचे. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारत-पाकिस्तान सीमेवर पराक्रम गाजवत त्याने आपल्या प्राणांची आहुती दिली.



'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान सीमेवर पाकिस्तानकडून झालेल्या गोळीबारात ९ मे रोजी मुरली नाईक धारातीर्थी पडला. त्याचे पार्थिव गृहनगर गोरंटला येथील कल्लिथंडा या आंध्रप्रदेशातील गावात पोहोचले तेव्हा कुटुंबासह सर्व गावकरी शोकसागरात बुडाले.

अग्निवीर मुरली नाईकचा जन्म ८ एप्रिल २००२ रोजी झाला. लहानपणापासूनच देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगलेल्या मुरलीने अग्निपथ योजनेंतर्गत भारतीय लष्करात प्रवेश मिळवत आपले हे स्वप्न साकार केले. नाशिकमध्ये कठोर परिश्रमानंतर त्याने आसाममध्ये एक वर्ष सेवा दिली आणि सध्या तो पंजाबमध्ये तैनात होता.

ऑपरेशन सिंदूरच्या कर्तव्यावर रवाना होण्यापूर्वी दोन दिवस आधी तो आई-वडिलांशी फोनवर बोलला होता. त्याच्या शेवटच्या इच्छेनुसार त्याचे पार्थिव तिरंग्यात गुंडाळून आणले गेले. आंध्रच्या मंत्र्यांनी मुरलीच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्याच्या अपार बलिदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. आता त्याला शासकीय इतमामात अखेरचा निरोप दिला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

# कंगाल पाकिस्तानचे डोळे उघडणार तरी कधी?

''युद्धाचे आर्थिक परिणाम केवळ जीवित किंवा मालमत्तेची हानी एवढ्या पुरतेच मर्यादित असत नाहीत. कोणत्याही देशासाठी युद्ध हे दीर्घकालीन संरचनात्मक असंतुलन निर्माण करते,'' २०व्या शतकातील सर्वात प्रभावशाली अर्थशास्त्रज्ञांपैकी एक जॉन मेनार्ड केन्स यांचे हे विचार कालातीत आहेत. कोणत्याही देशासाठी युद्ध हे केवळ मनुष्यबळाची हानीपुरतेच मर्यादित राहत नाही. त्याचे भीषण आर्थिक आणि सामाजिक परिणामही सर्वसामान्यांना भोगावे लागतात. मात्र, अवघ्या तीन तासांमध्ये शस्त्रसंधीचे उल्लंघन करणाऱ्या पाकिस्तानच्या राजकर्त्यांना याची जाणीव नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.



### युद्ध महिनाभर सुरू राहिले तर...

शनिवारी भारत पाकिस्तान शस्त्रसंधी करार झाला. मात्र, अवघ्या तीन तासांमध्ये शस्त्रसंधीचे उल्लंघन करत भारतावर नापाक हल्ले केले. भारताविरोधातील संघर्ष वाढविला असता तर पाकिस्तानची अर्थव्यवस्था झाली असती. एकीकडे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे भीक मागणाऱ्या पाकिस्तानने भारताविरुद्ध एक महिना युद्ध सुरू ठेवले तर या संघर्षात पाकिस्तानचे होणारे संभाव्य आर्थिक नुकसानीचे आकडे धडकी भरविणारे आहेत. भारत-पाकिस्तान संघर्ष वाढला तर पाकिस्तानला पुढील चार आठवड्यात किती आर्थिक फटका बसेल यासंदर्भातील वृत्त पाकिस्तानमधील जिओ न्यूजने दिले आहे. पाकिस्तानने एक महिना युद्ध केले तर होणाऱ्या आर्थिक नुकसानीची आकडेवारी काय राहील, हा अभ्यासाचा विषय आहे.

### युद्धावरील एक महिन्याचा खर्च...

- पाकिस्तान हवाई दलास लढाऊ हवाई गस्तीच्या एअर पेट्रोलसाठी दररोज सुमारे **२५ दशलक्ष (मिलियन) डॉलर** खर्च येईल. चार आठवड्यांसाठी हा खर्च तब्बल १ अब्ज डॉलर्सवर गेला असता
- ड्रोन ऑपरेशन्ससह राद व हात्फ-६ क्षेपणास्त्रे ऑपरेशन्सचा खर्च **४५० दशलक्ष डॉलर्स**
- सीमा सज्जता, सैन्य हलवणे, इंधन वापर, रडार, गुप्तचर प्रणाली इत्यादीसाठीचा दररोज सुमारे **१५ दशलक्ष डॉलर्स**



### सद्यःस्थितीत पाकिस्तानची अर्थव्यवस्था



- सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) **२५ अब्ज डॉलर्स**
- वित्तीय अस्थिरता व चलन अवमूल्यन : **१५ अब्ज डॉलर्स**
- व्यापार व पुरवठा साखळी तूट : **१२ अब्ज डॉलर्स**
- थेटर परकीय गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेल्या निधीचे नुकसान : **५ अब्ज डॉलर्स**
- एकूण आर्थिक नुकसान : **५७ अब्ज डॉलर्स**

### पाकिस्तानला आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त कणारा संघर्ष

आकडेवारीवरुन स्पष्ट होत की, पाकिस्तानने भारताबरोबर चार आठवडे जरी युद्ध केल्यास सुमारे ४५० दशलक्ष डॉलर्सचा चुराडा झाला असता. भारतीय चलनातून विचार केल्यास सुमारे ३,७५७.५ कोटी रुपये पाकिस्तानला मोजावे लागले असते.

## चीनने सुरू केले जगातील पहिले एआय हॉस्पिटल

**बीजिंग, ११ मे**

सध्या सगळीकडेच एआय म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सची चर्चा सुरू आहे. यामुळे कामे कशी सोपी होतात, यामुळे मानवाच्या रोजगारावर कसा परिणाम होईल, अशीही चर्चा होते. मात्र, काही देश एआयचा चांगला फायदा करून घेत आहेत. चीनने आता जगातील पहिले एआय हॉस्पिटल सुरू केले आहे.

राजधानी बीजिंगमध्ये हे हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. याचे नाव एजंट हॉस्पिटल असे ठेवण्यात आले आहे, जे शिंघुआ युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी तयार केले आहे. या हॉस्पिटलमध्ये तब्बल १४ एआय डॉक्टर आणि चार परिचारिका आहेत, जे दररोज तीन हजारांहून अधिक रुग्णांवर उपचार करतील.

येथील डॉक्टर आणि परिचारिका लार्ज लँग्वेज मॉडलच्या मदतीने ऑटोनॉमस पद्धतीने चालतात. हे आय डॉक्टर जगातील कोणतीही महामारी रोखण्यासाठी आणि त्यावरील उपचाराच्या सूचना देऊ शकतात. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# पाकिस्तानची सपशेल शरणागती

रविवारची सकाळची पहाट नेहमीप्रमाणे सामान्य होती. सूर्योदय झाला तेव्हा सीमेवरील नागरिकांच्या मनात कुठलीही भीती नव्हती ना आशंका. कारण १९ दिवसांनंतर स्थिती सामान्य झाली. २२ एप्रिलला काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे २६ निष्पाप पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांत तणाव निर्माण होऊन सीमेवर भीषण संघर्ष पेटला होता. यात नुकसान झाले ते सामान्य नागरिकांचेच. भारताने धारण केलेल्या जमदाग्नी अवतारामुळे पाकिस्तानची बोबडी वळली आणि त्याला युद्धविरामाची याचना करावी लागली. ९ मेच्या रात्री पाकिस्तानने जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरात सीमेवरील शहरांना लक्ष्य करीत ड्रोन विमाने आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. अर्थात हे सारे युद्धसाहित्य पाकड्यांना चीन, इराण, तुर्कस्तानकडून भिकेच्या रूपात मिळाले होते. पाकिस्तानने शेकडो ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे भारताच्या दिशेने डागली, पण दोन-तीन ड्रोन्स वगळता भारतीय लष्कराने सर्वच्या सर्व हवेतल्या हवेत नष्ट केली. क्षेपणास्त्रांचीही तीच स्थिती भारताने केली. सीमेवर भारताने तैनात केलेल्या विमान आणि क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेने केलेल्या कामगिरीने साऱ्या जगाने आश्चर्याने तोंडात बोटे घातली. आकाश, नागास्त्र आणि सुदर्शन चक्र यांनी आकाशात असा चक्रव्यूव्ह रचला की पाकिस्तानची शस्त्रे त्याला भेदू शकली नाहीत. भारताकडे जर ही यंत्रणा नसती तर काय झाले असते याची कल्पना न केलेली बरी. त्यामुळे गेल्या १० वर्षांमध्ये भारताने संरक्षण क्षेत्रात केलेला खर्च उगीच नव्हता. त्याचा फायदा भारताला या संघर्षात दिसून आला.

९ मे च्या रात्री भारताने असा काही हल्ला चढविला की पाकिस्तानच्या चार हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले. पाकच्या सिंध प्रांतात असलेल्या खान रहिमयार खान हवाई तळावर तर एक ट्रक सामावेल एवढा खड्डा पडला. याशिवाय राजधानी इस्लामाबादचे जुळे शहर आणि लष्करी मुख्यालय असलेल्या रावळपिंडी हवाई तळावर आगीचे लोळ उठले. अवघ्या काही तासांत हवाई तळांची झालेली दुर्दशा पाहून पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या पायाखालची जमीन सरकली. आणखी काही तास युद्ध सुरू राहिले तर आपली लढण्याची क्षमता पूर्णपणे नट होईल, अशी भीती निर्माण झाली. एफ-१६ आणि जेएफ-१७ ही चिनी बनावटीची विमानेही भारताने हवेत नष्ट केल्याने शरणागती पत्करण्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव पाकिस्तानला झाली. म्हणूनच १० मे रोजी दुपारी ३.३५ ला पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओंना फोन केला. त्यानंतर साडेचार वाजताच्या सुमारास परराष्ट्र मंत्रालयाने काही मिनिटांसाठी पत्रपरिषद घेऊन दोन्ही देशांनी शस्त्रसंधी मान्य केल्याचे जाहीर केले. भारताने शस्त्रसंधीची मागणी केलीच नाही. आम्ही युद्धाची सुरुवात करणार नाही पण शेवट मात्र आम्ही करू, ही भूमिका भारताची राहिली आहे. भारताला अणुयुद्धाची धमकी देणारा पाकिस्तान अवघ्या ९४ तासांच्या संघर्षानंतर शरण आला. त्यातही भारताने केवळ बचावात्मक आक्रमण केले. केवळ बचावच जर एवढा अभेद्य आहे तर आक्रमण किती भयंकर असेल, याची कल्पना पाकिस्तानला आली आणि नाक रगडत शरण यावे लागले. १० मे रोजी दिवसभर पाकिस्तानने अमेरिका, चीन, सौदी अरेबिया, तुर्कस्थान आदी देशांकडे मदतीची भीक मागितली. याचाच परिणाम म्हणजे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी पाकिस्तान आणि भारतीय नेत्यांशी चर्चा केली. युरोपियन युनियन, जी-७, इराण, सौदी अरेबिया या देशांनी शांततेचे आवाहन केले. हा सारा घटनाक्रम पाहता पाकिस्तानची स्थिती लक्षात येते. एवढेच नव्हे तर शस्त्रसंधीनंतर रात्री १२ वाजता पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी देशाला संबोधित करीत अमेरिका, चीनसह डझनभर देशांचे आभार मानले.

शस्त्रसंधी १० मे रोजी सायंकाळी ५ वाजता लागू झाली आणि अवघ्या साडेतीन तासांतच पाकिस्तानने पुन्हा ड्रोन्स डागले आणि सीमेवर गोळीबार केला. जवळपास एक तास पाकिस्तानचा थयथयाट सुरू होता. त्यानंतर रात्री अकरा वाजताच्या सुमारास परराष्ट्र मंत्रालयाने दोन मिनिटांची पत्रपरिषद घेतली आणि पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर लष्कराला योग्य कारवाई करण्याचा आदेश दिल्याचे सांगत पाकिस्तानने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे, असा इशारा दिला. रात्री बारा वाजतानंतर मात्र सीमा शांत झाली. पाकिस्तान हा मिलिटरी, मुल्ला आणि मदरसा या तीन खांबांवर उभा आहे. त्यामुळे फजिती टाळण्यासाठी पाकिस्तानने शस्त्रसंधीचा आधार घेतला असला तरी त्यावर कधीही विश्वास ठेवता येणार नाही. जेव्हा पराभव डोळ्यासमोर दिसू लागतो तेव्हा अमेरिकेकडे धाव घेण्याची जुनी सवय आपल्या शेजाऱ्याला आहे. कारगिल युद्धातही तसेच झाले होते. कारगिलच्या टेकड्यांवर पाकिस्तानी लष्कराने चौक्या स्थापन केल्या होत्या. सैनिक आणि घुसखोरांना हुसकावण्यासाठी भारताला तीन-साडेतीन महिने लष्करी कारवाया कराव्या लागल्या. भारत वरचढ होत असल्याचे दिसताच अमेरिकला हस्तक्षेप करावा लागला होता. विशेष म्हणजे त्यावेळीही शरीफच पंतप्रधानपदी होते. योगायोग असा की त्यावेळी मोठे बंधू नवाज शरीफ, तर आता छोटे बंधू शाहबाज शरीफ पंतप्रधानपदी आहेत. दोन्ही बंधूंच्या कारकीर्दीत पाकिस्तानला दाती तृण धरून शरण यावे लागले. पाकिस्तान शरण येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे १० मे च्या रात्री भारताने स्कार्दू या व्याप्त काश्मीरमधील हवाई तळावर केलेला हल्ला होय. कारण, हा हवाई तळ पाकिस्तान आणि त्याचा खास मित्र चीनच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कारगिल, लेहपासून नियंत्रण रेषेजवळ असलेले स्कार्दू शहर आणि तेथील हवाई तळ जर भारताच्या ताब्यात गेला तर थेट काराकोरमपर्यंत पाकिस्तान, चीनला धोका निर्माण होण्यासारखे होते आणि या हवाई तळावर चिनी बनावटीची जेएफ-१७ ही लढाऊ विमाने तैनात असतात. भारतावर दबाव आणण्यासाठी पाकिस्तान या हवाई तळाचा वापर करतो. स्कार्दू धोक्यात येणे म्हणजे खपालू, बाल्टिस्तान, हुंझा आणि थेट गिलगिटपर्यंत भारत मजल मारू शकतो, याची जाणीव पाकिस्तानला झाली असावी. कारगिलपासून स्कार्दू अवघ्या १७० किलोमीटर अंतरावर आहे. पाकिस्तानने येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधले असून दरवर्षी येथे जगभरातून पर्यटक येत असतात. त्यामुळे स्कार्दूचा धोका पाकिस्तानला पत्करायचा नसावा. स्कार्दू येथूनच लडाख, संपूर्ण काराकोरम पर्वतरांगा, काश्मीर खोरे, गिलगिट आणि सियाचीनवर लक्ष ठेवता येते. १९९९ मधील कारगिल युद्धातही पाकिस्तानने स्कार्दू येथूनच भारतावर मारा केला होता. लष्करीदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या स्कार्दूमध्ये चीनने मोठी गुंतवणूक केली आहे. गिलगिटपासून जाणारा आणि बलुचिस्तानमधील ग्वादार बंदराला जोडणारा महामार्ग चीन आणि पाकिस्तानसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. ३ हजार किलोमीटर लांबीचा आणि चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरचा भाग असलेल्या या महामार्गाच्या संरक्षणासाठी स्कार्दू हवाईतळाचे फार महत्त्व आहे. व्याप्त काश्मीर परत मिळविणे हे भारताचे लक्ष्य आहे. हे लक्ष्य साध्य करायचे असेल तर स्कार्दू, मुजफ्फराबाद आणि गिलगिट या तीन शहरांचा पाडाव करणे आवश्यक आहे. १९९९ मध्ये तशी संधी भारताला आली होती. भारताशी थेट लष्करी पातळीवर पंगा घेणे परवडणार नाही, हे माहीत असल्याने पाकिस्तान दहशतवादाच्या रूपात छद्म युद्धाचा आधार घेत असतो. दोन-अडीच दिवसांच्या या लष्करी संघर्षात भारताने पाकिस्तानला त्याची औकात दाखवून दिली आहे. सीमा पार न करताही अवघ्या दोन-तीन तासांमध्येच चार हवाई तळे नष्ट करण्याची क्षमता भारताकडे असल्याचे पाकिस्तानच्या लक्षात आले. म्हणूनच तर हा पाताळयंत्री आणि विश्वासघातकी शेजारी अमेरिकेकडे याचना करीत गेला आणि मध्यस्थी करण्याची विनंती केली. नेहमीप्रमाणे या छोट्या संघर्षातही भारताचा विजय झाला. पहलगाम घटनेचा बदला तर घेतलाच पण भारतीय लष्कर जगात सर्वोत्कृष्ट आहे हे सुद्धा पुन्हा एकदा सिद्ध झाले.

---

## प्रासंगिक

**भगवान गौतम बुद्धांनी मानवतेसाठी दिलेले अफाट ज्ञान काही सनातन धर्माच्या विरोधकांनी आणि मानवताविरोधी कार्यकर्त्यांनी आणि संघटनांनी या ज्ञानाचे अपहरण केले जेणेकरून राजकीय आणि स्वार्थी हेतूंसाठी समाजातील विविध घटकांमध्ये कलह आणि द्वेषाचे बीज पेरता येईल. हे मानवताविरोधी लोक भगवान बुद्धांच्या अफाट ज्ञान आणि शिकवणींविरुद्ध सक्रियपणे काम करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माला प्राधान्य दिले कारण तो सनातन धर्माच्या ज्ञानाशी सुसंगत आहे. भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रमुख संकल्पना, सनातन धर्माशी असलेले त्यांचे संबंध आणि इस्लामने बौद्ध धर्माचा नाश कसा केला याचा आपण शोध घेऊया.**

# भगवान गौतम बुद्धः तत्वे, सनातन धर्म आणि इस्लामिक आक्रमण

- पंकज जयस्वाल मो.७८७५२१२१६१

भगवान बुद्धांनी व्यक्त केलेली मध्यम मार्ग संकल्पना

बुद्ध पौर्णिमा, गौतम बुद्धांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि परिनिर्वाणाचा सन्मान करते. गौतम बुद्धांनीच बौद्ध धर्म निर्माण केला. त्यांनी इंद्रियभोग आणि कठोर तपस्या यांच्यातील मध्यम मार्गाचा उपदेश दिला जो निर्वाणाकडे नेतो, जो अज्ञान, तळमळ, पुनर्जन्म आणि दुःखापासून मुक्तता देतो. त्यांच्या शिकवणींचा सारांश उदात्त अष्टांगिक मार्गात दिला आहे, जो नैतिक प्रशिक्षणाला ध्यान पद्धतींसह इंद्रियसंयम, इतरांप्रती दया, सजगता यावर भर देतो.

बुद्धांनी अवलंबित उत्पत्तीचे त्यांचे विश्लेषण शाश्वतता ( चिरंतन टिकते असा विश्वास) आणि विनाशवाद (मृत्यूच्या वेळी आपण पूर्णपणे नाहीसे होतो असा विश्वास) यांच्यातील मध्यम मार्ग म्हणून पाहिले. या दृष्टिकोनानुसार, लोक केवळ अनंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, स्वतंत्र किंवा कायमस्वरूपी 'स्व' नसलेल्या, क्षणिक मानसिक-भौतिक पैलूंची इच्छा करतात. त्याऐवजी, बुद्ध सनातन धर्माच्या तत्त्वांवर विश्वास ठेवत होते की आपल्या अनुभवातील प्रत्येक गोष्ट क्षणभंगुर आहे आणि अंतर्मुख शक्ती (आत्मा) शाश्वत आहे. रिचर्ड गोम्ब्रिच यांच्या मते, बुद्धांची भूमिका अशी आहे की सर्वकाही प्रक्रिया आहे.

दोन टोके आहेतः सुखवाद (अति इंद्रिय सुख, भौतिकवाद, विलास) आणि तपस्वीपणा (तीव्र उपवास आणि दुःख). दोन्ही टोके एखाद्याच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी हानिकारक आहेत. म्हणून, मध्यम मार्ग स्वीकारला पाहिजे. उदात्त आठपदरी मार्ग स्वीकाराः योग्य दृष्टीकोन, योग्य हेतू, योग्य विचार , योग्य कृती, योग्य उपजीविका, योग्य प्रयत्न, योग्य सजगता आणि योग्य एकाग्रता. परंतु चांगले आणि वाईट काय आहे यावर आग्रह धरू नका, अन्यथा तुम्ही स्वतःला एकाच टोकात अडकवाल. मूलभूतपणे, तुमची इच्छा जितकी तीव्र असेल तितके तुम्हाला जास्त दुःख अनुभवावे लागेल. यामध्ये मीच बरोबर असण्याची इच्छा समाविष्ट आहे. मीच बरोबर असण्याचा आग्रह धरणे अहंकारी आहे; अहंकार निराशा किंवा क्रोधाकडे नेतो, या दोन्हीमुळे वेदना होतात. इच्छा थांबली की दुःख नाहीसे होते.

भगवान गौतम बुद्ध आणि त्यांचा सनातन धर्माशी संबंध

जागृतीपूर्वी, बुद्धांनी सनातन धर्माची तत्त्वे आणि तंत्रे, ज्यात योग आणि तत्वज्ञान यांचा समावेश होता, आत्मसात केले होते. दलाई लामा यांचे म्हणणे आहे कीः बौद्ध धर्म ही हिंदू धर्माची एक शाखा आहे असा दावा करण्यासाठी काही लोक माझ्यावर हल्ला करतात. परंतु हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म एकमेकांच्या विरुद्ध आहेत असा दावा करणे वास्तवाच्या विरुद्ध असेल.

-संदर्भः संस्कृत वाचक १ः अ रीडर इन संस्कृत लिटरेचर, पृष्ठ १७, हैको क्रेट्सचमेर

टी.डब्ल्यू. राइस-डेव्हिड्सः बौद्ध धर्म, पृष्ठ ११६-११७, उद्धृतः

हजार वर्षांच्या वनवासानंतर बौद्ध धर्म भारतात परतत आहे आणि, म्हणीप्रमाणे, उधळपट्टी केलेल्या पुत्राप्रमाणे, उघड्या हातांनी स्वागत केले जात आहे. सरासरी हिंदूंची धार्मिक सहिष्णुता सकारात्मक प्रतिक्रियेत योगदान देते. अधिक महत्त्वाचे म्हणजे,



बुद्ध आणि बौद्ध धर्म हिंदू चेतनेत खोलवर रुजलेले आहेत. बुद्ध हिंदू होते. बौद्ध धर्माचे मूळ आणि विकास हिंदू आहे, ज्यामध्ये कला आणि वास्तुकला, प्रतिमाशास्त्र, भाषा, श्रद्धा, मानसशास्त्र, नावे, नामकरण, धार्मिक प्रतिज्ञा आणि आध्यात्मिक शिस्त यांचा समावेश आहे.... हिंदू धर्म पूर्णपणे बौद्ध नाही, परंतु बौद्ध धर्म हा मूलभूतपणे हिंदू असलेल्या नीतिमत्तेचा एक भाग आहे. बौद्ध धर्माला हिंदू वारशाचा एक भाग मानले जाते कारण बुद्धाने कधीही असे म्हटले नाही की ते एक नवीन धर्म स्थापन करत आहेत; उलट, त्यांनी अस्तित्वात असलेल्या धर्मात काही बदल केला. गौतम बुद्ध भिक्षू बनले आणि नंतर त्यांनी सर्वांना भिक्षू कसे व्हायचे हे शिकवले. त्यांनी कधीही देवी -देवतांचा त्याग केला नाही. त्यांनी बुद्ध (ज्ञानी) होण्याला प्राधान्य दिले.

हिंदू धर्मात, आपण जप करतोः गुरू ब्रह्मा गुरू विष्णु, गुरु देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः याचा संक्षिप्त अर्थ प्रथम गुरु आहे. असा होतो. बुद्धांनी तीच गोष्ट पुन्हा स्थापित केली. गुरुऐवजी, त्यांनी बुद्धाचा उल्लेख केला. बुद्ध म्हणजे पूर्णतः ज्ञानी व्यक्ती. दुसऱ्या एका बौद्ध उताऱ्यात असे म्हटले आहे, भवतु सब्ब मंगलं रखन्तु सब्ब देवता याचा अर्थ प्रत्येकाला समृद्धी आणि शांती मिळावी. वेदांमध्ये सर्वे सुखिनो भवन्तु म्हणजे जगातील सर्व लोक आनंदी राहावेत.

त्रिपिटक, ज्याला सामान्यतः पाली कॅनन म्हणून ओळखले जाते, हा भगवान बुद्धांच्या बोललेल्या शिकवणींचा संग्रह आहे. ते शिकवणीच्या तीन भागात विभागले आहेः अभिधम्म पिटक (तात्विक शिकवणी), विनय पिटक (मठांचे नियम) आणि सुत्त पिटक (प्रवचन).

जातक कथाः जातक कथा या बुद्धाच्या जन्मांबद्दलच्या कथा आहेत ज्या हिंदू श्रद्धा आणि देवतांशी मिळत्याजुळत्या आहेत. त्यामध्ये बहुतेकदा हिंदू साहित्यातील पात्रे आहेत.

पाली कॅनन संदर्भः बौद्ध शिकवणींच्या सर्वात जुन्या संग्रहांपैकी एक असलेल्या पाली कॅननमध्ये हिंदू रीतिरिवाज आणि देवतांचे संदर्भ आहेत, जे बुद्धाचे जीवन हिंदू धर्माशी अविभाज्यपणे जोडलेले होते हे दर्शविते.

बौद्ध धर्माची गुरुकिल्ली असलेल्या कर्म आणि धर्माच्या कल्पना हिंदू तत्वज्ञानात तितक्याच प्रमुख आहेत. ज्ञानाविषयी बुद्धाच्या शिकवणी हिंदू विचारांचे पुनर्रचना होत्या, त्यापासून पूर्णपणे विचलन नव्हते.

उपनिषदांमध्ये जे काही सांगितले आहे तेच बुद्धाने सांगितले आहे! बुद्धाने कधीही असा दावा केला नाही की सर्व ऋषी किंवा संत चुकीचे होते. ते म्हणाले, माझ्या आधी अनेक बुद्ध होऊन गेले आहेत आणि माझ्या नंतरही अनेक येतील. बुद्धाचा आश्रय घ्या. तुमच्या आत एक बुद्ध आहे. तुमच्या आत असलेल्या बुद्ध-स्वभावाचा आश्रय घ्या.

मोक्षार्थं संस्थितानां तु मोहायाखिलदेहिनाम्।

बुद्धत्वं समनुप्राप्य भविष्याम्यन्यजन्मना।।

भाषांतर असे आहेः प्राण्यांना भ्रमित करण्यासाठी आणि मुक्ती मिळवण्यासाठी, मी दुसऱ्या जन्मात बुद्ध म्हणून अवतार घेईन. संदर्भः पद्म पुराणानुसार, बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे जो मुक्तीचा मार्ग (मोक्ष) प्रदान करण्यासाठी तसेच सध्याच्या पद्धती बदलण्यासाठी जन्म घेतो. हे सनातन धर्मात प्रचलित असलेल्या धर्माच्या संकल्पनेशी सुसंगत आहे. हे विष्णू, आम्ही तुमच्या बुद्ध अवताराला नमन करतो, तो महान देव जो निष्पाप प्राण्यांची कत्तल थांबवण्यासाठी आणि भ्रष्ट आणि अयोग्य बनलेल्या यज्ञ समारंभांना थांबवण्यासाठी येथे आला होता! - देवी भागवत पुराण १०.५.मत्स्यापासून सुरुवात करून भगवान विष्णूच्या १० अवतारांचे गुणधर्म वर्णन केले आहेत. बुद्धांना शांत, लांब कान आणि गोरा रंग असलेले, वस्त्र परिधान केलेले, कमळावर बसलेले, पाकळ्या वरच्या दिशेने असलेल्या आणि कृपा आणि संरक्षण देणारे म्हणून चित्रित केले पाहिजे. - अग्नि पुराण ४९.१-८ इस्लामी आक्रमकांनी बौद्ध धर्माचे नुकसान केले. मुस्लिम आक्रांतांनी भारतातील बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात निर्दयीपणे नाश केला, देशातील प्रतिष्ठित विद्यापीठांवर हल्ला केला, भिक्षूंची हत्या केली आणि ग्रंथालये जाळली, यासह इतर गोष्टी केल्या. त्यांनी हिंदूंचेही असेच केले, परंतु प्राचीन भारतात सर्वत्र हिंदू होते; ते सर्व मिळवू शकले नाहीत. बौद्ध धर्म मठांमध्ये अधिक केंद्रीकृत होता कारण तो भिक्षूंवर जास्त अवलंबून होता आणि सामान्य लोकांमध्ये कमी प्रमाणात पसरला होता, ज्यामुळे तो विघटनासाठी लक्षणीयरीत्या असुरक्षित होता. बौद्ध धर्माने त्यावेळी सामान्यतः लढाईचा त्याग केला, परंतु हिंदू धर्मात त्याचे रक्षण करण्यासाठी एक योद्धा वर्ग होता. मानवतेला लक्षात ठेवून शांततापूर्ण आणि समृद्ध जगासाठी हिंदू आणि बौद्धांना एकत्र येण्याची वेळ आली आहे.

---

## वेध

पुंडलिक आंबटकर

# आत्मनिर्भर भारत आणि आव्हाने

१२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत अभियानाची घोषणा केली. २०४७ पर्यंत भारताला आत्मनिर्भर करण्याची ग्वाही सरकारने दिली आहे. परंतु, जोपर्यंत नागरिक स्वदेशी उत्पादनांना प्राधान्य देत नाही तोपर्यंत ठरवूनही सरकार देशाला आत्मनिर्भर बनवू शकत नाही. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नावाढीचा वेग सर्वाधिक आहे. मात्र, दरडोई उत्पन्नात भारत खूपच पिछाडीवर आहे. अशाही परिस्थितीत मोदी सरकारच्या काळात भारताचे दरडोई उत्पन्न जवळपास दुप्पट झाले आहे. चीन हा भारताचा प्रमुख आयात भागीदार आहे. लॅपटॉप, कॉम्प्युटर, मोबाईल आदींसाठी लागणारा कच्चा माल किंवा ही उपकरणेच आपल्याला चीनकडून घेण्याशिवाय अन्य सोपा पर्याय नाही. मेक इन इंडियाच्या माध्यमातून देशांतर्गत उत्पादनांवर जोर देण्यात येत आहे. भारत ३,७५० अब्ज डॉलर्ससह जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्याचे सांगितले जाते. परंतु, पर्चेसिंग पॉवर पॅरिटीच्या अहवालानुसार, भारत सध्या जगातील तिसरी सवात मोठी अर्थव्यवस्था आहे. भारत चालू वर्षात ५ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठू शकतो. परंतु, चीनला टक्कर द्यायची असेल तर स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढला पाहिजे. टाटा ग्रुप्स, एअरटेल, अमूल, पतंजली अशा अनेक कंपन्या स्वदेशी उत्पादनात आघाडीवर आहे. भारतीय अर्थव्यवस्था जसजशी वाढत आहे, तसतशी शक्य तितकी स्वदेशी उत्पादने खरेदी करून आपण आपल्या अर्थव्यवस्थेला हातभार लावू शकतो. भारतीय उत्पादने टिकाऊ व परिणामकारक असल्याने जगाचा कल आपल्याकडे वाढत आहे. भारत आजपर्यंत संरक्षण क्षेत्रात इतरांवर अवलंबून होता. परंतु, डीआरडीओने अचूक व परिणामकारक अस्त्रांची निर्मिती करून खळबळ उडवून दिली आहे. आर्मेनियाने भारतीय अस्त्रांच्या जोरावर अझरबैझानला गुडघे टेकण्यास भाग पाडले. संरक्षण सामर्थ्यात चौथ्या क्रमांकाची महासत्ता म्हणून भारताचा उदय झाला आहे. भारताने एस-४०० आणि स्वदेशी अस्त्रांच्या जोरावर पाकिस्तानला चारीमुंड्या चित केले. आकाश या स्वदेशी हवाई संरक्षण प्रणालीने पाकिस्तानशी झालेल्या संघर्षात अचूक मारा करून संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले आहे.

अंतराळ संशोधनातही जगाला मागे टाकून भारत अमेरिकेशी स्पर्धा करू लागला आहे. इस्रोने अनेक विक्रम केले असून गगनयान मोहीम अंतिम टप्प्यात आहे. इस्रो व डीआरडीओच्या माध्यमातून परकीय चलनाचा ओघ वाढला आहे. दशकभरापूर्वी भारत संरक्षण सामुग्री आयात करणारा सर्वात मोठा देश होता. परंतु, आता भारताची अस्त्रे खरेदी करण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली आहे. भारतीयांनी स्वदेशी उत्पादनांचा वापर केल्यास नोकऱ्या वाढून बेरोजगारीची समस्या निवळण्यास मदत होईल. मोदी सरकारने देशात मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक आणली आहे. चीन याच जोरावर सामर्थ्यशाली बनला. ही बाब हेरूनच सरकारने विदेशी कंपन्यांना आपले दरवाजे खुले केले आहे. चीनने १९७९ मध्ये आर्थिक सुधारणा लागू केल्यानंतर झपाट्याने प्रगती साधली. भारताने या सुधारणा १९९१ मध्ये लागू केल्या. आज भारताची लोकसंख्या सर्वाधिक असली तरी आपल्या वाट्याला फक्त २.४ टक्के इतकाच भूभाग उरला आहे. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड मर्यादा येतात. अशाही परिस्थितीत सरकारकडून तरुणाईच्या ऊर्जेचा वापर देशाच्या विकासासाठी करून घेतला जात आहे. केवळ नोकऱ्या देणारा व नोकऱ्या मागणारा देश ही व्याख्या खोडून काढण्यासाठी सरकारकडून युवकांना उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. विदेशी साहित्यांवर भारत सरकारकडून कर आकारणी केली जाते. यातून बऱ्यापैकी महसूल प्राप्त होतो. परंतु, त्यापेक्षा कित्येक पट भारतीय पैसा विदेशात जातो. त्यामुळेच सरकारने आत्मनिर्भर भारत हे अभियान सुरू केले आहे. भारत किमान आज तरी न्यूक्लियर रिॲक्टर, बॉयलर्स पार्ट्स, रासायनिक खते आणि केमिकल्ससाठी चीनवर अवलंबून आहे. मोबाईलबाबतही हीच स्थिती आहे. ही कोंडी फोडण्यासाठी भारतालाही कमी किमतीत दर्जेदार वस्तू तयार कराव्या लागतील. मोदी सरकारने चीनबरोबर १० अब्ज डॉलर्सचा व्यापारी करार नव्याने केला आहे. बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपच्या अहवालानुसार भारताच्या औषधी उद्योगातील कच्च्या मालापैकी ९० टक्के माल चीनकडून आयात केला जातो. भविष्यात भारताची स्पर्धा चीनसोबतच राहणार असल्याने यादृष्टीने आता वेगळे निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. आत्मनिर्भर भारत वाणिज्य, व्यापार, जैवविविधता आणि कृषी क्षेत्रात उद्योजकीय उपक्रमांना संधी प्रदान करणारा उपक्रम ठरत आहे. याच माध्यमातून २०४७ पर्यंत भारत जगाला मागे टाकून चीनला टक्कर देईल, यात शंका नाही.

९८८१७१६०२७

---

## वाचक पत्रे

### शतचंडी यज्ञाचे महत्त्व


शतचंडी यज्ञाचे महत्त्व विविध दृष्टीने आहे. आध्यात्मिक दृष्टिकोनातून हा यज्ञ दुर्गादेवीच्या शक्तीचे आवाहन करतो. देवीच्या सप्तशतीचे पठन म्हणजेच चंडीपाठ हा नकारात्मक शक्तींवर विजय मिळविण्याचे साधन मानला जातो. भारत देशाच्या आणि आपल्या सैनिकांच्या रक्षणासाठी तसेच विजयासाठी, राष्ट्रीय ऐक्यासाठी शक्तिप्रदायक ठरतो. धार्मिक एकात्मतेचे प्रतीक म्हणून, विविध संप्रदायांचे संत, भक्त, साधक, मंत्री व हिंदुधर्मप्रेमी या यज्ञात एकत्र येत आहेत. हे समाजातील धार्मिक ऐक्याचे जिवंत उदाहरण आहे.

सांस्कृतिक आणि आध्यात्मिक पुनरुत्थानाचे केंद्र म्हणून शतचंडी यज्ञ कार्य करतो. हिंदू संस्कृतीतील यज्ञसंस्कार हे केवळ कर्मकांड नव्हे, तर आत्मशुद्धी आणि राष्ट्रशुद्धीचे प्रभावी माध्यम आहे. सनातन राष्ट्र स्थापनेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून फोंडा, गोवा येथे २० ते २२ मे २०२५ या कालावधीत शतचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळले. हा यज्ञ २५ विद्वान पुरोहितांद्वारे करण्यात येणार आहे. या महान यज्ञात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडावा आणि आपल्या राष्ट्राचे तसेच सैनिकांचे रक्षण व्हावे हीच प्रार्थना!

**हृषीकेश हरदास**/वर्धा

### उन्हाळ्यात आंबा म्हणजे अमृतच

सध्या आंब्याचा हंगाम सुरू आहे. बाजारात सगळीकडे आंब्याचा घमघमाट पसरला आहे. त्या सुगंधाने आपले घ्राणेंद्रिये उत्तेजित होतात. राष्ट्रीय प्राण्याचे, पक्ष्याचे, फळाचे महत्त्व श्रेष्ठ असते. जसे सिंहाला प्राण्यांचा राजा म्हटले जाते, तसेच



उन्हाळ्याचा दिवसातच नव्हे तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या रूपाने उपयोगी असलेला सगळ्यांना त्याच्या प्रत्येक रूपात प्रिय असलेला आंबा हा एकमेवाद्वितीय आहे. कुठल्याही शुभकार्यात त्याच्या पानांशिवाय कुणाचे पान हलत नाही. आंबा पिकितो, रस गळीतो कोकणचा राजा झिम्मा खेळीतो हा खेळ खेळत लहानाचे मोठे झालो. म्हणजे भारत सरकारने कोकणाला हापूस आंब्यांचं मानांकन असलेलं पेटंट दिलं तरी आम्ही फार आधीच देऊन मोकळे झालो आहोत.

आंबा, मग तो कोणत्याही जातीचा का असेना आम्हाला सारखाच प्रिय. रंग, गंध, रूप, रस, स्पर्श या निकषावर सगळेच खरे उतरतात. आमच्याकडे एकदा दिराने सहा-सात प्रकारचे प्रकारचे आंबे आणले. प्रत्येक आंब्याची चव आम्ही दहा-बारा जणांनी एका वेळी चाखली त्याने आनंद द्विगुणित झाला आणि प्रत्येकाला ब्रह्मानंदाचा आनंद मिळाला. अमृत मंथनाच्या वेळी कलशातून शेवटी जे अमृत प्राप्त झाले असेल ते आंब्याच्या रसासारखे तर नसेल अशी शंका मला आपली नेहमी येते. लहानपणी आम्ही आमच्या आत्याकडे खास आंबे खायला जायचो. एक स्वतंत्र आंब्याची खोली तिथे असायची त्यात शेकडोंनी छोटे छोटे आंबे तणसात पिकायला ठेवले असायचे. त्याचा घमघमाट घरभर पसरायचा. आंबा अनलिमिटेड मिशन रोज असायचे. कोईंना लागलेले केस दातात अडकायचे पण आंबे यथेच्छ खाल्ले जायचे. आताही कैरीचे विविध प्रकार, जसे मोहरीचे लोणचे, गोड लोणचे, तक्कू, गुळांबा, खुला, पुढे आंब्याचा रस, आम्रखंड, अंबापोळी, शेक, पल्प, आईस्क्रीम कितीतरी प्रकारांनी सेवन वर्षभर सुरू असते. आंबा खाल्लयाने शुगर वाढते, वजन वाढते, गरम होतो हा विचार एकदा बाजूला ठेवून हंगामामध्ये एकदा तरी खावाच.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### 'सिंदूर'चे राजकारण थांबवले पाहिजे

'ऑपरेशन सिंदूर' भारतासाठी अत्यंत गौरवाचे आहे. या मोहिमेने संपूर्ण देशातील जनतेचे मन अभिमानाने भरून आले. या घटनेतून संपूर्ण देश एकसंध झाला. मात्र दुर्दैवाने काही राजकारणी या ऐतिहासिक आणि गौरवशाली घटनेचा उपयोग केवळ राजकीय फायद्यासाठी करताना दिसत आहेत. विरोधासाठी विरोध करणे, सरकारच्या किंवा लष्कराच्या कार्यक्षमतेवर शंका घेणे हे केवळ दूषित मानसिकतेचे लक्षण आहे. जेव्हा देश एकत्र उभा राहतो, तेव्हा त्याला दुर्बल बनवण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. जनता आता जागृत झाली आहे. ती केवळ प्रचारावर आणि खोट्या आरोपांवर विश्वास ठेवत नाही. म्हणूनच, जे कोणी राष्ट्रहिताच्या विरोधात जातील, त्यांच्या विरोधात जनता नक्कीच आपला निर्णय देईल याची जाणीव असू द्यावी. राष्ट्रप्रेमाला राजकीय सीमेत अडकवू नका. यामुळेच सनातन राष्ट्रासारख्या मूल्याधिष्ठित व्यवस्थेची आवश्यकता अधोरेखित होते. जी केवळ राजकारण नव्हे, तर राष्ट्रधर्म आणि संस्कृतीला सर्वोच्च मानते.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आरटीओच्या राज्यातील सीमा चौक्या लवकरच होणार बंद!

## विभागाचा सरकारला अहवाल सादर

## अदानी कंपनीला द्यावे लागणार ५०४ कोटी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.११ मे**

वस्तू व सेवाकर (जीएसटी) प्रणालीच्या लागू झाल्यापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या राज्यातील सर्व मोटार परिवहन सीमा चौक्या कायमस्वरूपी बंद होणार आहेत. वाहनधारकांकडून होणाऱ्या वसुलीबाबत वाढत्या तक्रारीला त्यामुळे आळा बसणार आहे. मात्र राज्य सरकारला कंपनीला ५०४ कोटी रुपये नुकसान भरपाईपोटी मोजावे लागणार आहेत.

राज्यात ये-जा करणाऱ्या वाहनावर नियंत्रण ठेवणे, परिवहन नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि रस्ते कर वसूलसाठी १९६६ मध्ये परिवहन विभागाकडून



सीमा चौक्या स्थापन करण्यात आल्या आहेत. होता. मात्र देशात सर्वत्र जीएसटी लागू झाल्यानंतर व डिजिटल अंमलबजावणीच्या उपाययोजनां मध्ये झालेल्या प्रगतीमुळे प्रत्यक्ष चौकशीसाठी स्थापन केलेल्या या सीमा चौकींची आवश्यकता राहिलेली नव्हती. या ठिकाणावरून बेकायदेशीरपणे अनावश्यक वसुली केली जात आहे, अशा तक्रारी राज्य ट्रान्सपोर्ट

> सीमा चौक्या बंद झाल्याने वाहतूकदारांच्या अडचणी दूर होतील,रस्ता सुरक्षेमध्ये सुधारणा आणि आंतरराज्य वाहतूक सुरळीत करणे आणि व्यावसायिक वाहनांच्या हालचालीतील अडथळे दूर होण्यास मदत होणार आहे. त्याबाबतचा अहवाल समितीने मुख्यमंत्र्यांना पाठवला आहे
> **- प्रताप सरनाईक (परिवहन मंत्री)**

युनियनने वारंवार सरकारकडे केली होती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनीही या चौक्या बंद करण्याचे निर्देश परिवहन विभागाला दिले होते. त्याबाबत विभागाने अनुषंगाने प्रशासकीय त्रुटी दूर करून सकारात्मक अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर केला आहे. त्यांच्या मंजुरीनंतर राज्याच्या सीमेवरील चेकपोस्ट बंद करण्यात येतील.

मात्र त्यासाठी महाराष्ट्रात मोटार परिवहन व सीमाशुल्क विभाग यांच्या एकत्रित तपासणी नाक्यांसाठी इंटिग्रेटेड चेक पोस्ट प्रकल्प राबवून त्यांचे कंत्राट में अदानी प्रा.लि. कंपनीला देण्यात आले होती.त्याबाबतीत केलेल्या करारनुसार सीमा नाके बंद करावयाचे झाल्यास संबंधित संस्थेला नुकसान भरपाई म्हणून ५०४ कोटी रुपये अदा करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित तंत्रज्ञान व स्थावर मालमत्ता परिवहन विभागाच्या मालकीची होणारं आहे. या संदर्भातील प्रस्ताव परिवहन विभागाकडून मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

या संदर्भात परिवहन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने या निर्णयाचे परिणाम व परिणाम कारकता यांचा सखोल अभ्यास केला. या अहवालाच्या आधारे शासनाने हे निष्कर्ष काढले की, ऑनलाईन प्रणाली व इलेक्ट्रॉनिक देखरेखीद्वारे प्रत्यक्ष चौकशीची गरज प्रभावीपणे बदलता येऊ शकते. या संक्रमणामुळे कार्यक्षमतेत वाढ, विलंब कमी होणे आणि गैरप्रवृत्ती रोखण्यास मदत होईल. या निर्णयामुळे महाराष्ट्र १८ इतर राज्यांप्रमाणे आधुनिक, कागदविरहित व तंत्रज्ञानाधिष्ठित परिवहन देखरेखीच्या प्रणालीचा अवलंब करणाऱ्या राज्यांमध्ये समाविष्ट होतो आहे.

# माध्यमकर्मींनी उपेक्षित महिलांचा आवाज बनावे


## विजया रहाटकर; एकदिवसीय महिला माध्यमकर्मी संमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ११ मे-**

महिलांना सक्षम केल्याशिवाय देशाची प्रगती अशक्य आहे. त्यामुळे माध्यमक्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांनी विशेष करून महिला सक्षमीकरणामध्ये योगदान द्यावे. त्यांनी ग्रामीण आणि उपेक्षित महिलांचा आवाज बनावे, असे मत महिला आयोगाच्या राष्ट्रीय अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्त केले.

आयएमडीआरच्या वीर सावरकर सभागृहात आयोजित व्हीएसके पुणे फाउंडेशन संचालित विश्व संवाद केंद्रातर्फे आयोजित 'महिला माध्यमकर्मी संमेलन २०२५'च्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. महिला माध्यम कर्मींनी आपल्या वार्तांकनातून बदल घडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन रहाटकर यांनी केले.

त्या म्हणाल्या, जसे आई प्रेम, लाड करते, प्रसंगी कठोर होऊन रागावतेही, अशा मातृत्व भावामधून महिलांनी पत्रकारिता करावी. स्वतःच्या क्षमता ओळखून



महिलांनी पुढे यायला हवे. सक्षम असतानाही सादरीकरणाअभावी त्यांनश्र नेतृत्वाची संधी मिळत नाही. महिलांनी आता स्वतः ब्रँड बनत सर्वच क्षेत्रात नेतृत्त्व करावे. यावेळी विश्व संवाद केंद्राचे कार्यवाह नितीन देशपांडे, प्रशासकीय अधिकारी शिल्पा पोफळे उपस्थित होते. उद्घाटन सत्रात ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी माध्यम, विचारसरणी आणि त्याचे काळानुरूप गणित समजावून सांगितले. ते म्हणाले, माध्यम क्षेत्रात स्वतःची शैली विकसित करत स्वतःचे प्रेक्षक तयार करायला हवेत. माध्यमकर्मींनी 'स्टोरी टेलर' नाही, तर 'स्टोरी चेंजर' बनायला हवे. महिलांनी स्वतःच्या क्षमता ओळखत धारिष्ट्य वाढविण्याचा प्रयत्न करायला हवे.

यावेळी केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, कार्यक्रम प्रमुख ज्येष्ठ पत्रकार प्रतिभा चंद्रन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक डॉ. रवींद्र वंजारवाडकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सह कार्यवाह महेश करपे, प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री आदी उपस्थित होते. संमेलनात दुपारी 'माध्यमातील मी' या परिसंवादात प्रा. डॉ. उज्ज्वला बर्वे, सकाळच्या सहयोगी संपादक मृणालिनी नानिवडेकर, एबीपी माझा वृत्तवाहिनीच्या संपादिका सरिता कौशिक, आर. जे. शोनाली यांनी आपले अनुभव मांडले. संवाद सत्राचे समन्वय साप्ताहिक विवेकच्या संपादक अश्विनी मयेकर यांनी केले. कृत्रिम प्रज्ञेचा माध्यम क्षेत्रातील वापरावर प्रा. प्रांजली देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी केंद्राच्या संपादक अंजली तागडे व्यासपीठावर उपस्थित होत्या. पश्चिम महाराष्ट्रातील १०० हून अधिक महिला माध्यमकर्मी या संमेलनास उपस्थित होत्या.

# ना.घ. देशपांडे स्मृतिदिनाप्रित्यर्थ कविसंमेलन, ग्रंथ प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**मेहकर, दि. ११ मे-**

अखिल भारतीय साहित्य परिषद आणि काव्यप्रेमी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने, कविश्रेष्ठ ना.घ. देशपांडे यांच्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ, जिजामाता कन्या विद्यालय मेहकर येथे काव्यसंमेलनाचा व ग्रंथ प्रकाशनाचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास परतवाडा येथील हास्यकवी, लेखक डॉ. राजाभाऊ धर्माधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी त्यांच्या खुमदार शैलीत हास्याचा खळखळाट प्रेक्षकांच्या अंतरंगात पेरला. कार्यक्रम दोन सत्रात पार पडला.

प्रथम सत्रात पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न झाला. या सत्रात प्रा. वसंत गिरी यांच्या 'हास्यगिरी' (भाग १) आणि डॉ. अभिमन्यू मगर यांच्या 'शेगांवीचे श्री. संत गजानन महाराज' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. प्रास्ताविक व मान्यवरांचा परिचय जयश्री कविमंडन यांनी केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद प्रा.वसंत गिरी यांनी भूषविले. तर प्रमुख



अतिथी म्हणून डॉ. राजाभाऊ धर्माधिकारी, जयश्री हेमंत कविमंडन, डॉ. अभिमन्यू मगर हे लाभले होते. प्रा. वसंत गिरी यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन संजय भारती यांनी केले तर आभार सुनिता इंगळे यांनी मानले. दुसऱ्या सत्रात काव्य संमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. राजाभाऊ धर्माधिकारी यांनी भूषविले. प्रमुख अतिथ म्हणून संजय भारती आणि रामदास राजेगांवकर हे लाभले होते. काव्य संमेलनास भरपूर रसिक वर्ग उपस्थित होता. तसेच भरपूर कवींनी उपस्थिती लावली. यामध्ये रामदास कोर्डे, अरुण गवई, दिगंबर गाडे, शत्रुघ्न कुसुंबे, विजय पळसकर, मनोहर पवार, रा.ग.सोनुने, द.रा. गोसावी, शाहिर ईश्वर मगर, सुभाष मगर, डॉ. अभिमन्यू मगर, तानाजी वाघ, मोहन पवार, डॉ. पुरुषोत्तम रेखाते, माधुरी कुळकर्णी, पुष्पा पाटणकर, पूजा मुळे, जयश्री कविमंडन, संजय भारती, अशोक सारडा तर जवळपास ३३ कवींनी आपल्या आपल्या रचना सादर करुन रसिकांना खिळवून ठेवले होते. अध्यक्षीय भाषणात कविता सादर करुन डॉ. राजाभाऊ धर्माधिकारी यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचलन जयश्री कविमंडन यांनी केले तर पूजा मुळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.वसंत गिरी, रामदास राजेगावकर, प्रा. मेघराज शिंदे, गजानन म्हस्के यांनी मेहनत घेतली.

# अनुपस्थित कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करून दक्ष कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या करा

## मोहोळच्या ग्रामीण रुग्णालयाच्या भेटीप्रसंगी खासदार प्रणिती शिंदे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. ११ मे-**

अनुपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांची त्वरित हकालपट्टी करून दक्ष कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना खासदार प्रणिती शिंदे यांनी भ्रमणध्वनीवरून दिल्या.

रुग्णालयातील रुग्णांची विविध सोयी सुविधांच्या अभावामुळे हेळसांड होत होती. ही अतिशय गंभीर आणि आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेली बाब कानावर गेल्यामुळे खासदार शिंदे यांनी अचानक मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन खासदार प्रणितीताई शिंदे यांनी शनिवारी मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयाला अचानक भेट दिल्यानंतर त्यांनी या सूचना दिल्या.

कर्मचाऱ्यांशी बोलताना त्या म्हणाल्या, तुम्ही अधिकारी आणि कर्मचारी माणसंच आहात मग रुग्णालयातील गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्णांना जनावरांसारखी वागणूक का देताय? इथे स्वच्छता आणि पाण्याची सोय नसेल तर तुम्ही उपचार तर नक्की काय करताय? इमारतीमधील अस्वच्छता आणि जाळी तुमच्या अकार्यक्षम कारभाराची साक्ष देत आहे तर तुम्ही रुग्णांवर चांगले उपचार करून त्यांच्या जीविताचे रक्षण कसे करणार? पुढील आठवड्यात आवर्जून पुन्हा एकदा या रुग्णालयाला भेट देऊन



### रुग्णालयातील सोयी सुविधांबाबत वरिष्ठ प्रशासन उदासीन

यावेळी स्थानिक शिवसेना माजी नगरसेवक सत्यवान देशमुख, नागेश खिलारे आणि अन्य सामाजिक कार्यकर्त्यांनी पोस्टमार्टम रूम पाहण्याची विनंती केली. यावेळी त्यांनी जिवंत माणसांना या ठिकाणी सोयी सुविधा मिळत नसतील तर मृत्यू पावलेल्यांना कशा मिळणार ? असा सूचक सवाल त्यांनी उपस्थित केला. या रुग्णालयातील सोयी सुविधांबाबत वरिष्ठ प्रशासन उदासीन असून जिल्ह्यातील बऱ्याच शासकीय रुग्णालयांची हीच सुविधा असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. येत्या काही दिवसात होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत समांडणार असल्याचे नमूद केले.

स्वच्छता आणि अन्य बाबीं बाबत उपायोजना झाल्या की नाही हे तपासून पाहणार असल्याचे त्यांनी सांगीतले. या ठिकाणी स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबद्दल त्वरित वरिष्ठांकडे कारवाईचा प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना वैद्यकीय अधिकारी बाबर यांना दिल्या. त्याचबरोबर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची लेखी माहिती उपलब्ध नसल्याबद्दल जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने यांच्याशी संपर्क साधत मोहोळ ग्रामीण रुग्णालयाबाबतच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली. येथील रुग्णालयातील अंतर्गत वायरिंग उघड्यावर असलेले पाहून त्याचबरोबर फिटिंगची अवस्था पाहून मोहोळ येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी भ्रमणध्वनीवरून फैलावर घेतले. याबाबत त्यांनी त्वरित मोहोळ महावितरण मधील प्रभारी अधिकारी देवकर आणि शहर अभियंता झळकी या अधिकाऱ्यांना ग्रामीण रुग्णालयात बोलावून घेतले आणि

### खासदार फंडातून वॉटर प्युरिफायर

यावेळी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल असलेल्या महिला रुग्णभगिनींशी त्यांनी संवाद साधला. यावेळी महिला रुग्णांनी रुग्णालयात पाण्याची सोय नसल्याचे सांगितले. रात्री हॉटेल आणि दुकाने बंद झाल्यानंतर पिण्याच्या पाण्यासाठी सकाळपर्यंत तिष्ठत बसावे लागत असल्याची बाब सांगितली.हे ऐकून खा . प्रणिती शिंदे झाल्या. त्यांनी याबाबत तात्काळ उपायोजना करण्याच्या सूचना स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच खासदार फंडातून त्वरित वॉटर प्युरिफायर बसवून देण्याबाबत संबंधितांना सुचित केले.

आवश्यक त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी नवजात बालकांना देण्यात येणाऱ्या लसीकरण कक्षाची पाहणी केली असता त्यांना धक्काच बसला. त्या ठिकाणी ठीकठिकाणी भिंतीला लागलेली जाळी आणि अस्वच्छता पाहून स्वच्छता कर्मचाऱ्यांना फैलावर घेतले.

रुग्णालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशीही संवेदनशीलतेने संवाद साधत तुमच्या देखील अडचणी मांडा, आपण त्या शासन दरबारी मांडून येथील आवश्यक त्या सुविधांसाठी निधी उपलब्ध करून आणू असे म्हणत त्यांच्याही अडचणी जाणून घेतल्या. उपजिल्हा रुग्णालय मंजूर असून यासाठीच्या जागा उपलब्धतेच्या शासकीय नियमाची अडचण अधिकाऱ्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. महाराष्ट्रात काही ठिकाणी दीड एकरात शंभर बेडचे ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय होत असेल तर मोहोळ मध्ये पन्नास बेडचे दीड एकर जागेत का होत नाही ? याबाबत प्रशासकीय स्तरावरून त्वरित निर्णय होऊन नव्या इमारतीचे काम सुरू व्हावे अशी अपेक्षा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. विदुला बाबर,काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष शाहीन शेख, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, खासदारांचे स्वीय सहाय्यक हाके, शिवसेना माजी नगरसेवक सत्यवान देशमुख, कृष्णदेव वाघमोडे,नागेश खिलारे,सुरेश शिंदे, कदीर शेख,राजाभाऊ आष्टूळ, शहजहानबागवान यांच्यासह विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# नीरज चोप्रा दोहा डायमंड लीगमध्ये भाग घेणार

**नवी दिल्ली, ११ मे-**

आगामी १६ मे रोजी दोहामध्ये प्रतिष्ठित डायमंड लीग (डीएल) स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत स्टार भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्रा याच्यासोबत तीन इतर देशबांधव असणार आहे. २०२३ मध्ये येथे जेतेपद जिंकणारा (८८.६७ मीटर) आणि २०२४ मध्ये (८८.३६ मीटर) दुसरा क्रमांक पटकावणारा चोप्रा पुरुषांच्या भालाफेकीत किशोर जेनासोबत असेल. जेनाने २०२४ मध्येही भाग घेतला होता आणि ७६.३१ मीटरच्या भालाफेकीसह नववे स्थान पटकावले होते. पुरुषांच्या भालाफेकीतील स्टार-स्टड्ड फील्डमध्ये दोन वेळा विश्वविजेता आणि पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता ग्रेनाडाचा ॲण्डरसन पीटर्स, २०२४ चा विजेता झेक प्रजासत्ताकचा जाकुब वडलेज्च, जर्मनीचे ज्युलियन वेबर आणि मॅक्स डेहनिंग, केनियाचे ज्युलियस येगो आणि जपानचे रॉडरिक गेन्की डीन असे खेळाडू असतील. या स्पर्धेत सहभागी असलेले इतर दोन भारतीय खेळाडू म्हणजे पुरुषांच्या ५००० मीटर शर्यतीत डायमंड लीगमध्ये पदार्पण करणारा राष्ट्रीय विक्रमवीर गुलवीर सिंग आणि महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये पारुल चौधरी आहे. महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये चौधरी राष्ट्रीय विक्रमधारक आहे. (वृत्तसंस्था)



# डोपिंग बंदीनंतर घरच्या प्रेक्षकांसमोर सिनरचा विजय

## इटालियन ओपन टेनिस

**रोम, ११ मे**

१०० दिवसांहून अधिक काळ प्रतिक्षा केल्यानंतर जॅनिक सिनरने इटालियन ओपन टेनिस स्पर्धेत आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोर ९९ व्या क्रमांकावर असलेल्या मारियानो नवोनवर ६-३, ६-४ असा विडय नोंदवला. तीन महिन्यांच्या डोपिंग बंदीनंतर अव्वल क्रमांकाच्या सिनरने यशस्वी पुनरागमन केले. जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये तिसरे ग्रॅण्ड स्लॅम जेतेपद जिंकल्यानंतर सिनरचा हा पहिलाच सामना होता. विजयाचे लक्ष गाठताना सिनरने दोन्ही सेटमध्ये वर्चस्व गाजविले. मी परत आल्याचे बघून खूप आनंदी आहे व मी या क्षणाची खूप वाट पाहत होतो, असे सिनर म्हणाला. या विजयाबरोबरच सिनरची विजयी मालिका ऑक्टोबरपासून २२ सामन्यांपर्यंत वाढवली. फेब्रुवारीमध्ये सिनरने जागतिक डोपिंग विरोधी एजन्सीसोबत झालेल्या समझोत्यात तीन महिन्यांच्या बंदीला मान्यता दिली. सिनरला पूर्णपणे दोषमुक्त करण्याच्या आंतरराष्ट्रीय टेनिस इंटिग्रिटी एजन्सीच्या निर्णयावर वाडाने अपील केल्यानंतर हा समझोता झाला. सिनरचा पुढील सामना ९३ व्या मानांकित नेदरलॅण्डचा पात्रताधारी जेस्पर डी. जोंगशी होईल. जेस्परने २५ व्या मानांकित अलेजांड्रो डेव्हिडोविच फोकिनाचा ६-०, ६- २ असा पराभव केला. रोम विजेतेपद जिंकणारा शेवटचा इटालियन खेळाडू १९७६ मध्ये ॲड्रियानो पनाट्टा होता. (वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### दौंड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ शाखेचा शुभारंभ

**दौंड, दि. ११ मे-**

नरसिंह जयंतीचे औचित्य साधून दौंड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ शाखेचा शुभारंभ करण्यात आला. सर्वानुमते एकविचारांनी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाची पुणे जिल्ह्यातील शाखा क्रमांक २१ आज घोषित करण्यात आली. ब्राह्मण समाजासाठी अनेक वर्षे सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून काम करणारी अनेक ब्रह्मवृंद या बैठकीत सहभागी झाले. दौंड शहरातील ६०० ब्राह्मण कुटुंबापर्यंत संपर्क करुन दौंड शाखेशी जोडून घेण्याचे ठरले. पुणे जिल्हाध्यक्ष मंदार रेडे यांनी महासंघाच्या कार्याची माहिती दिली व दौंड शाखा स्थापन करण्याच्या प्रक्रियेची माहिती सांगितली, जिल्हा सरचिटणीस राहुल जोशी यांनी उपक्रमांची माहिती दिली. दौंड येथील ब्राह्मण समाज एकत्र करण्यासाठी कुटुंब व कुटुंबातील सदस्य नोंदणी अभियान राबवण्याचे ठरले. यावेळी अर्चना साने, दीपक गटणे,मंगेश वैद्य, बी. जी. नगरकर, योगेश खंगे गुरुजी, आनंद भालचंद्र नगरकर, श्रीमती खंगे वहिनी, प्रभाकर जोगळेकर उपस्थित होते.



### माळशिरस महालोकअदालतीत तब्बल १ हजार ३५२ प्रकरणे निकाली

**नातेपुते, दि. ११ मे-**

उच्च न्यायालय मुंबई प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरचे अध्यक्ष एस.एस.शर्मा व सचिव यू. पी. देवर्षी व अध्यक्ष माळशिरस तालुका विधी सेवा समिती माळशिरस तथा जिल्हा न्यायाधीश -१ रा.वी. ताम्हाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व विधीज्ञ संघ माळशिरस यांच्या सहकार्याने आयोजित आलेल्या राष्ट्रीय महा लोकअदालतमध्ये तब्बल १३५२ प्रकरणे निकाली काढण्यात येऊन एकूण १६ कोटी १३ लाख ७३ हजार १०४ रकमेची वसुली करण्यात आली. येथे एकूण सहा पॅनल तयार करण्यात आलेले होते पॅनल प्रमुख म्हणून रा. वि.ताम्हाणेकर अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती माळशिरस तथा जिल्हा न्यायाधीश -१ हे होते. या लोक अदालतीत ४७० प्रकरणे तडजोडी निकाली काढण्यात आले तसेच दाखल पूर्व बँक (पतसंस्था,नगरपरिषद, नगरपंचायत,ग्राम पंचायत ) यांची एकूण ८८२ प्रकरणे निकाली काढण्यात आली व गुन्हा कबुलीची प्रकरणे निकाली काढण्यात आली. सदर लोक अदालत यशस्वी होण्यासाठी विधीज्ञ संघ माळशिरस व सर्व न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




### राष्ट्रसेविका समितीचे प्राथमिक वर्ग कोल्हापुरात


**कोल्हापूर, दि. ११ मे-**

राष्ट्रसेविका समितीतर्फे कोल्हापूर जिल्ह्याचा निवासी वर्ग प्रिन्सेस पद्माराजे शाळेमध्ये संपन्न झाला. या वर्गामध्ये मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात. याशिवाय देशभक्तीपर गीते, खेळ, बोधपर कथा, वेगवेगळ्या विषयावरील बौद्धिके, तसेच चालू घडामोडींवर आधारित चर्चासत्रे,कार्यशाळा इत्यादी आयोजित केलेली असतात ,मन आणि मनगट बळकट करण्यावर या वर्गात भर दिलेला असतो. यातून मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास मदत होते. हा वर्ग बारा वर्षांवरील मुलींसाठी आयोजित केलेला होता. यामध्ये ८६ मुलींनी सहभाग नोंदवला .शेवटच्या दिवशी प्रभात फेरीचे आयोजन केले होते .पद्माराजे शाळेतून निघालेली ही प्रभात फेरी ,महाद्वार रोडवरून बिंदू चौकात आली, तेथे कोल्हापूरातील बिंदू चौकाची ऐतिहासिक माहिती सौ अनुजा ताई धरणगावकर यांनी दिली. मिरजकर तिकटी वरून पुन्हा खरी कॉर्नर वरून पद्माराजे शाळेत नेण्यात आली. मुलींनी उत्स्फूर्तपणे दिलेल्या अनेक घोषणा, देशभक्तीपर गीते, नागरिकांचे लक्ष वेधून घेत होत्या. तसेच या वर्गासोबत ३ दिवसीय घोष प्रशिक्षण र्गाचेही आयोजन करण्यात आले होते.यावेळी सौ स्वरूपा जोशी, देवयानी पलुस्कर ,सौ प्राची लागू यांनी वंशी (बासरी), अनक(ड्रम), पणव(ढोल) यांच्या रचना शिकवल्या. १८ सेविकांनी यात सहभाग घेतला. हा वर्ग यशस्वी करण्यासाठी विभाग संपर्कप्रमुख मेघा जोशी, प्रज्ञा परांजपे, गौरी मुजुमदार, अनघा नाईक, स्वस्ति परांजपे यांच्यासह स्थानिक स्वयंसेविरानी विशेष परिश्रम घेतले. समारोपवेळी पालक आणि हितचिंतकांची उपस्थिती होती.

### संभाजी महाराज जयंतीनिमित्त आज शाहिरी कार्यक्रम

**सोलापूर, दि. ११ मे-**

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळातर्फे



सोलापूर जिल्ह्यात प्रथमच १२ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंती निमित्त शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने १२ मे रोजी सायंकाळी ६.३० वा शिंदे चौक येथे महाराष्ट्राचा शाहिरी बाणा युवाशाहीर चंद्रकांत माने आणि सहकारी यांचे शाहिरी कार्यक्रम आयोजन केल आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष राम जाधव, उत्सव अध्यक्ष निशांत सावळे यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### योगासन स्पर्धेत महाराष्ट्राला चार पदके

**गया** : महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील योगासन स्पर्धेत रविवारी धडाकेबाज सुरूवात केली. दुहेरी रिद्मिक योगासन स्पर्धेत महाराष्ट्राने मुलांच्या आणि मुलींच्या गटात सुवर्ण आणि रौप्यपदके जिंकून निर्विवाद वर्चस्व गाजविले. महाराष्ट्राने पहिल्याच दिवशी चार पदके जिंकून आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी केली. मुलांच्या दुहेरी रिद्मिक योगासन स्पर्धेत रोहन तायडे-अंश मयेकर आणि प्रणव साहू-आर्यन खरात या महाराष्ट्रीयन जोड्यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक जिंकले. सुवर्णपदक विजेत्या रोहन-अंश जोडीने १२९.५० गुणांची, तर रौप्यदपक विजेत्या प्रणव-अर्यन जोडीने १२९.२० गुणांची कमाई केली. सरांश कुमार व अभिषेक कुमार या बिहारच्या जोडीने १२७.३७ गुणांसह कांस्यपदक जिंकले. मुलींच्या दुहेरी रिद्मिक योगासन स्पर्धेत रुद्राक्षी भावे व प्रांजळ व्हान्रा या महाराष्ट्राच्या जोडीने १३१.१९ गुणांसह सुवर्णपदकावर मोहर उमटवली. तृप्ती डोंगरे व देवांशी वाकले या जोडीने १३०.४४ गुणांसह रौप्यपदक जिंकले.

### ओम गडा, जान्हवीची कौतुकास्पद कामगिरी

मुंबई : पेडर रोडवरील रशियन हाऊस येथील मुंबई चेस सेंटरमध्ये सुरू झालेल्या ऑल इंडिया चेस मास्टर्स एफआयडीई रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत दुसऱ्या फेरीत रविवारी जान्हवी सोनेजी व ओम गडाने कौतुकास्पद कामगिरी केली. काळ्या मोहऱ्यांनिशी खेळताना जान्हवीने हेमंत इशानवर विजय मिळवला. अन्य पटावर चुरशीच्या सामन्यात ओमने अवनीश शेट्टीला हरवले. अव्वल दहा पटामधील इतर उल्लेखनीय लढतींमध्ये अजय अग्रवालने अनिरुद्ध अय्यरचा पराभव केला. मिलिंद आभाने ए. कुमारला बरोबरीत रोखले. पहिल्या फेरीचे निकाल : दक्ष जागेसिया मात जॉन पॉल सनमरी, कुमार पराभूत वि. आर्यन यश कापडी, अजय अग्रवाल मात अनिरुद्ध अय्यर, देवार्थ गज्जर पराभूत वि. दर्श शेट्टी, ओम गडा मात अवनीश शेट्टी, हेमंत इशान पराभूत वि. जान्हवी सोनेजी, अभिषेक पाटील मात वरद तवटे, मिलिंद आभा बरोबरी वि. ए. कुमार.

### केनिनला हरवून सबालेन्का उप-उपांत्यपूर्व फेरीत

**रोम** : रविवारी इटालियन ओपन टेनिस स्पर्धेत बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने सोफिया केनिनला ३-६, ६-३, ६-३ असे हरवले आणि स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाची सबालेन्का मार्टा कोस्ट्युकविरुद्ध झुंजणार आहे. मार्टाने लेलाह फर्नांडिसला ६-४, ६-२ असे हरवले. सबालेन्काला रोममधील तिचे पहिले विजेतेपद आणि हंगामातील तिसरे १००० मालिका विजेतेपद पटकावण्याची उत्तम संधी आहे. सबालेन्का आपल्या गत चार स्पर्धांमध्ये अंतिम फेरीत पोहोचली आहे, मियामी आणि माद्रिद दोन्ही ठिकाणी विजय मिळविला आहे.

○○○○○○○○○○○

### आशियाई भारोत्तोलनात निरुपमा देवीला चौथे स्थान

**जियांगशन** : येथे आयोजित आशियाई भारोत्तोलन स्पर्धेत भारताच्या २४ वर्षीय निरुपमा देवीने चौथे स्थान मिळविले. तिने क्लीन ॲण्ड जर्कमध्ये ११५ किलो वजन उचलले. ती १२० किलो व १२५ किलो वजन उचलण्याच्या प्रयत्नात अपयशी ठरली. यामुळे तिच्या ९१ किलो स्नॅचमध्ये एकूण २०६ किलो वजन उचलले. क्लीन ॲण्ड जर्कच्या दोन अयशस्वी प्रयत्नांमुळे निरुपमा देवी रविवारी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या ६४ किलो वजन उचलण्याच्या प्रयत्नात चौथ्या स्थानावर राहिली. १२५ किलो वजन उचलण्यात यशस्वी झाली असती तर मणिपूरच्या निरुपमाने २०१८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक विजेत्या दक्षिण कोरियाच्या मुन मिन-हीला मागे टाकले असते. मुन मिन-हीने एकूण २१४ किलो (९४ किलो +१२० किलो) वजन उचलून कांस्यपदक जिंकले. चीनच्या ली शुआंगने २३९ किलो (१०५ किलो +१३४ किलो) वजन उचलून सुवर्णपदक जिंकले तर फिलिपिन्सच्या भारोत्तोलक एलरीन अँन अँडोने २३२ किलो (१०२ किलो +१३० किलो) वजन उचलून रौप्यपदक जिंकले.

### त्रिशतक झळकावणारे बॉब काउपर यांचे निधन

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलियन भूमीवर कसोटी क्रिकेटमधील पहिले त्रिशतक झळकावणारे बॉब काउपर यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अज्ञात आजाराने निधन झाले आहे, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने रविवारी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी डेल आणि मुली ऑलिव्हिया आणि सेरा आहेत. काउपर यांनी १९६४ ते १९६८ दरम्यान ऑस्ट्रेलियासाठी २७ कसोटी सामने खेळले, ज्यामध्ये ४६.८४ च्या सरासरीने २,०६१ धावा केल्या, यामध्ये पाच शतकांचा समावेश आहेत, तर ऑफ-स्पिनसह ३६ बळी टिपलेत. डावखुरा फलंदाज आपल्या स्ट्रोक-प्ले आणि स्थिरतेसाठी प्रसिद्ध होता. २० व्या शतकात ऑस्ट्रेलियामध्ये झळकावलेले हे एकमेव कसोटी त्रिशतक होते आणि त्या वेळी केलेले हे केवळ १० वे शतक होते. ॲडलेडमधील मागील कसोटीत १२ वा खेळाडू म्हणून त्याला त्याच्या घरच्या मैदानावर परत बोलावण्यात आल्यानंतर हे घडले.

# भारताने जिंकली तिरंगी मालिका

### श्रीलंकेवर ९७ धावांनी विजय

### स्मृती मंधानाची शतकी विजयी खेळी

### अमनजोत कौर, स्नेहर राणाची प्रभावी गोलंदाजी

### भारत ७ बाद ३४२, श्रीलंका ४८.२ षटकांत सर्वबाद २४५



| सामनावीर स्मृती मंधाना | धावा | चेंडू | चौकार | षट्कार |
|---|---|---|---|---|
| | ११६ | १०१ | १५ | २ |

◆ **कोलंबो, ११ मे**

रविवारी महिला तिरंगी एकदिवसीय मालिकेच्या अंतिम सामन्यात

उपकर्णधार स्मृती मंधानाने झळकावलेल्या शानदार शतकाच्या बळावर भारताने यजमान श्रीलंकेवर ९७ धावांनी विजय नोंदवून तिरंगी महिला वन-डे मालिका जिंकली. या मालिकेत दक्षिण आफ्रिका हा तिसरा संघ होता. स्मृती मंधाना सामनावीर पुरस्काराची, तर १५ बळी टिपणारी फिरकीपटू स्नेह राणा मालिकावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने मर्यादित षटकांत ७ बाद ३४२ धावा करण्याचा पराक्रम केला आणि श्रीलंकेसमोर विजयासाठी ३४३ धावांचे आव्हान ठेवले, मात्र श्रीलंकेचा संपूर्ण संघ ४८.२ षटकांत २४५ धावांत गारद झाला.

भारताने श्रीलंकेत महिलांच्या एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावसंख्या नोंदवली आणि या फॉरमॅटमध्ये त्यांची चौथी सर्वोच्च धावसंख्या नोंदवली, त्यामुळे कोलंबो येथे झालेल्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात त्यांना विजय मिळवून देण्याची संधी मिळाली. स्मृती मंधानाने आपले ११ वे एकदिवसीय शतक झळकावले व श्रीलंकेविरुद्ध पहिलेच शतक झळकावले.

भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रतिका रावल (३०) व स्मृती मंधानाने ७० धावंची सलामी भागीदारी केली. स्मृतीने १०१ चेंडूत १५ चौकार व २ षट्कारांसह ११६ धावा करत भारताच्या भव्य धावसंख्येचा पाया रचला. स्मृतीने चामारी अथापथ्थूच्या गोलंदाजीवर सलग चार चौकार ठोकले व हे तिचे ११ वे एकदिवसीय शतक ठरले. स्मृतीने हर्लिन देओलसोबत दुसऱ्या गड्यासाठी १०६ चेंडूत १२० धावांची भागीदारी केली. हर्लिन देओल (५६ चेंडूत ४७; ४ चौकार), कर्णधार हरमनप्रीत कौर (४१) व जेमिमाह रॉड्रिग्जनेही (४४) छोट्या-छोट्या भागीदारी करत भारताची धावसंख्या वाढविली. भारताने शेवटच्या दहा षटकांत ९० धावा करून ३४० धावांचा टप्पा ओलांडला. अमनजोत कौर (१८) व दीप्ती शर्मानेही (नाबाद २०) चिवट झुंज देत भारताला मर्यादित ५० षटकांत ७ बाद ३४२ धावांचा टप्पा गाठून दिला.

श्रीलंकेकडून सुगंधिका कुमारी ५९ धावांत २ बळी, तर देवमी विहंगाने ६९ धावांत, तर मलकी मदाराने ७४ धावांत प्रत्येकी २ बळी टिपलेत. इनोका रणवीराने एक बळी टिपण्यात यश मिळविले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना कर्णधार चामारी अथापथूने ६६ चेंडूंत ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली, तर निलाक्षी सिल्व्हाने ४८ धावांची भर घातली. मात्र उर्वरित श्रीलंकन अमनजोत कौर (५४ धवांत ३ बळी) व स्नेह राणाच्या (३८ धावांत ४ बळी) गोलंदाजीपुढे टिकाव धरू शकले नाहीत. (वृत्तसंस्था)

# दीपिका, साळुंखेला कांस्यपदक

### तिरंदाजी विश्वचषक (द्वितीय चरण) ● भारताने जिंकली सात पदके



कांस्यपदक विजेते पार्थ साळुंखे व दीपिका कुमारी

◆ **शांघाय, ११ मे**

रविवारी येथे झालेल्या तिरंदाजी विश्वचषक (द्वितीय चरण) स्पर्धेत स्टार तिरंदाज दीपिका कुमारी व २१ वर्षीय पार्थ साळुंखेने सरस कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. याबरोबरच सात पदकांसह भारताने आपली मोहीम संपविली.ऑलिम्पिकपटू दीपिका कुमारीने उपांत्य फेरीतील हृदयद्रावक पराभवाानंतर कष्टाने कांस्यपदक जिंकून आपली प्रतिठा जपली

कम्पाऊंड तिरंदाजांनी पाच पदके जिंकून दमदार कामगिरी केल्यानंतर दीपिका व साळुंखेने रिकर्व्ह विभागात आणखी दोन पदके मिळवून भारताच्या मोहिमेचा शेवट उच्चांकावर केला.

येचियोन विश्वचषकाच्या त्याच टप्प्यात २१ वर्षीय ऑलिम्पिक विजेती लिम सिह्योनने दीपिकाला बाद केल्यानंतर अगदी एक वर्षानंतर भारतीय खेळाडू पुन्हा एकदा कोरियन खेळाडूकडून उपांत्य फेरीत पराभूत झाली. एकतर्फी महिला रिकर्व्ह वैयक्तिक स्पर्धेत १-७ असा पराभव पत्करावा लागला.

३० वर्षीय चार वेळा ऑलिम्पिकपटू असलेल्या या ३० वर्षीय खेळाडूने कांस्यपदक प्लेऑफमध्ये आणखी एका कोरियन खेळाडू कांग चाय यंगला ७-३ असे हरवून पुन्हा एकदा दिलासादायक कामगिरी केली.

दीपिकाच्या विजयामुळे भारताची एकूण पदकसंख्या सहा झाली, शनिवारी कम्पाऊंड विभागात पाच पदके होती, यात पुनरागमन करणाऱ्या तिरंदाज मधुरा धामणगावकरने उल्लेखनीय तिहेरी पदके मिळवली.

कांस्यपदकाच्या प्लेऑफमध्ये दीपिकाने उपांत्य फेरीत लिमविरुद्धच्या पराभवापेक्षा अधिक संयम आणि रणनीतिक स्पष्टता दाखवली.

पहिला सेट २७-सर्वांच्या बरोबरीत संपला, परंतु दीपिकाने दुसऱ्या सेटमध्ये २८ गुण नोंदवत ३-१ अशी आघाडी घेतली.

२०१७ मध्ये बर्लिन विश्वचषक उपांत्यपूर्व फेरीत दीपिकाला हरवणारी माजी विश्वविजेती कांग तिसऱ्या सामन्यात परतली आणि दीपिकाने निर्दोष ३० गुणांसह विजय मिळवला.

भारतीय खेळाडूने दबावाखाली तिच्या सर्वोत्तम शूटिंगचा वापर करून चौथ्या सेटमध्ये ३० गुणांसाठी तीन परिपूर्ण बाण मारले आणि पुन्हा ५-३ अशी आघाडी घेतली. विजय निश्चित करताना दीपिकाने पुन्हा एकदा उत्तम कामगिरी केली, कांगच्या २८ विरुद्ध २९ गुण नोंदवत कांस्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

# आयपीएल १६ मेपासून पुन्हा सुरू होण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ११ मे**



भारत-पाकिस्तान लष्करी तणावामुळे स्थगित झालेली इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) १६ किंवा १७ मे रोजी पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. अंतिम सामना कोलकाता येथून हलवण्याची शक्यता आहे. सध्या आयपीएलबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. बीसीसीआय अद्याप योग्य वेळापत्रक तयार करण्यावर काम करत आहे, असे बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला म्हणाले.

शनिवारी झालेल्या युद्धबंदीच्या घोषणेमुळे ९ मे रोजी एका आठवड्यासाठी स्थगित केलेली आयपीएल पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला.

आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल सदस्य आणि बीसीसीआय अधिकाऱ्यांनी रविवारी पुन्हा सुरू करण्याच्या योजनेवर चर्चा केली.

आयपीएल पुन्हा सुरु करण्याबाबत बीसीसीआयचे अधिकारी उपायांवर काम करत आहेत. बीसीसीआय सचिव, आयपीएल अध्यक्ष, फ्रॅन्चायझी आणि सर्वांशी चर्चा करत आहेत, त्यामुळे लवकरच आम्हाला निर्णयाबद्दल कळेल, स्पर्धा लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे शुक्ला म्हणाले. (वृत्तसंस्था)

# तेंडुलकरचा आईला हृदयस्पर्शी संदेश

◆ **मुंबई, ११ मे**

मातृदिनानिमित्त, क्रिकेट जगतातील महान सचिन तेंडुलकर याने आपल्या उज्ज्वल कारकिर्दिमागील महिलेचा - त्याची आई रजनी तेंडुलकरचा सन्मान करण्यासाठी एक क्षण काढला आणि हृदयस्पर्शी संदेश लिहिला. त्याचा हा संदेश लाखो लोकांना खूप भावला.

या संदेशात सचिन तेंडुलकरने कृतज्ञता व प्रेम व्यक्त केले आणि लिहिले, माझ्या प्रत्येक गोष्टीची सुरुवात तिच्या प्रार्थना आणि तिच्या शक्तीने होते. माझी आई नेहमीच माझी आधारस्तंभ राहिली आहे, जशी प्रत्येक आई तिच्या मुलासाठी असते. सर्व अविश्वसनीय मातांना मातृदिनाच्या खूप खूप शुभेच्छा!



या खास दिवशी आई आणि आपल्या मुलांमधील घनिष्ठ नाते साजरे करणाऱ्या चाहत्यांनी त्याच्या भावनिक संदेशाचा प्रतिध्वनी केला. (वृत्तसंस्था)

# सोलापूरचा छत्रपती संभाजीनगरवर विजय

### राज्य निमंत्रित १६ वर्षाखालील क्रिकेट : विरांश शर्माचे शतक, सोहम कुलकर्णीचे सात बळी

### १८ गुणांसह सोलापूर अव्वल, उद्या पुण्याबरोबरच लढत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ मे-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १६ वर्षांखालील निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सोलापूरने छत्रपती संभाजीनगरवर पहिल्या डावातील एक धावेच्या आघाडीवर विजय मिळविला.

या विजयासह तीन गुणासह सोलापूर १८ गुणासंह अव्वल स्थानवर आहे. १३ व १४ मे रोजी सोलापूरचा साखळीतील शेवटचा सामना पुणेच्या एमसीव्हीएस संघाबरोबर होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत सोलापूरने प्रथम फलंदाजी करताना सर्व बाद २०० धावा केल्या. यात कर्णधार वीरांश वर्मा (९५) याचे शतक अवघ्या पाच धावाने हुकले. त्याला सार्थक कन्ना (४१) व मयंक पात्रे याने (३४) यांनी साथ दिली.



सोहम कुलकर्णी



विरांश शर्मा

छत्रपती संभाजी नगरचा पहिला डाव सोलापूरने १९९ धावांत रोखला. यात संभाजीनगरच्या मोहम्मद अलीने नाबाद ९५, कुरेशी २९, योगेश २६ व श्लोक महेंद्र याने २१ धावा केल्या. सोलापूर संघाकडून सोहम कुलकर्णी याने ५६ धावामध्ये सात बळी टिपले. त्याला इदांत जैन (२-७२), अभिजीत सरवदे (१-१४) यांनी साथ दिली.

सोलापूरने दुसऱ्या डावात सर्व बाद २४७ धावा केल्या. पहिल्या डावात अवघ्या पाच धावाने शतक हुकलेल्या कर्णधार विरांश वर्मा (१०३) याने दुसऱ्या डावात तडफदार शतक साजरे केले. त्याला अभिजीत सरवदे (३८) व सार्थक कन्ना (२०) यांनी साथ दिली. संभाजीनगरकडून मयंक कदम याने (४-५५) व मोहम्मद अली याने (४-६२) व अभिराम गोसावी (२-५८) यांनी गोलंदाजीत कामगिरी केली.

छत्रपती संभाजी नगरचा दुसऱ्या डावात बिनबाद एक धाव असताना पाऊस सुरू झाल्याने खेळ थांबवावा लागला. त्यामुळे सोलापूर संघाला पहिल्या डावातील एका धावेच्या अधिक्यावर विजय मिळाला.





# शिवशंभू वॉरिअर संघ विजेता

### टीपीएल सीजन सिक्स : एस. के. टायटन्स संघ उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

श्री काझी यांच्या एस.के. टायटन्सला हरवून प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांच्या शिवशंभू वॉरिअर संघाने टीचर्स प्रीमियर लीग सीजन ६चे विजेतेपद पटकाविले.

टीचर्स स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित ही स्पर्धा आयपीएलच्या धर्तीवर रेल्वे मैदानावरती खेळवली गेली. या स्पर्धेत सोलापूर शहर व जिल्हा तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून १५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षण विभागाशी संबंधित कर्मचारी सहभागी झाले होते.

अंतिम सामन्यामध्ये शिवशंभू वॉरियर्स संघाने एस के टायटन्स संघाचा सात गडी राखून पराभव करीत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेमध्ये गणेश भोसले हा मालिकावीर, विनय कंदी हा उत्कृष्ट फलंदाज, श्रीकांत काशीद हा उत्कृष्ट गोलंदाज, मायाप्पा हाके हा उत्कृष्ट क्षेत्ररक्षक तर सद्दाम सय्यद हा उत्कृष्ट यष्टीरक्षक ठरला. टीचर्स स्पोर्ट्स असोसिएशनचे पदाधिकारी आणि टीपीएल समिती सदस्य यांनी मनपा पर्यवेक्षक मनीष बांगर यांच्या नेतृत्वाखाली परिश्रम घेतले.

# शासनाच्या महाराष्ट्र खो-खो संघ निवडीत वशिलेबाजी

## क्रीडा उपसंचालक व निवड समितीचे संगणमत : जिल्हा संघातही वर्णी न लागणाऱ्याची निवड

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि.११ मे -**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय १९ वर्षाखालील खो-खो संघात निवड करताना २०२४-२५ या वर्षात वशिलेबाजी झाली असल्यामुळे पुणे विभागातून विजेतेपद मिळवलेल्या व राज्य स्पर्धेत भाग घेतलेल्या शाळांमधील गुणवान खेळाडूंवर अन्याय झाला आहे.

जो खेळाडू महाराष्ट्र खो खो संघटनेच्या स्पर्धेत पुणे जिल्ह्याच्या १८ वर्षाखालील संघातही निवडला जात नाही. तो खेळाडू कोणत्याही शालेय क्रीडा स्पर्धेच्या कोणत्याही निकषात बसत नसताना पुणे विभागाच्या क्रीडा उपसंचालकांच्या शिफारशीने महाराष्ट्र शासनाच्या १९ वर्षाखालील शालेय राष्ट्रीय स्पर्धा खेळला. क्रीडा उपसंचालक व निवड समितीच्या संगणमताने तो निवडलेला खेळाडू नुकत्याच झालेल्या खेलो इंडियाच्या महाराष्ट्र संघातही खेळला. तो निवडलेला खेळाडू आहे पुण्याचा नरेश चांदणे.

पुणे विभागातून गेल्या तीन वर्षापासून १९ वर्षाखालील गटात सोलापूर जिल्ह्याचे वर्चस्व आहे. महाराष्ट्राच्या या संघात पुणे विभागातून विजेतेपद मिळवलेल्या व राज्य शालेय स्पर्धेत भाग घेतलेल्या शाळांतील खेळाडूची निवड होत नाही. परंतु पुणे विभागातून हरलेल्या शाळेतील खेळाडूंची निवड होते. क्रीडा उपसंचालक आणि निवड समितीच्या संगणमताने अश्या खेळाडूंची निवड होत असल्याचा आरोप संबंधित शाळातील क्रीडा शिक्षकांचा आहे. खेलो इंडियाला तर मोठ्या रकमेची बक्षिसे असल्याने यातही असेच चालत आहे.

### पुण्याचा नरेश चांदणे नियमबाह्य डायरेक्ट चाचणीत

सोलापुरात २०२४-२५ मध्ये झालेल्या विभागीय खो-खो निवड चाचणीतून हरलेल्या संघातून व निवड चाचणीसाठी आलेल्या खेळाडूमधून पाच खेळाडू निवडले होते. यात नरेश चांदणेचे नाव नव्हते. जर राज्याला डायरेक्ट चाचणीसाठी खेळाडू पाठवायचा असेल तर तो खेळाडू त्याच गटातून गतवर्षी शालेय राष्ट्रीय किंवा संघटनेच्या राष्ट्रीय स्पर्धेत खेळलेला प्राविण्य प्राप्त खेळाडू असावा. तसेच तो शालेय प्राथमिक स्तरावर सहभागी असला पाहिजे. परंतु तो जिल्हा व विभागस्तर निवड चाचणीत सहभागी झाला असेल आणि त्याची विभागातून निवड चाचणीतून निवड न झाल्यास त्यालाही थेट राज्य चाचणीस पाठवता येत नाही. या निकषात न बसलेला नरेश चांदणेला क्रीडा उपसंचालकानी बुलढाणा येथे झालेल्या राज्य निवड चाचणीस डायरेक्ट पाठवले आणि तो राष्ट्रीय स्पर्धा आणि नुकतीच झालेली खेलो इंडिया स्पर्धाही खेळला.





### खेलो इंडियामध्ये सोलापूरच्या मुलींवर अन्याय

नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलीना उपविजेते पदावर समाधान मानावे लागले आहे. मुलींच्या निवड चाचणीतही भेदभाव व वशिलेबाजी होम सोलापूरच्या मुलींवर अन्याय झाला असल्याचा या क्रीडा शिक्षकांचा आरोप आहे. सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते प्राजक्ता बनसोडे, अश्विनी मांडवे, स्नेहा लामकाने, कल्याणी लामकाने व गौरी काशीद हे ५ खेळाडू चाचणीस गेले होते. यातील एकाचीही निवड झाली असती तर महाराष्ट्राच्या कामगिरीत नक्कीच फरक पडला असता, असा संबंधित क्रीडा शिक्षकांचा दावा आहे.

### क्रीडामंत्री व क्रीडा आयुक्त यात लक्ष घालतील का?

पुणे विभागातून राज्य चाचणीसाठी पाठवलेले पाचही खेळाडू गतवर्षी शालेय व संघटनेच्या स्पर्धेत सहभागी होऊन सुवर्णपदक प्राप्त होते. त्यातील फक्त कृष्णा बनसोडे वगळता उर्वरित चार खेळाडूवर अन्याय झाला. त्यामुळे दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रास रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. त्या अगोदर नाशिक येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने सुवर्णपदक पटकावले होते. असे होऊनही नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया निवड चाचणीसाठीही नरेश चांदणे निवडला गेला. त्यामुळे अन्य एका गुणवान खेळाडूवर अन्याय झाला. असे किती नरेश चांदणे सारखे खेळाडू वशिल्याने खेळले आहेत. याची राज्याचे क्रीडा आयुक्त व क्रीडामंत्री यांनी चौकशी करुन संबंधित क्रीडा उपसंचालक व निवड समितीवर कारवाई करावी. जेणेकरून यापुढे अश्या नियमबाह्य घटनेस आळा बसेल, अशी मागणी राज्य स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळेतील क्रीडा शिक्षकांनी केली आहे. यापुढे असाच संबंधित शाळातील खेळाडूंवर अन्याय होईल या हेतूने या शाळांतील क्रीडा शिक्षकांनी आपली नावे जाहीर करू नका, असे दैनिक 'तरुण भारत'शी बोलताना त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### मंगळवेढा तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अध्यक्षपदी विजय भगरे

**मंगळवेढा, दि. ११ मे-**

मंगळवेढा तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अध्यक्षपदी विजय सुरेश भगरे यांची सर्वानुमते निवड झाल्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सोलापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे सदस्य व सांगोला तालुका वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे अध्यक्ष रविराज शेटे यांचे अध्यक्षतेखाली व सोलापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सदस्य सिद्धेश्वर सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक संपन्न झाली. बैठकीस मंगळवेढा तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अध्यक्षपदी विजय सुरेश भगरे यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. यावेळी संघटनेच्या उपाध्यक्षपदी विलास माने, भोसे, सचिवपदी बाळासाहेब नागणे, मंगळवेढा, खजिनदारपदी अहमद शेख, सिद्धापूर तर सदस्यपदी महादेव खुळे, पाठखळ, हुकुम मुलाणी,भाळवणी, श्रीकांत सांगोलकर, रड्डे, दिनकर ताड, निंबोणी, असलम मुलाणी, हुन्नूर, माणिक घुले, मरवडे, गुरू माळी, सलगर, मुकेश कनशेट्टी, हुलजंती, नितीन कोरे, बोराळे यांची निवड करण्यात आली. यावेळी रेवणसिद्ध नकाते, भानुदास जाधव, बाबुराव पवार, प्रणवराज शेटे आदि विक्रेते उपस्थित होते. रविराज शेटे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना लोक कल्याणकारी महामंडळाच्या योजना लवकरच अंमलबजावणी होणार आहे. तरी संघटनेच्या सर्व सभासदानी संघटनेमध्ये जास्तीत जास्त सभासद होवून याचा लाभ घ्यावा असे आवाहन सांगोला तालुका वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे तालुकाध्यक्ष रविराज शेटे यांनी सांगितले. तसेच संघटनेच्या अडीअडचणी बाबत संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवलिंग मेडेकर, मार्गदर्शक गोरख भिलारे, सचिव सचिन बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे कामकाज उत्तम प्रकार सुरू आहे व याबाबत सर्व विक्रेत्याना शहरी व ग्रामीण भेदभाव न करता ३० टक्के कमिशन लवकरच मिळेल व न मिळाल्यास संघर्षासाठी तयार रहा असे आवाहन शेटे यांनी केले. यावेळी सिद्धेश्वर सावंत म्हणाले की,मंगळवेढा तालुक्यात वृत्तपत्र विक्रेता संघटना नसल्यामुळे विक्रेत्यांची अडचण मोठया प्रमाणात असून त्यांना वाली कोणी नव्हता. त्यांनी आज मंगळवेढा तालुक्यात वृत्तपत्र विक्रेता संघटना निर्माण करून सोलापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना मध्ये सहभागी होवून इथुन पुढे विक्रेत्याना कोणतीही अडचण येणार नाही असे सिद्धेश्वर सावंत यांनी सांगितले. या वेळी सर्वांचे आभार बाळासाहेब नागणे यांनी मानले.




### लोकअदालतीच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत २.७९ कोटी जमा

**सोलापूर, दि. ११ मे-**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे आयोजित राष्ट्रीय लोक अदालतमध्ये सोलापूर महापालिकेच्या तिजोरीत २ कोटी ६९ लाख ४४ हजार ५३४ रुपयांचा मिळकतकर जमा झाला. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सन २०२५ सालात सोलापूर जिल्ह्यातील दुसरी राष्ट्रीय लोक अदालत दि.१० मे रोजी आयोजित करण्यात आली. या अदालतीमध्ये सहभागी होणाऱ्या महापालिकेच्या मिळकतकर थकबाकीदारांना नोटीस फी, वॉरंट फी व शास्तीमध्ये ५० टक्क्यांची सवलत देण्यात आली. या लोक अदालतीमध्ये महापालिका मालमत्ता कर विभागाकडून सुमारे १ हजार मिळकतदारांची प्रकरणे तडजोडीकरीता दाखल करण्यात आली होती. दाखल प्रकरणनिहाय सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्यामार्फत संबंधित मिळकतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. लोक अदालतमध्ये मिळकतदारांच्या थकबाकीतील नोटीस फी, वॉरंट फी व शास्तीची जी रक्कम आहे, त्यामध्ये ५० टक्क्यांची सवलत महापालिका अधिनियमाअंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार देण्यात आली. ज्या मिळकतदारांना नोटीसा प्राप्त झाल्या नाहीत असे मिळकतदार तसेच यापुर्वी मागील लोक अदालतमध्ये ज्यांना नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत मात्र अशांना त्यावेळी थकबाकी भरता आलेली नाही अशा तसेच ज्यांना नोटीसा प्राप्त नाहीत परंतु थकबाकी भरावयाची आहे अशा सर्व मिळकतदारांना या सवलतीचा लाभ देण्यात आला. ज्यांना प्रत्यक्ष येणे शक्य नाही त्यांनी ऑनलाईन, कोणत्याही पेमेंट गेटवेव्दारे (उदा. फोनपे, गुगलपे इ.) चालू आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करास देण्यात येत असलेल्या ६% सुटीसह थकबाकीवरील शास्तीमध्ये देण्यात आली. या योजनेचा लाभ मिळकतदारांना देण्यासाठी शनिवार, दि. १० मे रोजी हुतात्मा स्मृती मंदिर येथील मिळकत कर भरणा केंद्र सुरू ठेवण्यात आले होते. या लोक अदालतीच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत २ कोटी ६९ लाख ४४ हजार ५३४ रुपयांचा मिळकतकर जमा झाला.

## निधन वृत्त...

### भगवान शिंदे



**सोलापूर, दि. ११ मे-**

तुळजापूर तालुक्यातील चव्हाणवाडी येथील रहिवासी भगवान सोपान शिंदे (वय ७९) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते बालाजी शिंदे यांचे ते वडील होत.

# ४४५ नागरिकांनी दिली सर्व्हेक्षणाची माहिती

**जिल्हा प्रशासनाकडून आकडेवारी जाहीर**

**कॉरिडोरला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.११ मे -**

पंढरपुरात होणाऱ्या कॉरिडोरमधील संभाव्य बाधितांमधील ४४५ नागरिकांनी आपली माहिती जिल्हा प्रशासनाकडून सुरु करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात दिली आहे. तर या सर्व्हेक्षणात माहिती न देणाऱ्या नागरिकांची संख्या १२८ इतकी असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आलेले आहे. दरम्यान या माहितीच्या आधारे कॉरिडोरला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचा दावा जिल्हा प्रशासनाकडून केला जात आहे. तर दुसरीकडे जिल्हाप्रशासन धुळफेक करीत असून कॉरिडोर व्हावा किंवा नको यासाठी मंदिर परिसरात खास मतदान घेण्याची मागणी तिर्थक्षेत्र बचाव समितीकडून प्रशासनाला केली जात आहे.

पंढरपूरात विठ्ठलाच्या दर्शानासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना जास्तीत जास्त सेवासुविधा उपलब्ध होण्यासाठी पंढरपूर कॉरिडोरची घोषणा करण्यात आलेली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा ड्रीमप्रोजेक्ट असून तो राबविण्याची जबाबदारी राज्याचे मुख्ममंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे व अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर आहे. मध्यंतरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कॉरिडोर बाबतचे फायनल प्रेझेंटेशन जिल्हा



प्रशासनाकडून देण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा प्रशासनाला गो अहेड म्हणून येत्या तीन महिन्यात भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे सांगितले होते.

दरम्यान येथील संभाव्य कॉरिडोर बाधित नागरिकांकडून कॉरिडोरला विरोध होवू लागला. त्या नंतर समाज माध्यमांवर पंढरपूर कॉरिडोरचा एक आराखडा प्रसिध्द झाला. या मध्ये ६०,८० आणि शंभर मीटर या प्रमाणे चौफाळा ते महाव्दार घाट असा कॉरिडोरचा आराखडा तयार करण्यात आल्याचे समोर आहे. मात्र या आराखड्याबद्दल जिल्हा प्रशासनाकडून कोणतेही अधिकृत वक्तव्य केले गेले नाही. त्यामुळे येथील कॉरिडोर बाधित नागरिकांमध्ये संभ्रमावस्था पसरली. त्यानंतर सुमारे पाचशे मीटर लांबीचा असलेला हा आराखडा अंतिम नसल्याचा निर्वाणा जिल्हाधिकारी, पालकमंत्र्यांनी देखील दिला. गेल्या पंधरा दिवसाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सुमारे तीन दिवस येथे तळ ठोकून सुमारे सहाशे बाधित होणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला. या मध्ये सर्व बाधितांची सविस्तर माहिती घेवून त्या नंतर मदतीबाबतचे पॅकेज जाहीर करणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. माहिती संकलनासाठी सर्व्हेक्षण देखील सुरु करण्यात आले. मात्र येथीलसंभाव्य कॉरिडोरबाधित नागरिकांकडून या सर्व्हेक्षणात कुठलीही माहिती दिली जावू नये असे ठरविण्यात आले. या सर्व्हेक्षणात पहिल्या दिवशी गुरुवारी (ता.८) एकुण १९९ नागरिकाशी सर्व्हेक्षणासाठी संपर्क करण्यात आला. या मध्ये १४५ नागिरकांनी माहिती दिली. तर ५४ नागरिकांनी माहिती दिली नसल्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात आला. सर्व्हेक्षणाच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (ता.९) २७५ नागरिकांशी संपर्क करण्यात आला. या मध्ये माहिती देणाऱ्यांची संख्या २१७ तर माहिती न देणाऱ्यांची संख्या ५८ असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. तिसऱ्या दिवशी ९९ नागरिकांनी सर्व्हेक्षणात माहिती देवून प्रशासनाला सहकार्य केल्याचे सांगण्यात आले. एकीकडे आत्तापर्यंत कोणत्याही प्रकल्पात दिले गेले नाही असे सर्वात्तम पॅकेज येथील बाधितांना शासनाकडून दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच जाहीर केलेले आहे. त्याच्या सुचने नुसारच जिल्हाधिकारी कुमार आर्शीवाद देखील संभाव्य सर्व बाधितांच्या माहितीचे संकलन करुनच आपला अंतिम अहवाल शासनाकडे पाठविणार आहेत. या प्रकल्पासाठी जिल्हाधिकारी देखील सध्या कसोशीने प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे उर्वरित माहिती न दिलेल्या नागरिकांची माहिती प्रशासन कशी मिळविणार याकडे पंढरपूरकरवासियांचे आता लक्ष लागलेले आहे.

**सर्व्हेक्षणाला नागरिकांचे चांगले सहकार्य**

दरम्यान ८,९ आणि १० या तीन दिवसांमध्ये ५७३ संभाव्य बाधित नागरिकांशी सर्व्हेक्षणासाठी संपर्क करण्यात आला. त्यामध्ये माहिती देणाऱ्या नागरिकांची एकुण संख्या ४४५ पर्यंत पोहचली तर केवळ १२८ नागरिकांनी माहिती दिली नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे काँरिडोरच्या सर्व्हेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**अनेकांना नोटीसा नाहीत पण सर्व्हेच्या यादीत नावे**

जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजिण्यात आलेल्या संवाद बैठकीसाठी अनेक काँरिडोर बाधितांपर्यंत नोटीसा पोहचल्या नाहीत. मात्र आता माहिती संकलनासाठी बाधितांशी संपर्क करुन सर्व्हे करण्यात येत आहे. या मध्ये अनेकांच्या नावांचा समावेश आहे. अनेक नागरिकांनी नोटीसा नसल्या तरी माहिती मात्र दिली आहे. त्यामुळे नोटीसा नाहीत मात्र सर्व्हेक्षणाच्या यादीतील नावांमुळे अनेक नागरिकांची संभ्रमावस्था झालेली दिसत आहे.

**कृती समितीच्या हालचालींनाही वेग**

संभाव्य कॉरिडोर रद्द व्हावा यासाठी बाधित नागरिकांनी तिर्थक्षेत्र बचाव कृती समिती गठित केलेली आहे. या समितीकडून बाधित नागरिकांना योगय् प्रकारे मार्गदर्शन करुन काँरिडोर रद्द होण्यासाठी लोकशाही पध्दतीने आंदोलने केली जात आहेत. या कृति समितीच्या हालचालींना देखील आता वेग आलेला आहे. मंदिर परिसरात एखादी बैठक किंवा मोठी सभा घेऊन काँरिडोरबाधित नागरिकांना योग्य दिशा देण्यावर देखील कृती समितीमध्ये सध्या विचारमंथन सुरु आहे.

## निवडणूक आयुक्तांची माकपच्या शिष्टमंडळाशी चर्चा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ११मे -**

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू व डॉ. विवेक जोशी यांनी रविवारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (सीपीआय-एम) महासचिव एम.ए. बेबी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी दिल्लीतील येथे चर्चा केली. हा संवाद आयोगाद्वारे राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या अध्यक्षांशी सुरू असलेल्या चर्चेच्या मालिकेचा एक भाग आहे.

निवडणूक प्रक्रियेचे बळकटीकरण अधिक प्रभावीपणे करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट असून सर्व संबंधित घटकांच्या सहभागाने विद्यमान कायदेशीर चौकटीत निवडणूक प्रक्रिया अधिक मजबूत बनवण्याचा हा प्रयत्न आहे. याआधी, आयोगाने बहुजन समाज पार्टीच्या (बसप) नेत्या मायावती यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी ६ मे रोजी आणि भाजपाचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी ८ मे रोजी भेट घेतली होती. आतापर्यंत एकूण ४ हजार ७१९ सर्वपक्षीय बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. यात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी ४० जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी ८०० आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी ३ हजार ८७९ बैठकांचे आयोजन केले असून या माध्यमातून २८ हजारांहून अधिक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

## भगवंत महोत्सवाची सांगता; बार्शीचा आसमंत उजळला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मे-**

बार्शीतील श्री भगवंत महोत्सवाची सांगता येथील भगवंत मैदानावर भव्य आणि नयनरम्य आतषबाजीने करण्यात आली. या चमकदार दारुकामामुळे संपूर्ण आसमंत उजळून निघाला. ३ मे पासून सुरु झालेला हा सात दिवसीय सांस्कृतिक, धार्मिक महोत्सव डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या आतषबाजीत रंगला. यावेळी पहलगाम हल्लूयातील मृत नागरिकांना तसेच ऑपरेशन सिंदुरमधील भारतीय शहीद जवांनाना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँकेच्यावतीने आयोजित या दारुकामाचे उद्घाटन डॉ. प्रकाश बुरगुटे यांच्या हस्ते रिमोटद्वारे करण्यात आले. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, डॉ. बी.वाय. यादव, महोत्सव अध्यक्ष सुभाष लोढा, अरुण बारबोले, ड. अनिल पाटील, सुधीर बारबोले मंदीर समितीचे दादा बुडूख, प्रशांत कथले, अनिल पवार, सुरेश येरगौडा, अरुण देबुडवार, अप्पा लोखंडे,




प्रा. मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

आष्टी इसाईल सय्यद, सोलापूरच्या सिद्धेश्वर फायर वर्क्स खॉज पटेल, सालम लहाजी जावेद लहाजी यांचे माणकेश्वर स्टार फायर वर्क्स आणि बार्शीच्या एस एम फायर वर्क्स सोहेब आतार, आय्याज आतार व अस्लम आतार गनी आतार यां सर्वांनी शोभेचे दारुकामचे प्रात्यक्षिके दाखविले. पहलगाम हल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी तसेच पाकिस्तानी आतंकवादयाचा खात्मा करण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदुर सुरु केले. या नावाचा ऑपरेशन सिंदूर बोर्ड सर्वाचे लक्ष वेधून घेत होता . तसेच श्रीभगवंत प्रसन्न फ्रेम नागराज, धबधबा, रोमन कॅण्डल, ओम, स्वस्तिक, जय श्रीराम बोर्ड, श्रीराम मंदिर, रिंगचक्र, मॅजिक चक्र, नर्गिस झाड, कारगिल शॉट, नागोबा चक्री महादेवाची पिंड सुदर्शन चक्र यांसारख्या आकर्षक आणि वैविध्यपूर्ण फटाक्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी सुरक्षेची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. पालिकेचे अग्निशमन दल, रुग्णवाहिका, महावितरण कर्मचारी आणि आपत्कालीन यंत्रणा पूर्ण सज्ज होत्या. या महोत्सव यशस्वी करण्यासाठी विलास रेणके, अभिजित सोनिग्रा, संतोष सूर्यवंशी, श्रीधर कांबळे सचिन मडके, वासुदेव ढगे, बाळासाहेब तातेड, गणेश भोळे, श्रीकांत शिंदे, प्रशांत खराडे, वर्षा रसाळ, राजश्री डमरे, छोटू हागरे, निलेश वीर, समर्थ तुपे रणजीत देशमुख रविंद्र माचवे यांचे विशेष योगदान लाभले.

## खर्डी येथे नृसिंह जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.११ मे -**

तालुक्यतील खर्डी येथे नृसिंह जयंती मोठ्या थाटात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.

शेकडो वर्षांची परंपरा जपत गावातील कुलकर्णी वाडा,हिलाळपार येथील मूर्तीवर सकाळी पौवमान अभिषेक करण्यात आला. दुपारी भजन करून सायंकाळी नरसिंहाच्या मुतीवर फुले वाहण्यात आली. जन्मांचा अभंग आणि कडकडला स्तंभ गडगडले गगन या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी गायक सुशील खर्डीकर,बाळासाहेब परिचारक, बापू केसकर, देविदास परिचारक, रामदास रोंगे,राजाभाऊ केसकर,सुरेश पंढरी,नंदकुमार कुलकर्णी,हरिभाऊ कुलकर्णी समस्त (केसकर) कुलकर्णी परिवार तर कुंभार वाडयात भिकाजी कुंभार,गणेश कुंभार,खंडू कुंभार,सुनील कुंभार, रामदास कुंभार आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते.रविवार असल्याने नाभिक समाजाने दुपारी दोन नंतर व्यवसाय थांबवून जयंती व प्रसादाचे हिलाळ पार येथे आयोजन केले होते.समाधान हिलाळ ,दत्ता हिलाळ, प्रशांत हिलाळ,आबा हिलाळ आदींसह ग्रामस्थ





पंढरपूर : तालुक्यातील खर्डी येथे नृसिंह जयंती निमित्त जन्माचा अभंग आणि भजनाचा कार्यक्रम करताना ग्रामस्थ.

उपस्थित होते. जयंती दिवशी काही ठिकाणी उपवास पाळण्यात आला तर प्रथेनुसार काही ठिकाणी प्रासादिक भोजनाचे भात आमटी, शिरा व्यंजने आयोजन करण्यात आले.तर कुलकर्णी वाडा येथेही प्रसादाचे दुसरे दिवशी नेवेद्य नंतर आयोजन असते. गावात सर्वत्र धार्मिक वातवरण होते. कुठेही स्पिकर गोंधळ न करता अत्यंत शांततेत नृसिंह जयंती पार पडली.

## बार्शी न्यायालयातील महालोकअदालतीत जत्रेचे स्वरुप

**3,3२१ प्रकरणे तडजोडीने निकाली**

**3 कोटी १६ लाखांची वसुली**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मे-**

बार्शी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर श्री. एम. एस. शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यु. पी. देवर्षी यांचे सहकार्याने, बार्शी तालुका विधी सेवा समिती, बार्शी व वकील संघ बार्शी यांच्या संयुक्त विदयमानाने तसेच अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती बार्शी तथा जिल्हा न्यायाधीश १ विक्रमादित्य के. मांडे यांचे अध्यक्षतेखाली बार्शी न्यायालयात आयोजित केलेल्या राष्ट्रीय महालोकअदालतीत २३३ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखलपूर्व ३०८८ असे ३३२१ इतकी प्रकरणे राष्ट्रीय महालोकअदालतमध्ये तडजोडीने मिटवून त्यात सुमारे अनुक्रमे २ कोटी २० लाख ७७ हजार ५९० व दाखलपूर्व प्रकरणांत ९५ लाख २४ हजार ४०६



रुपयांची वसुली झाली.

या राष्ट्रीय महालोकअदालतीत बार्शी न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ३८५८ व दाखलपूर्व ६४०१ असे १०२५९ प्रकरणे लोकअदालत पॅनलमध्ये तडजोडीने ठेवण्यात आली होती. या लोकअदालतीमध्ये बार्शी न्यायालयातील एकूण सहा पॅनल करण्यात आले होते. त्यात जिल्हा न्यायाधीश १ श्री. विक्रमादित्य के. मांडे, जिल्हा न्यायाधीश-२ श्री. एल. एस. चव्हाण, सह दिवाणी न्यायाधीश व स्तर श्रीमती आर. एम. कटे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बी. डी. गोरे, सह दिवाणी न्यायाधीश क स्तर पी. व्ही. राऊत, २रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर जी.एस. पाटील, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर एच. यु. यु. पाटील असे सहा पॅनल होते. विशेष बाब म्हणजे व्ही. के. मांडे पॅनल प्रमुख १ यांनी वयोवृध्द मालन तुकाराम पुराणे या अंध महिला पक्षकाराची स्वतः न्यायालयाबाहेर जावून तडजोड पडताळणी केली. सह दिवाणी न्यायाधीश व स्तर श्रीमती आर. एम. कंटे मॅडम यांचे पॅनलसमोर एकूण ४ जेष्ठ नागरिकांची प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आले. बी. डी. गोरे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बार्शी यांचे पॅनलमध्ये १ दिवाणी प्रकरणांत अभासी यंत्रणेद्वारे तडजोडीने निकाली काढण्यात आले. जिल्हा न्यायालयातील मोटार अपघ्वात प्रकरणांत एकुण १ प्रकरणे तडजोडीने मिटुन त्यात सुमारे १२ लाख ५० हजार इतक्या रक्कमेची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. एन. आय. क्ट १३८ च्या एकुण १० प्रलंबित प्रकरणांत तडजोड होवुन त्यात सुमारे २० लाख ९९ हजार ७९९ रुपयांची वसुली, तर रक्कम वसुलीच्या २३ प्रकरणांत तडजोड होवुन त्यात १ कोटी ५२ लाख ३१ हजार २३१ रुपयांची वसुली झाली. न्यायालयातील प्रलंबित तडजोडपात्र १२ फौजदारी प्रकरण व कबुलीची ११३ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. त्यात सुमारे १ लाख २ हजार ७०० रुपयांची दंड वसूल करण्यात आला. सदर लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला. राष्ट्रीय महालोकअदालतमध्ये यशस्वी करणेकामी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आर. एन. गुंड, पॅनल विधीज्ञ, सर्व न्यायालयातील कर्मचारी, पोलीस कर्मचारी, बँका तसेच फायनान्स कंपन्या, नगरपरिषद बार्शी, पंचायत समिती बार्शी, विज वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले.


# अक्कलकोटला पौर्णिमेनिमित्त भाविकांची गर्दी

## मंदिर परिसरात वाहनांची कोंडी

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. १९ मे -**

बुद्ध पोर्णिमेच्या पुर्व संध्येला तीर्थक्षेत्र अक्कलकोटी शनिवार, रविवार व सोमवारी सलग सुट्टीमुळे श्री दत्त अवतार श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनार्थ भाविकांची प्रचंड गर्दी झाली आहे.

वटवृक्ष मंदिर परिसरातील अरुंद रस्ते, मोठ्या प्रमाणातील अतिक्रमण, रस्त्याच्या कडेला वाहनांची पार्किंग यामुळे वटवृक्ष मंदिर परिसरात वाहनांची प्रचंड गर्दी होती. पाच मिनीटे भाविकांची वाहने रस्त्यावरच जाम झाली होती. मात्र फिक्स पॉईटचे ट्रॉफीक पोलीस बसव मिरवणुक बंदोबस्त वाहतुक नियंत्रणात व्यस्त असल्याने भाविकांच्या वाहनाचे नियंत्रण राम भरोसे झाले. यावेळी परगावच्या भाविकानां प्रचंड मनस्ताप सोसावा लागला. स्वामी भक्त नरेश अहिर, हेमंत गंवडे, ऋषी वसंत देडे यांनी परिसरातील अतिक्रमण त्वरीत काढावे, रस्ते तातडीने रुंदी करण करावे, अशी मागणी केली आहे.





## महत्वाचे...

### वैशाली हावनूर यांची धम्मसेविका पुरस्कारासाठी निवड

**अक्कलकोट दि ११ मे-**

शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हा संघटक तथा अक्कलकोट शिवसेना शहर प्रमुख वैशाली हावनूर यांची धम्मसेविका पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हा पुरस्कार राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय व सांस्कृतिक भवनचे प्रमुख दिलीप कदम यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. सोमवार दि. १२ मे भगवान गौतम बुद्ध जयंती निमित्त राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय बागेहळ्ळी रोड येथील सभागृहात सायं ५ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात वैशाली हावनूर यांना धम्मसेविका पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. वैशाली हावनूर यांना धम्मसेविका पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हा उपाध्यक्ष स्वामीनाथ हेगडे पत्रकार स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, नंदकुमार जगदाळे, रमेश भंडारी ,अक्कलकोट शिवसेना शहर महिला आघाडी उपप्रमुख वर्षा मेत्रे, आकाश बबलाद आदींसह विविध मान्यवरानी अभिनंदन केले.





### संभाजी महाराज जयंतीनिमित्त शांतता कमिटीची बैठक

**सोलापूर, दि. ११ मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंती निमित्त आज शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. पोलीस प्रशासनाने मंडळांचे अडचणी जाणून घेतले आणि योग्य निर्णय घेण्यात येथील असे सांगितले. यावेळी सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी, मध्यवर्ती महामंडळचे प्रमुख पदाधिकारी, मिरवणूक काढणारे मंडळ, शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष राम जाधव यांच्यासह शिव शंभू भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अशोक चौकातील पदम-कर्णिक नगर बास्केटबॉल प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**सोलापूर, दि. ११ मे-**

अशोक चौकातील पदम-कर्णिक नगर बास्केटबॉल अकादमीचा समारोप स्वाती कोठे मॅडम, विशाल बनसोडे, अश्वीन येदूर हे उपस्थीत होते. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पदमनगर बास्केटबॉल अकॅडमीतर्फे संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत हे शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात बास्केटबॉलचे बेसिक स्कील्स, वार्म अप, रनिंग, टींब्लींगचे प्रशीक्षण देण्यात आले. या कॅम्पमध्ये सात ते दहा वयोगटातील खेळाडूंसाठी पाच व सहा नंबर व मोठया गटातील खेळाडूंसाठी सात नंबरचा बॉल वापरण्यात आला. या कॅम्पमध्ये टू मेन पासेस, थ्री मेन पासेस, ऑफेन्स डिफेन्स रनिंग शॉटचाही सराव घेण्यात आला. क्रीडांगणावर कोन ठेवून सरळ रेषेत टींब्लींग व जीग जॅग टींब्लींग चा सराव घेण्यात आला. त्याचबरोबर दररोज शेवटी दहा मिनिटे ध्यान घेण्यात आले. तसेच योगा व फिटनेस, पर्सनॅलीटी डेव्हलपमेंट, क्रीडा कौशल्याचा विकास आदी प्रशीक्षणांचा समावेश होता. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रशीक्षक श्रीधर गायकवाड, प्रबुध्द चिंचोलीकर, श्रीधर ताटीपामूल, आनंद वल्लाकाटी यांनी परीश्रम घेतले.


# तीन वर्षे झाली तरी पाणीपुरवठा योजना अपूर्णच

## गावातील कृत्रिम पाणीटंचाईकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. ११ मे -**

ग्रामीण जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या निकृष्ट कामाबद्दल वेळोवेळी आंदोलने व निवेदने देऊनही पाणीपुरवठा विभागाने दखल घेतली नाही त्यामुळे रविवारी ११ मे रोजी पाण्याच्या टाकीवर आंदोलन करण्यात आले. दोन दिवसात आंदोलक , ग्रामस्थ व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांच्याशी एकत्रित बैठक घेऊन यावर तोडगा काढूनच पुढे काम सुरू केले जाईल या आश्वासनावर आंदोलकांनी आंदोलन स्थगित केले आहे . जल जीवन मिशन 'हर घर जल 'यापाणीपुरवठा योजनेअंतर्गत झाडी (ता . बार्शी ) गावासाठी सुमारे ५६ लाखाचे काम मंजूर आहे .यामध्ये पाण्याची टाकी ,पाईपलाईन ,विहीर , पाणी वितरणासाठी पाईपलाईन आदी कामाचे स्वरूप आहे . २ सप्टेंबर २०२२ ते १ सप्टेंबर २०२३ अखेर काम पूर्ण होणे अपेक्षित होते .प्रत्यक्षात मात्र तीन वर्ष पूर्ण होत आले तरी अद्याप काम पूर्ण झालेले नाही .गावामध्ये त्यामुळे कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे .

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने टेंभुर्णी येथील ठेकेदार अतुल खुळे यांना १९ ऑगस्ट २०२४ रोजी नोटीस पाठवून पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईन ' नळ कनेक्शन , पाण्याची टाकी 'आदी सर्व कामे अपूर्ण असून ती वेळेत पूर्ण करावी अन्यथा ग्रामस्थ आंदोलन करणार आहे .विहिरीत पाणी आहे मात्र या योजनेचे काम पूर्ण नसल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे .त्वरित काम सुरू केले नाही तर आपले नाव मक्तेदाराच्या ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येईल असे त्यांना नोटीसी व्दारे कळविण्यात आले होते. आंदोलनाच्यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा उप विभागाचे शाखा अभियंता संदेश शिंदे, उपळे दुमाला मंडळ अधिकारी मनोज संकपाळ, झाडीचे ग्रामसेवक औदुंबर कराड, सरपंच रमेश सांगुळे, माजी सरपंच जयपाल मते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> वैराग पोलीस ठाण्याच्या वतीने सकाळपासून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, पोलीस कॉन्स्टेबल किसन कोलते आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सकाळी सात वाजता आंदोलक प्रेमचंद सांगुळे यांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू केले. पाण्याच्या टाकीवरील आंदोलन दुपारी तीन वाजेपर्यंत सुरू होते. यापूर्वीही पाण्याची टाकीवर चढून आंदोलन केले त्यावेळी उत्कृष्ट दर्जाचे काम करण्याचे तोंडी आश्वासन दिले होते .त्यामुळे प्रशासनावर विश्वास राहिला नसून येत्या दोन दिवसात प्रत्यक्ष बैठकीत तोडगा निघेल अशी आशा आहे. पाणीपुरवठा योजनेतील विहीर, पाईपलाईन, इतर कामाबाबत माझी तक्रार नसून फक्त पाण्याच्या टाकीच्या निकृष्ट कामाबद्दल ची तक्रार आहे .काम उत्कृष्ट दर्जाचे होतं नाही तोपर्यंत मी आंदोलनावर ठाम राहणार आहे.
>
> **प्रेमचंद सांगुळे, आंदोलक**

# शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही : आ. खरे

## शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रयत्नशील

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ११ मे-**

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही. शेतकऱ्यांनी मतदान केले. पण सरकारने कदर केली नाही आहे. येणारा काळ कठीण आहे. शेतकऱ्यांची मुले शेतीतून बाहेर पडत आहेत. मी आमदार म्हणून सांगतो की, राज्य सरकारच्या सर्व योजनांचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा यासाठी कायम प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन मोहोळचे आमदार राजू खरे यांनी केले.



येथील कृषी विज्ञान केंद्रात खरीप पूर्व पेरणी हंगामाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी जेष्ठ नेते बळीरामकाका साठे, मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारस्कर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख चरण चवरे, शिवसेना उबाठाचे माजी नगरसेवक सत्यवान देशमुख, विनोद कांबळे आदी उपस्थित होते. शेतकऱ्यांना वीज आणि पाणी द्या तो जगाचा पोशिंदा आहे. यासाठी मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडून आष्टी उपसा योजनेसाठी ४० कोटी रुपये मंजूर करुन घेतल्याशिवाय उठलो नाही. शेतकऱ्यांनी शेतीकडे लक्ष दिले तरच सर्व टिकेल. शेतीत येणाऱ्या अडीअडचणीसाठी अर्ध्या रात्री फोन करा हा आमदार हजर आहे. असेही आमदार खरे म्हणाले. प्रास्ताविकात तालुका कृषी अधिकारी अतुल पवार यांनी गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेचे ७२ प्रस्ताव पैकी ५४ मंजूर झाले त्यासाठी १ कोटी ७ लाख रुपये वितरित करण्याचे आले आणि ग्रीस्टेक योजनेमध्ये ४१ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केल्याचे सांगितले. सूत्रसंचालन सविता वाघमोडे यांनी केले.



**उन्हापासून सायकलचे रक्षण**

सोलापूर : वाढत्या तापमानामुळे शहरात विक्रीस ठेवलेल्या नव्या सायकलवर चक्क पुठ्ठ्यांनी झाकण्यात आले आहे. सावरकर मैदान परिसरातील टिपलेले छायाचित्र.



**नरसिंह जन्मोत्सव**

सोलापूर : शहरात रविवारी सांयकाळी अशोक चौक परिसरात श्री लक्ष्मी नरसिंह देवस्थानात नरसिंह जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला. (छायाचित्र : केवल तिवारी)

# सुमतीबाई स्कूलच्या दोघांची राज्य तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूलच्या सईप्रिया इमड्डुशेट्टी व अभिजीत नडगेरी यांची राज्य तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



तायक्कांदो असोसिएशन ऑफ सोलापूरतर्फे पिलीव (ता. माळशिरस) येथे झालेल्या जिल्हा तायक्कांदो कॅडेट, जुनिअर गटामध्ये क्योरूगी या प्रकारामध्ये स्कूलच्या खेळाडूंनी कामगिरी केली. प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची नाशिक येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना प्रशिक्षक सोमनाथ मगर, क्रीडा शिक्षक अजित पाटील व रोहन घाडगे यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, विश्वस्त करण शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांनी अभिनंदन केले.

**जिल्हा स्पर्धेत कामगिरी केलेले खेळाडू**

**मुली :** कॅडेट गट : सईप्रिया इमड्डुशेट्टी (३७ किलो वजनी गट, प्रथम). ज्युनियर गट : श्रध्दा इमड्डुशेट्टी (४९ किलो, तृतीय).

**मुले :** कॅडेट गट : गौरव गावडे (३३ किलो, द्वितीय), अभिजीत नडगेरी (४१ किलो, प्रथम). ज्युनियर गट : मनीष माने ( ५५ किलो, द्वितीय).

# ए.जी. पाटील श्री २०२५चा विजेता शोएब कुरेशी

## पश्चिम महाराष्ट्र शरीरसौष्ठव : अकबर कुरेशी उपविजेता,बेस्ट पोझर अक्षय जगताप व मोस्ट ईम्प्रुव्हड मनोहर लाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

पश्चिम महाराष्ट्र शरीर सौष्ठव येथील शोएब कुरेशी हा ए.जी. पाटील श्री २०२५चा मानकरी ठरला. ६ गटातील प्रथम विजेत्यामध्ये शोएब हा सरस ठरला. अकबर कुरेशी याला उपविजेता म्हणून तर बेस्ट पोझर अक्षय जगताप (टेंभूर्णी) व मोस्ट ईम्प्रुव्हड मनोहर लाड (सांगली) यांना घोषित करण्यात आले.

केएलई शाळेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १०५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. यात कोल्हापूर, सांगली, सोलापूर उस्मानाबाद व उमरगा या जिल्हयातील स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेसाठी रु. २ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात आली. ए.जी. पाटील इन्स्टिट्यूटचे चेअरमन सिध्देश्वर अण्णा पाटील यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. याप्रसंगी माजी आमदार शिवशरण आण्णा पाटील, शिवानंद पाटील, जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, पृथ्वी सुरवसे, प्रतिक भागवत, पायल कंडरे व रविंद्र नाशिककर आदी उपस्थित होते. या स्पर्धासाठी परिक्षक म्हणून प्रमोद काटे, रामकृष्ण चितळे, नरेंद्र कदम, राजेश रागडे, उदय पालकर, रविंद्र आरते, नझीर शेख, गोरख गडसिंग, शफी शेतसंदी, शकील बडेघर व शरणकुमार कुंभार यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शिवानंद पाटील व रतिकांत पाटील यांनी परिश्रम घेतले.




**विविध गटाचे अंतिम निकाल (प्रथम पाच)**

**५५ किलो :** अक्षय जगताप (टेंभूर्णी), सचिन कांबळे (कोल्हापूर), काशीनाथ देवकते (सोलापूर), निखिल सोनकांबळे (माढा), तौफीक चाँदा (सोलापूर).

**६० किलो :** आकाश वाघमारे, राजशेखर श्रीराम, प्रतीक कुलकर्णी, इम्रान शेख (सोलापूर), अमन दफेदार (अक्कलकोट).

**६५ किलो :** योगेश गव्हाणे (बार्शी), अनिकेत लिंगायत, गणेश जाधव (सोलापूर), जयकुमार मानकापुरे (कोल्हापूर), राजेश प्रजापती (बार्शी).

**७० किलो :** मनोहर लाड(सांगली), जितेंद्र सांवत(कोल्हापूर), निखिल चव्हाण, शाबाद नदाफ, प्रणव गुजर (सोलापूर).

**७५ किलो :** अकबर कुरेशी (सोलापूर), सचिन पालकर (कोल्हापूर), आकाश सुरवसे (सोलापूर), प्रवीण बंडगर (कोल्हापूर), राहूल जेऊरकर (सोलापूर).

**७५ किलोवरील :** शोएब कुरेशी (सोलापूर), ओंकार पाडळकर (कोल्हापूर), रितेश पाद्धे, जावेद शेख, स्वामी (सोलापूर).

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर

दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अपघातग्रस्त सौरभ बनकर यांना ४२ लाखांची भरपाई मंजूर

## लोकन्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

सौरभ बनकर (वय २७) हे २४ एप्रिल २०२३ रोजी चारचाकी वाहनातून हैद्राबाद रोड वरून पुणे येथे जात असताना बोरामणी येथे प्रवास करीत असलेल्या कार चालकाचा ताबा सुटल्याने अपघातामध्ये बनकर हे गंभीर जखमी झाले होते.



यावेळी ॲड. रूपेश महिंद्रकर व ॲड. सौरभ साळुंखे यांच्यामार्फत बनकर यांनी सोलापूर येथील जिल्हा न्यायालयात नुकसानभरपाईसाठी तक्रार दाखल केली. बनकर यांच्या वकिलांच्या प्रयत्नामुळे दि. १० मे रोजीच्या लोकन्यालयात सदर तक्रार गुन्ह्याची दखल घेऊन ४२ लाख रुपये देऊन निकाली काढण्यात आली. लोकन्यालया मधील सर्वात मोठ्या रक्कमेची नुकसानभरपाई असल्यामुळे सर्वांसाठी लक्षवेधी ठरली. सोलापूर जिल्हा प्रमुख न्यायाधीश एम. एस. शर्मा यांनी जखमी बनकर यांना धनादेश देवून दोन्ही विधिज्ञाचाही सत्कार करून शुभेच्छा दिल्या. सदर प्रकरणामध्ये जखमी बनकरतर्फे ॲड. रूपेश महिंद्रकर व सौरभ साळुंखे यांनी तर श्रीराम जनरल इन्शुरन्स कंपनीतर्फे ॲड. प्रणव कुलकर्णी यांनी काम पहिले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## ▶▶ महत्वाचे...

### मोटारसायकल चोरीच्या शहरात तीन घटना

**सोलापूर, दि.११ मे-**
शहरात मोटरसायकल चोरीच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढतच होत आहे. रोज दोन-तीन मोटरसायकली चोरीस जात आहेत. आज शहरात एकाच वेळी तीन ठिकाणी मोटरसायकली चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. राहुल सिद्धेश्वर अल्ली (रा. भद्रावती पेठ सोलापूर) याने टायटल शोरूम समोर आपली होंडा शाईन मोटरसायकल क्रमांक एम. एच.१३ डी .एल .६९९९ ही हँडल लॉक करून ठेवली असताना चोरून नेली.दुसऱ्या घटनेत पांडुरंग नारायण फुलमारी (वय ४७ रा. सायलीला अपार्टमेंट, गांधीनगर सोलापूर) यांनी आपल्या राहत्या घराजवळ हँडल लॉक करून ठेवलेली मोटर सायकल क्रमांक एम. एच. १३. सी.सी .५६४0ही चोरून नेली. तर तिसऱ्या घटनेत ज्योतिबा सौदागर गुंड (रा. रामलाल चौक सोलापूर) यांनी हरीभाई देवकरंण प्रशालेच्या गेट समोर हँडल लाक करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम. एच. १३ डी.डी. ७७७५ ही चोरून नेली.तिन्ही घटनेच्या नोंदी पोलीस ठाण्यात झाल्या असून अज्ञात चोरट्याचा पोलीस तपास करत आहेत.

### आवाज करू नको म्हणाल्याने बाप-लेकास बेदम मारहाण

**सोलापूर, दि.११ मे-**
घरासमोरील मोकळ्या मैदानात आरडाओरडा करत दोघे थांबले असताना आवाज करू नका असे म्हटल्याने दोघांनी चिडून जाऊन बाप-लेकास मारहाण केली.फिर्यादी रामू सुभाष करली (वय ४९ रा. विडी घरकुल सोलापूर) यांच्या घरासमोर दोघे आरडाओरडा करत थांबले असताना करली यांनी त्यास हटकले व आवाज करू नका. असे म्हटले असताना दोघांनी रामू करली यास शिवीगाळ करून मारहाण केली. भांडणे सोडवण्यास फिर्यादीचा मुलगा सुनीलकुमार हा आला असता त्यालाही या दोघांनी मारहाण करून गंभीर जखमी केले.एमआयडीसी पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे.

### एनटीपीसीने आहेरवाडी गावास टँकरद्वारे पाणी देण्याची मागणी

**सोलापूर, दि. ११ मे-**
एनटीपीसी प्रकल्पात दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथील गावे बाधित आहेत. उदा. आहेरवाडी, होटगी स्टेशन फताटेवाडी या गावाना पिण्याची पाणी दररोज मिळत नसून ४ ते ५ दिवसाआड पाणी मिळत आहे. त्यामुळे नागरीकांची भयंकर गैरसोय होत असून सध्या भंयकर उन्हळयाचे दिवस असून नागरीकांना पिण्याचे पाणी, घरगुती वापरासाठी व जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळत नसल्यामुळे आदी समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहेत. नागरीकांचे अंत न पाहता एनटीपीसीचे महाप्रबंधक व इतर अधिकाऱ्यांनी तातडीने वरील गावास भेट देवून ट्रॅकरद्वारे पाण्याची सोय करावी असे पत्रक रिपाईचे जिल्हासचिव सोमनाथ घोडकुंबे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. तालुक्याचे गटविकास अधिकारी व तहसिलदार हे निष्क्रीय झाले असून अनेक अबालवृध्द, महिलांचे पाण्याविना हाल होत आहेत. वेळीच दक्षता न घेतल्यास रिपाई आठवले गटातर्फे आंदोलन

# सोलापूर बाजार समिती सभापतीपदी दिलीप माने

## उपसभापतीपदी सुनिल कळके

## दोन वर्षानंतर हसापूरेंना संधी?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मे-**

सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी माजी आमदार दिलीप माने यांची तर उपसभापतीपदी आमदार सचिन कल्याणशेट्टी समर्थक मुस्तीचे सुनिल कळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. रविवारी ११ मे रोजी सकाळी ११ वाजता बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी व आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते. प्रारंभी सकाळी नऊ वाजता सर्व संचालकांची अक्कलकोट येथील आमदार कल्याणशेट्टी यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. सर्व संचालकांचे मत बैठकीत जाणून घेतले. त्यानंतर संचालक बाजार समिती कार्यालयात आल्यानंतर आमदार कल्याणशेट्टी यांनी सभापतीपदासाठी माजी आमदार दिलीप माने यांचे तर उपसभापती पदासाठी सुनिल कळके यांचे नाव जाहीर केले. यावेळी नूतन संचालक सुरेश हसापूरे, इंदुमती अलगोंडा पाटील, अविनाश मार्तंडे, नागण्णा बनसोडे, सुभाष पाटोळे, उदय पाटील, प्रथमेश पाटील, अनिता विभूते, श्रीशैल नरोळे यांच्यासह अन्य संचालक उपस्थित होते.

सभापती म्हणून दिलीप माने व उपसभापती म्हणून सुनिल कळके यांची निवड झाल्यानंतर आमदार देशमुख गटाचे संचालक मनिष देशमुख, रामप्पा चिवडशेट्टी व अतुल गायकवाड यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. बाजार समितीच्या निवडणुकीत आ. कल्याणशेट्टी, दिलीप माने व दक्षिणचे नेते सुरेश हसापूरे यांच्या पॅनेलने विजय मिळविल्यानंतर सभापती पदाविषयी उत्सुकता होती. शिवाय इच्छुक सर्व नेत्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत भेट घेऊन सभापती निवडीचे सर्वाधिकार मुख्यमंत्र्यांना दिल्याचे सांगितले होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आ. कल्याणशेट्टी यांच्याकडे सभापती पदाचे नाव सुचविणार असल्याचे सांगितले होते. सभापतीच्या नावाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते. रविवारी आ.कल्याणशेट्टी व आ. देवेंद्र कोठे यांनी सभापतीचे नाव जाहीर करून निवड प्रक्रिया बिनविरोध पार पाडली. सभापती पदासाठी दिलीप माने व उपसभापती पदासाठी सुनिल कळके यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज आल्याने बिनविरोध निवड पार पडली. निवडीनंतर नूतन सभापती दिलीप माने यांचा आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते तर उपसभापती सुनिल कळके यांचा आमदार कोठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नूतन पदाधिकाऱ्यांनी लोकनेते बाबूराव चाकोते यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले. दिलीप माने यांचे नाव जाहीर होताच माने समर्थकांनी बाजार समिती कार्यालयासमोर जल्लोष केला. सभापती माने यांना क्रेनच्या साहायाने पुष्पहार घालण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांकडून गुलालांची उधळण करून घोषणा देण्यात आले. यावेळी उत्तर व दक्षिण तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.



### आ. सचिन कल्याणशेट्टींचा निर्णय मान्य : हसापुरे

सभापती व उपसभापती निवडीचे सर्वाधिकार मुख्यमंत्र्यांकडून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना देण्यात आले होते. त्यानुसार आमदार कल्याणशेट्टी यांनी दिलीप माने यांचे नाव जाहीर केला आहे. त्यामुळे मी सभापती पदासाठी इच्छुक होतो, तरी पण आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी घेतलेला निर्णय मला मान्य आहे. त्यामुळे मी नाराज नाही.

### सभापती निवडीच्या सभेला राजशेखर शिवदारे गैरहजर

सभापती पदासाठी इच्छुक असलेले दक्षिणचे नेते राजशेखर शिवदारे हे सभेला गैरहजर होते. सभापती पदासाठी दिलीप माने यांचे नाव जाहीर झाल्याने त सभापती व उपसभापती निवडीच्या सभेला गैरहजर राहले. शिवदारे हे नाराज असल्याची चर्चा होती. त्यांच्या नाराजीची दखल घेतली जाते का हे लवकरच स्पष्ट होईल.

### बाजार समिती निवडणुकीच्या केंद्रस्थानी यंदा अक्कलकोट

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती व उपसभापती निवडीसाठी अक्कलकोट येथे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या निवासस्थानी नूतन संचालकांची बैठक झाली. यावेळी सभापती व उपसभापती नावावर चर्चा झाली. दोन वर्षानंतर सभापती व उपसभापती बदलाबाबतही चर्चा झाल्याचे कळते. या निवडणुकीच्या केंद्रस्थानी अक्कलकोट होते.

### दोन वर्षानंतर हसापुरे यांना संधी

सभापती पदासाठी दिलीप माने व सुरेश हसापूरे यांच्यामध्ये चुरस होती. रविवारी अर्ज भरण्याच्या वेळेपर्यंत नाव जाहीर करण्यात आले नव्हते. नावाविषयी जोरदार चर्चा सुरू होती. अखेर दिलीप माने यांचे नाव सभापती पदासाठी जाहीर झाले. इच्छुक सुरेश हसापूरे यांना दोन वर्षानंतर सभापती पदासाठी संधी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे हसापूरे समर्थकही नाराज असल्याचे दिसून आले.

# तापमान घटल्याने अवकाळीची शक्यता

## पेरणीपूर्व मशागतीला वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

शहर आणि जिल्ह्यात गेल्या ४ ते ५ दिवसांपासून तापमानात कमालीची घट (३८ अंश सेल्सियसपर्यंत) आल्याने अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरम्यान,आता खरीपाच्या पेरणीपूर्व मशागतीही अंतिम टप्प्यात आल्या असल्याचे चित्र आहे.

मे महिन्याच्या सुरूवातीला तापमानाचा पारा जवळपास ४४.७ अंश सेल्सियसपर्यंत गेल्याने सोलापूरकर चांगलेच उकाड्याने हैराण झाले होते. आता गेल्या आठवड्यापासून वादळी वारे सुरू झाले आहे. आभाळही येत असल्याने तापमान घटले असून, अवकाळी पावसाची शक्यताही हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी विजांच्या कडकडात जिल्ह्याच्या काही भागात पावसाच्या सरींचेही आगमन झाले होते. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यातही अवकाळीच्या सरी काही ठिकाणी



बरसल्या होत्या. यानंतर प्रचंड तापमान वाढून उकाडाही चांगलाच वाढला होता. आता तापमानाचा पारा खाली आल्याने हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली असून, तर काही ठिकाणी हलका पाऊस किंवा ढगाळ वातावरण राहील असे सांगितले आहे. तर जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनचा पाऊस सरासरीच्या १०३ टक्के होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

यामुळे शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण पसरले आहे. सध्या जिल्ह्यातील शेतकरी बांधव पेरणीपूर्व मशागतीच्या कामात गुंग आहे. मे एन्डपर्यंत ही सर्व कामे झाल्यानंतर पाऊस पडताच ८ जून पासून जिल्ह्यातील शेतकरी पेरणीसाठी सज्ज होतो.

# 'स्पेनका'चे आदमाने यांनी शून्यातून विश्व निर्माण केले

## खा. उदयनराजे भोसले यांचे गौरवोद्गार

## निरोगी आरोग्यासाठी स्पेन्काला प्राधान्य द्या

## 'स्पेन्का'च्या कार्पोरेट कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

जीवन जगण्यासाठी पाणी महत्त्वाचे आहे. निरोगी आरोग्यासाठी स्पेन्काला प्राधान्य द्यावे. सुहास आदमाने यांचा जन्म सर्वसामान्य कुटुंबातून झाला असून त्यांनी जिद्द, चिकाटी उराशी बाळगून शून्यातून विश्व निर्माण केले आहे. आदमाने म्हणजे अनेकांना रोजगार देणारा सुहास आदमाने म्हणजे मूर्ती लहान पण किर्ती महान असल्याचे गौरवोद्गार खा. छत्रपती उदयनराजे भोसले यांनी काढले.

रविवारी, सात रस्ता ते स्टेशन रोड येथील स्पेन्का कंपनीच्या नव्या कॉर्पोरेट कार्यालयाचा उद्घाटन समारंभ छत्रपती भोसले यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रिसिजन कॅम्पशाफ्टसचे चेअरमन यतीन शहा हे होते. स्पेन्काचे व्यवस्थापकीय संचालक सुहास आदमाने, आ. सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, माजी आ. राजन पाटील, संचालिका अश्विनी आदमाने, प्रा. शिवाजी सावंत आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते नव्या तंत्रज्ञानाच्या अल्कलाइन आयोनायझरचे सादरीकरण बालाजी सरोवर येथे करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्योजक दीपक जाधव यांनी केले. तनिषा कदम यांनी स्पेन्का मिनरल वॉटर फिल्टरचे पीपीटीद्वारे महत्व सांगत गुणवत्ता आणि आपुलकीची सेवा, उत्तम व्यवस्थापनाव्दारे भारतातील एक नामांकित बँड म्हणून स्पेन्काला ओळखले जात आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा येथील ५ हजाराहून अधिक हॉटेल्स, रेस्टॉरंटस व लाखो ग्राहंकापर्यंत स्पेन्का ब्रँड पाहोचला असल्याचे यावेळी सांगितले खा. छत्रपती उदयनराजे भोसले पुढे म्हणाले, जीवन जगण्यासाठी पाणी महत्त्वाचे आहे. भविष्यात पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. प्रत्येक कुटुंबांना लहान मुलांची जबाबदारी असते.अशा परिस्थितीमध्ये स्पेन्काचे पाणी महत्त्वाचे ठरणार आहे.स्वतःच्या कर्तुत्वावर सुहास आदमाने यांनी ही कंपनी उभा केली. कधीही हाक द्या, मदतीसाठी मी तत्पर आहे, असे आश्वासन त्यांनी दिले. स्पेन्काचे व्यवस्थापकीय संचालक आदमाने म्हणाले, छत्रपती उदयनराजे महाराजांकडून अनेक गोष्टी शिकतो. त्यांची विचार करण्याची पद्धत, निर्णय घेण्याची क्षमता ही वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्याबद्दल बोलण्यासारखे खूप आहे. फक्त त्यांची साथ सदैव पाठिशी राहावी. त्यांचा विश्वास कधीच तोडणार नाही, अशी भावना व्यक्त केली.



### स्पेन्का इज ऑलवेज ब्रँड राहणार

अडचणी येतात-जातात. कष्ट केल्याशिवाय काही मिळत नाही. मी कार्यक्रमात खासदार म्हणून आलो नाही. मी सुहासचा हितचिंतक आणि त्याच्या कुटुंबाचा एक घटक म्हणून आलो आहे. स्पेन्काच्या माध्यमातून सर्वसामान्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. स्पेन्का इज ऑलवेज ब्रँड राहणार आहे, असेही खासदार छत्रपती उदयनराजे भोसले याप्रसंगी म्हणाले.

# श्रीलंकेहून आणलेला बोधीवृक्ष सोलापुरात देतोय सावली

## डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या प्रांगणात जपणूक

## सम्राट अशोक यांचा प्राचीन वारसा या वृक्षाला लाभला

## श्रीलंका ते मद्रास जहाजाने तर मद्रास ते सोलापूर रेल्वेने आणले होते रोप

## ६५ वर्षांपासून होते नियमित बुद्ध वंदना

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ११ मे-**

श्रीलंकेहून आणलेला बोधिवृक्ष फॉरेस्ट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या प्रांगणात शितल सावली देत आहे. श्रीलंका ते मद्रास जहाजाने आणि पुढे मद्रास ते सोलापूर रेल्वेने या वृक्षाचे रोप (फांदी) आणले होते. गेल्या ६५ वर्षांपासून या वृक्षाच्या खाली नियमित बुद्ध वंदना घेण्यात येते. भव्य आणि डेरेदार असे या ऐतिहासिक वृक्षाचे वैशिष्ट्य आहे. सम्राट अशोक यांचा प्राचीन वारसा या वृक्षाला लाभला आहे.

नागपूर येथे दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्यानंतर या सोहळ्यास उपस्थित असलेल्यांपैकी भंते एस. परमशांती (हुबळी) हे धम्म



बुद्ध जयंती विशेष

प्रचारार्थ सोलापुरातील फॉरेस्ट तत्कालीन (तुराट गल्ली) परिसरात वास्तव्यास होते. दरम्यान, भंते एस. परमशांती हे काही बौद्ध अनुयायांना घेऊन ते श्रामणेर शिबिरासाठी श्रीलंका येथे गेले होते. तेथून धम्माची एक अविस्मरणीय आठवण म्हणून श्रीलंकेतील अनुराधपुरम येथील बोधिवृक्षांची फांदी (रोप) सोबत आणली. विशेष म्हणजे सम्राट अशोक यांचे सुपुत्र महेंद्र आणि राजकन्या संघमित्रा हे धम्म प्रचारासाठी श्रीलंकेत गेले होते. त्यावेळी त्यांनी बोधगया येथून नेलेले बोधिवृक्ष रोप श्रीलंकेत अनुराधपुरम येथे लावले होते. त्याच बोधिवृक्षाची फांदी श्रीलंकेहून सोलापुरात पावित्र्य जपत आणि श्रद्धापूर्वक आणण्यात आली होती.

श्रीलंका ते मद्रास जहाजाने आणि पुढे मद्रास ते सोलापूर हा प्रवास रेल्वे मेल एक्सप्रेसने करण्यात आला. सोलापुरात आल्यानंतर सन १९६० मध्ये समारंभपूर्वक फॉरेस्ट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या प्रांगणात भंते एस. परम शांती यांनी या बोधीवृक्षाचे रोपण करण्यात केले होते. या वृक्षाभोवती ओटा बांधून बुद्धमूर्ती स्थापित करण्यात आली. दरम्यान, आजतागायत या ठिकाणी बौद्ध अनुयायांकडून नियमितपणे सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचे चेअरमन भागवत सरवदे आणि सरचिटणीस प्रवीण निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांकडून या वृक्ष परिसराची देखभाल आणि जपणूक केली जाते. इतर वृक्षांपेक्षा मोठा भव्य आणि डेरेदार असा हा बोधीवृक्ष आहे. प्रसन्न असे वातावरण या परिसरात अनुभवायला मिळते. भीम जयंती आणि बुद्ध जयंतीची मिरवणूकही या ठिकाणाहून जाते.

### बोधगया येथील बोधीवृक्षाची याठिकाणी अनुभूती : दत्ता गायकवाड

हुबळी येथील भंते एस. परमशांती हे सोलापुरात वास्तव्यास असताना काही बौद्ध अनुयांना घेऊन ते श्रीलंकेला गेले होते. तेथून परत येताना त्यांनी ऐतिहासिक बोधिवृक्षाची फांदी रोप १९६० च्या दरम्यान सोलापुरात आणली. समारंभपूर्वक हे बोधीवृक्षारोपण करण्यात आले होते. आज भव्य डेरेदार असा वृक्ष सर्वांनाच सावली देत आहे. भव्यतेचे वेगळेपण या वृक्षात आहे. या बोधिवृक्षाखाली शांती लाभते. बोधगया येथील बोधिवृक्षाची अनुभूती या ठिकाणी मिळते, असे ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड यांनी सांगितले.

### पावित्र्य राखत नियमितपणे केली जाते देखभाल : राजाभाऊ सरवदे

फॉरेस्ट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या प्रांगणात ऐतिहासिक असा बोधीवृक्ष आहे. हायस्कूलच्या कर्मचाऱ्यांकडून नियमितपणे या परिसराची देखभाल आणि जपणूक केली जाते. पावित्र्य राखले जाते. भविष्यात या बोधिवृक्षाखाली मोठी बुद्ध मूर्ती स्थापित करण्याचा विचार आहे. बौद्ध धम्माच्या दृष्टीने या बोधीवृक्षाचे महत्वपूर्ण वेगळे स्थान आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूल संस्थेचे संचालक तथा माजी मंत्री राजाभाऊ सरवदे यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १११३

**तुजसीं अंतराय होईल । मग सांगे आमुचें काय उरेल ।**
**तेणे दु:खे हिये फुटेल । तुजवीण कृष्णा ।।**

नितीनियमाला अनुकुल असे वर्तन केल्यानंतर, तसेच धर्माचरण केल्यानंतर म्हणजेच सत्कर्मानंतर ईश्वर प्राप्ती होते. ही ईश्वर प्राप्ती मला माझ्या अनेक जन्मीच्या पुण्याईने झाली आहे. माझ्यामध्ये जोपर्यन्त सत्कर्माची भावना आहे, जोपर्यन्त मी सद्वर्तनी असणार आहे तोपर्यन्तच ईश्वर माझ्यासोबत राहील आणि ज्या क्षणी मी वाईट, अयोग्य वर्तनास प्रारंभ करेन तेव्हा ईश्वर आपोआप माझ्यापासून दूर जाईल. म्हणून मी हे लाखो लोकांच्या हत्येचे पाप करणार नाही असे अर्जुन भगंवतांना म्हणाला. जेव्हा ईश्वर आपल्यापासून दूर जाईल तेव्हा त्याच्या विरहाने आपले हदय दु:खाने फुटून जाईल अशी भीती त्याने वर्तविली. ईश्वर हा सत्याचा अंश आहे. जिथे चांगुलपणा, सदवर्तन, न्यायी आचारविचार आहेत



त्या ठिकाणी ईश्वराचे वास्तव्य आहे. वाईट, अन्याय, दुष्कृत्य घडतील तेव्हा त्या ठिकाणाहून ईश्वर आपोआप दूर निघून जाईल. अर्जुनाच्या, तुजसीं अंतराय होईल । मग सांगे आमुचें काय उरेल ।तेणे दु:खे हिये फुटेल । तुजवीण कृष्णा ।। या वक्तव्यातून हे लक्षात येते की, ईश्वराचे स्थान सद्वर्तनी माणसांजवळ आहे. आपण जर सदवर्तनी असू तर ईश्वराला ईतरत्र शोधण्याची गरज नाही. मी लाखो निष्पाप लोकांच्या, आप्तेष्टांच्या मृत्यूला कारणीभूत झालो तर माझ्या पुर्व पुण्याईने प्राप्त झालेला ईश्वर माझ्यापासून दूर जाईल व माझी होणारी हानी कशानेही भरुन निघणार नाही. म्हणून मला राज्य सुखोपभोग नको तर ईश्वरच पाहिजे असे अर्जुन म्हणतो आहे. त्याचे म्हणणे विचार करण्यासारखे आहे. अशी व्दीधा अवस्था घालवण्यासाठी श्रीकृष्णांसारखाच गुरु आवश्यक आहे.

उद्यानात आग लागली तर कोकीळ किंवा ईतर कोणताही पशु, पक्षी, त्या उद्यानात थांबत नाहीत. चिखलयुक्त सरोवर पाहून चकोर त्यातील जलाचे सेवन करीत नाही. याप्रमाणे आपल्यातील पुण्याचा ओलावा संपला व पाप अंगाला चिकटले तर प्राप्त झालेला ईश्वर दूर जाईल असे अर्जुनाला वाटते. राज्यसुख किंवा ईतर सुखोपभोगापेक्षा आपणाला ईश्वरच पाहिजे ही अर्जुनाची मानसिकता आहे. अर्जुनाच्या या मानसिकतेशी आपण आपली मानसिकता जुळवायला हरकत नाही. प्रयत्न केला तर आपली मानसिकता अशी होऊ शकते. अनेकांना ईश्वर, किंवा संतसंगापेक्षा धनसंपदाच जास्त आवडते त्यामुळे लोक खऱ्या सुखापासून दूर असतात. ईश्वरालाही सतत सत्ता, संपत्ती किंवा नाशवंत बाबी मागत असतात. सत्ता, संपती, सौंदर्य हे नाशवंत असून ईश्वर व संतसहवास खऱ्या अर्थाने शाश्वत व सुखावह आहेत याचा बोध या ओवीतून घ्यायला हवा. हा बोध घेतला आणि जीवनात उतरवला तर खऱ्या अर्थाने आनंद मिळू लागेल असे आम्हास वाटते. संतांच्या वचनांचे अर्थ हे आम्ही आमच्या अल्पबुध्दीने काढत आहोत. त्यामुळे आपल्यासारख्या सुजाण वाचकांनी आमच्या चुका, उणीवा आपल्या पदरात घ्याव्यात अशी याप्रसंगी प्रार्थना करीत आहोत.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - शुभ दिवस, |
| दि. १२ मे २०२५ | बुध्द पौर्णिमा |
| विक्रम संवत् २०८१ | परिचारिका दिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| पौर्णिमा (२२.२५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (०६.१६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वरियन (२९.५२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (०९.१५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. महिलांना सौख्याच्या घटना घडतील.

# सैनिकांच्या समर्थनासाठी बालकलावंत हातात तिरंगा घेऊन एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

भारतीय सैन्य दलाचे मनोबल वाढवण्यासाठी आणि ज्या भारतीय सेनेमुळे देश आणि आपण सुरक्षित आहोत अशा सैन्य दलाच्या समर्थनार्थ नागरिकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि जनजागृती निर्माण करण्यासाठी येथील बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा सोलापूरच्या वतीने बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि परिषदेचे कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापुरातील कुमठा नाका येथील चौकात बालकलावंत आणि परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी देशसेवेचे मूल्य रुजवण्यासाठी हातात तिरंगा ध्वज



घेऊन एकत्रित जमले होते.

याप्रसंगी कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात भारतीय जवानांना तुम्ही धैर्याने लढा आम्ही तुमच्यासोबत आहोत, आपल्या जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे. असे सांगत त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

यानंतर परिषदेचे कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहकार्यवाह संजय सावंत यांनी सैन्याचे मनोबल उंचावण्यासाठी त्यांच्या सुरक्षेसाठी आपण सर्वांनी पाठिंबा देण्याचा उद्देश स्पष्ट केला.

उपाध्यक्ष खंडू शिंदे, यांनीही मनोगत व्यक्त केले. तर परिषदेच्या प्रमुख कार्यवाह अर्चना अडसूळ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी नाट्य परिषद नियामक मंडळाचे सदस्य सुमित फुलमामडी, हिरालाल धुळम, गोवर्धन कमटम, किरण लोंढे, नीता देशपांडे, अन्नपूर्णा साखरे, शोभा गिराम, गणपत कोळी, मुजावर, सुपेकर, सप्ताळे, राठोड, या शिक्षक पदाधिकाऱ्यांसह विद्यार्थी बालकलाकार भावना चाटला, अक्षता मेरगु, दर्शना गुंजे, साक्षी मांडवा, रेणुका सरगम, नंदिनी यमदंडी, वैभवी माडेकर, प्रितेश बनसोडे, प्रीतम जवळगिरी, मेघना मडिकर, श्रेया आडम, अक्षता अडकी, अभिषेक सीताफळे, कार्तिक मानेकरी, रोनक अंद्याल यांच्यासह पालक तसेच परिसरातील नागरिकही मोठ्या संख्येने कार्यक्रमास सहभागी झाले होते.

# बुद्ध पौर्णिमेनिमित्त चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद

### १७५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

बोधीवृक्ष फाउंडेशन सोलापूर, महाकारुणिक एज्युकेशनल फाउंडेशन व मूलनिवासी सभ्यता संघ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील १७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.




खुल्या गटातील प्रथम क्रमांक विजेत्याने अजिंठा येथील बोधिसत्व या चित्राने सर्वांचे लक्ष वेधले. विजेत्यांना बक्षीस रूपाने साहित्याचे वाटप, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हाने गौरविण्यात आले. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून रामचंद्र हक्के, डॉ. सुहास सरवदे , मीनाक्षी रामपुरे यांनीकाम पाहिले. याप्रसंगी तीनही संघटनांचे पदाधिकारी डॉ. औदुंबर मस्के , अभियंता राजेश जगताप, संजय आबुटे, उमाकांत राजगुरू ,राहुल बाबरे, स्मिता आबुटे, सुनिता गायकवाड ,डॉ. रेखा ओहोळ, शारदा गजभिये, संघप्रकाश दुड्डे, आशा क्षीरसागर, सुहासिनी देवनवर, अमोल देवनवर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल वाघमारे, मारुती बेलभंडारे, ॲड. पवन भालेदार, अभिषेक सरवदे, सुशांत निकंबे ,दीपंकर माने यांनी योगदान दिले. या स्पर्धेसाठी संडे धम्म स्कूलच्या तीनही शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते. संडे धम्म स्कूलच्या संचालिका स्मिता आबुटे, दिनेश गायकवाड, अजय मोरे यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सुवर्णा वाघमारे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. औदुंबर मस्के यांनी केले. आभार उमाकांत राजगुरू यांनी मानले.

### खुल्या गटामधून शितल आदमाने प्रथम

ही स्पर्धा तीन गटातून घेण्यात आली. लहान गटामध्ये प्रथम क्रमांक प्रार्थना सोमशेखर आळंद हिचा आला. द्वितीय क्रमांक मयूर सुनील कर्डिले , तृतीय क्रमांक एकरा सरफराज शेख हीचा आला. मोठ्या गटातून सार्थकी बालकिसन चिलबेरी हिचा प्रथम क्रमांक, कोमल जयसिंग यनमूल हिचा द्वितीय क्रमांक तर आचल गणेश मार्गम् हिचा तृतीय क्रमांक आला. तर खुल्या गटामधून शितल आदमाने ही प्रथम, प्रसाद आबुटे याचा द्वितीय आणि विजय मंगलुरे याचा तृतीय क्रमांक आला.

# केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समितीच्या सदस्यपदी गणेश डोंगरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**



खासदार प्रणितीशिंदे यांच्या शिफारसीनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य व सोलापूर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांची भारत सरकारच्या केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समिती (झेडआरयूसीसी) सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.या निवडीचे पत्र मध्य रेल्वेचे उपमहाप्रबंधक कुश किशोर मिश्र यांनी दिले.

देशातील रेल्वे झोनपैकी महत्वपूर्ण असलेल्या मध्य रेल्वेचे मुख्यालय मुंबई हे असून या अंतर्गत मुंबई,पुणे,नागपूर,सोलापूर व भुसावळ ये विभाग येतात. रेल्वे विभाग राष्ट्रीय, झोनल आणि विभाग पातळीवर अशा सल्लागार समिती स्थापन करीत असते रेल्वे बोर्डाककडून या समितीच्या नियुक्ती करण्यात येतात. प्रवासाच्या अडचणी,त्याला मिळणाऱ्या सोयी सुविधा या बाबत निर्णय घेणारी ही समिती आहे. मध्य रेल्वेसाठी झोनल रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती जी रेल्वेच्या वापरकरत्याचे प्रतिनिधित्व करते. या निवडीनंतर गणेश डोंगरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांचे आभार मानले. येणाऱ्या काळात प्रवाशाच्या सुखसुविधा व रेल्वेच्या प्रगतीसाठी सातत्याने कृतिशील कार्य करण्यासाठी प्रयन्तशील राहणार असल्याचे म्हटले आहे.मला दिलेली जबाबदारी सकारात्मक काम करत पार पाडेन. या निवडीबद्दल देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे, माजी आमदार दिलीप माने, सोलापूर बाजार समिती संचालक सुरेश हसापुरे, नगरसेवक विनोद भोसले, सचिन गुंड यांनी अभिनंदन केले.

# मसाप पुण्याचे ग्रंथ आणि ग्रंथकार पारितोषिक जाहीर

### ५७ जणांत सोलापूरच्या कवी पत्की, डॉ.अकलूजकर यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ११ मे-**



अमोल पालेकर | डॉ. दाभोळकर | भडकमकर | हेमकीरण पत्की | लता अकलुजकर

महाराष्ट्र साहित्य परिषदेची ग्रंथ आणि ग्रंथकार पारितोषिके जाहीर करण्यात आले असून या पुरस्काराचे वितरण सोमवार दि. २६ मे रोजी सकाळी १०.३० वा. एस.एम.जोशी सभागृहात प्रसिद्ध लेखिका डॉ. सविता सिंह यांच्या हस्ते आणि परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली वितरण करण्यात येणार आहे अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

या ग्रंथ पुरस्कारात अभिनेते अमोल पालेकर, खलील मोमीन, दत्तप्रसाद दाभोळकर, मंगला सामंत, अभिराम भडकमकर, मोनिका गजेंद्रगडकर, भानू काळे, दिलीप फलटणकर, श्रीराम कुंटे, मुग्धा गोडबोले, माधव जाधव, नितीन हांडे, सदानंद कदम, मेघना भुस्कुटे, भीमराव वाघचौरे, डॉ. सविता नायक-मोहिते, शैला मुकुंद, विवेक गाडगीळ, सोलापूरच्या प्रा. डॉ.लता अकलूजकर, विद्या डेंगळे, मोहन काळे, मंजिरी हेटे, प्रसाद महाडकर, संजीवनी खेर, कृष्णाजी कोकाटे, नीलकंठ कदम, डॉ. रेवा दुभाषी, डॉ. संजय कप्तान, डॉ. कुशल पाखले, डॉ. संजय तुंगार, सुधीर साबळे, मंदार गद्रे, विद्या पोळ-जगताप, संजय दुधाणे, महेंद्र कुरघोडे, विजया ब्राह्मणकर, श्रीधर दीक्षित या लेखकांच्या ग्रंथांचा समावेश आहे.

याच कार्यक्रमात ग्रंथकार पुरस्कार देण्यात येणार आहे यात सोलापूरचे ज्येष्ठ कवी हेमकिरण पत्की, अजीम नवाज राही, प्रशांत असनारे, चं.प्र. देशपांडे, डॉ. अशोक चौसाळकर, शिवराज गोर्ले, डॉ. सुनीलकुमार लवटे, हेरंब कुलकर्णी, श्री. द. महाजन, रमणलाल शहा, डॉ. अरुणचंद्र पाठक, मधुवंती पेठे, व.बा. बोधे, अनघा केसकर, श्रीपाद ब्रह्मे, सु.ल. खुटवड, महेश कराडकर, विनया देसाई, उमेश घेवरीकर, उषा मेहता या कवी आणि लेखकांचा समावेश आहे.

रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पारितोषिकांचे स्वरूप आहे. अशी माहितीही महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

# तीन दिव्यांग जोडप्यांच्या बांधल्या रेशीमगाठी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सक्षम सामाजिक संस्था, सोलापूर यांच्या वतीने सर्वधर्मीय दिव्यांग जोडप्यांचा मोफत सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात आणि भावनिक वातावरणात शेळगी येथील मातोश्री हॉल येथे पार पडला.

सोहळ्यात विविध धर्मातील एकूण ३ दिव्यांग वधू-वरांचा विवाह सामाजिक सलोखा जपत लावण्यात आला. नवविवाहित दिव्यांग जोडप्यांना विवाहानंतर संसाराला हातभार लागावा व आर्थिक सक्षमीकरणासाठी फिरता स्टॉल, झेरॉक्स मशीन यांसारखी रोजगारीसाठी मदत करणारी साधने आणि पोशाख, मंगळसूत्र, संसारोपयोगी भांडी इत्यादी साहित्य भेट म्हणून देण्यात आले. संपूर्ण विवाह सोहळ्याचे नियोजन सक्षमचे संस्थापक प्रशांत हिबारे, कार्याध्यक्ष सचिन हुंडेकरी, रावसाहेब सावंत,मनोहर पोतदार, गोपाळ पवार, यशवंत गाडेकर, महादेव देशमुख, सद्दाम पटेल, विठ्ठल शिंदे, महेश मग्रूमखाने, अनिल रबनाळी, बाबा काजळे, गौतम माने आणि त्यांच्या टीमने उत्कृष्टरीत्या पार पाडले. लग्न विधी वेदमूर्ती योगीनाथ स्वामी यांनी पार पाडला.

### सामाजिक ऋण फेडल्याचे समाधान

गेल्या ८ वर्षा पासून मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक ऋण फेडण्याची संधी मिळते. जोडप्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी साहित्य देण्यात येते. मागील जोडप्यांचा आनंदी संसार पाहून सामाजिक ऋण फेडल्याचे आत्मिक समाधान लाभते, अशी भावना सक्षम सामाजिक संस्थेचे प्रशांत हिबारे आणि सचिन हुंडेकरी यांनी व्यक्त केली.




### बाल लैंगिक अत्याचारविरोधी जनजागृती

या विवाह सोहळ्यात 'बाल लैंगिक अत्याचारविरोधी जनजागृती अभियान राबवण्यात आले. लग्नपत्रिकेद्वारे बालकांचे संरक्षण आणि त्यावरील अन्यायाविरोधात कायदाविषयी माहिती देणारे फलक, पत्रकांचे वाटप व जनजागृती करण्यात आली

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये २७ हजार ३२० प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.११ मे-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये सन २०२५ मधील दुसरी राष्ट्रीय लोक अदालत दि.१० मे २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये संपूर्ण जिल्ह्यातून २७ हजार ३२० इतकी प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणामधील तडजोडी मुल्य १,४९,१८,६३,०१६ (एकशे एकोणपन्नास कोटी अठरा लाख त्रेसष्ट हजार सोळा) इतके राहीले. राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून एकुण ३१ जोडप्यांचे वैवाहिक हक्क सामंजस्याने पुर्नस्थापित झाले.



सन २०२५ मधील दुसऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते करण्यात आले आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर मनोज शर्मा यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले. यावेळी जिल्हा न्यायाधीश आर.जे.कटारिया, जिल्हा न्यायाधीश वाय.ए.राणे, जिल्हा न्यायाधीश जे.जे.मोहिते,तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस.व्ही.केंद्रे, जिल्हा सहकारी वकिल प्रदिपसिंग रजपूत, सोलापूर वकिल संघाचे अध्यक्ष व्ही.पी.शिंदे सहाय्यक पोलिस आयुक्त सुधिर खिराडकर, जिल्हा न्यायालयाचे प्रभारी प्रबंधक मुकुंद ढोबळे, तसेच इत्तर न्यायधीश विधिज्ञ आणि पक्षकार उपस्थित होते.

या उद्घाटन सोहळ्याच्या वेळी सोलापूर महानगरपालिकेतील सहाय्यक मुख्य निरिक्षक करसंचलन अधिकारी युवराज गाडेकर, कर निरक्षक दिलीप देशमुख, कार्यालयीन अधिक्षक सुर्यकांत खसगे व बैंक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर चंद्रशेखर मंत्री बैंकेचे विधिज्ञ एस.एस.गायकवाड, व रिकव्हरी अधिकारी आदित्य गवळी व बैंक ऑफ महाराष्ट्राचे झोनल मॅनेजर संजिव कुमार व बैंकेचे विधिज्ञ श्रीमती व्ही.ए.कुलकर्णी यांनी केले आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दिवानी न्यायाधीश विरिष्ठ स्तर एम.के.कोठुळे यांनी केले.

सोलापूर जिल्हा न्यायालय तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील न्यायालयांमध्ये राष्ट्रीय अदालतीच्या माध्यमातून एकुण ४ हजार ९१६ प्रलंबित प्रकरणे दाखल केली व २२ हजार ४०४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या सर्व प्रकरणामधील तडजोड मुल्य १,४९,१८,६३,०१६ (एकशे एकोणपन्नास कोटी अठरा लाख त्रेसष्ठ हजार सोळा ) इतके राहिले. सदर राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सोलापूर जिल्हा येथील सर्व न्यायालयांमध्ये १५ वर्षे जुनी ०१, १० वर्षे जुनी ११, ५ वर्षे जुनी ९५१ अशी एकुण ९६३ जुनी प्रकरणे निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोक अदालतीच्या आयोजनापुर्वी दिनांक ५ मे २०२५ ते ९ मे २०२५ या कालावधीमध्ये मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. या विशेष मोहिमेमध्ये १५ वर्षे जुनी ९, १० वर्षे जुनी ४६, ५ वर्षे जुनी ५२७ अशी ४ हजार ८२ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### शहीद अशोक कामटे संघटनेच्यावतीने खा. मोहिते-पाटीलांना निवेदन

**सांगोला, दि. ११ मे-**

माढा लोकसभेचे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांना रेल्वेच्या विविध मागण्यांचे निवेदन सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने देण्यात आले. यावेळी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, बाबूराव गायकवाड, डी.एस.सावंत, निलकंठ शिंदे, प्रा.प्रसाद खडतरे, मकरंद पाटील, महेश नलवडे, अनिल तारळकर उपस्थित होते. निवेदनात गाडी क्रमांक ११०२७ आणि ११०२८ दादर-सातारा-दादर रेल्वे आठवड्यातून तीन दिवस सुरू असून प्रवाशांच्या मागणीनुसार ती दररोज सुरू करावी, सकाळ सत्रात कोल्हापूर-कलबुर्गी-कोल्हापूर रेल्वे, सांगली- मिरज-सोलापूर एक्सप्रेस या रेल्वे सेवा सुरू कराव्यात, सांगोल्यातील आर यु. बी. ३२ अ च्या प्रलंबित समस्या सोडवाव्यात या आग्रही मागण्याचे निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आले. लवकरच रेल्वे बोर्डात याबाबत सकारात्मक निर्णय होईल असे आश्वासन खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी संघटनेस दिले असल्याचे निलकंठ शिंदे यांनी सांगितले.



### गोमांस वाहतूकप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ११ मे-**

बुधवार ७ मे रोजी बजरंग दलातील गोरक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मोहोळ मार्गे सोलापुरात गोमांसाची छुप्या मार्गे तस्करी होणार असल्याची समजले. रात्रभर गोरक्षकांनी सापळा रचून सकाळी सहा वाजता सावळेश्वर येथे एक टवेरा क्रमांक एमएच १७ व्ही ६५५० हे वाहन संशयितरित्या गोरक्षकांच्या निदर्शनास आले. वाहनास थांबवण्याचा प्रयत्न केले असता वाहन चालकाने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. गोरक्षकांनी त्या वाहनाचा पाठलाग करून सोलापूर सिटी कंट्रोल व महाराष्ट्र स्टेट कंट्रोल यांना घटनेची माहिती दिली. त्यानुसार वाहनाच्या पाठलाग करत असलेल्या गोरक्षकांनी वाहन पोलिसांच्या मदतीने बाळे येथे ताब्यात घेतले. त्या वाहनाची पाहणी केली असता वाहनाच्या पाठीमागील बाजूस आतील सीट काढून मोठ्या प्रमाणात गोमांस झाकून ठेवल्याचे निदर्शनास आले. वाहन चालकाची चौकशी केली असता गोमांस माढा येथून सोलापुरात अलीम कुरेशी व इब्राहिम कुरेशी यांच्या सांगण्यावरून सोलापुरात घेऊन जात होतो, अशी माहिती दिली. त्वरित सदर वाहन हे पोलिसांनी फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे दाखल केले. या कारवाईत अबू बखार इम्रान शेख, खताळ सलीम म्हेत्रे, सद्दाम रफिक मुजावर, अलीम इब्राहिम कुरेशी व इब्राहिम कुरेशी सर्व राहणार अंन्सारी चौक शास्त्रीनगर सोलापूर या ५ जणांविरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई यशस्वी करण्यासाठी फौजदार चावडी पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अरविंद माने, बजरंग दल सोलापूर जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशी, सह जिल्हा गोरक्षा प्रमुख पवनकुमार कोमटी, सोशल मीडिया प्रमुख पवन बल्ला, गोरक्षक राकेश बिज्जरगी,अनिकेत गोरट्याल, गणेश बिज्जरगी, आदित्य चिप्पा, वीरेश मंचाळ, शुभम फलमारी यांनी परिश्रम घेतले.



### अणदूर येथे तुळजाई स्टोन क्रशरचे उद्घाटन

**अणदूर, दि. ११ मे-**

अणदूर येथील उद्योजक लक्ष्मण चौगुले यांनी उभ्या केलेल्या तुळजाई स्टोन क्रशरचे उद्घाटन सरपंच रामचंद्र आलूरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर तुळजाभवानी साखर कारखाना चेअरमन सुनील चव्हाण, माजी कृषी सभापती दिपक आलूरे, पोलीस तक्रार प्राधिकरण सदस्य उमाकांत मिटकर, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, एस. बी.आय.चे प्रवीण कडु, ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके, यश कन्स्ट्रक्शनचे मधुकर बंदपट्टे, ॲड. पांडुरंग शिवलिकर, साहेबराव घुगे, आयोजक माऊली चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. टीप्पर ड्रायव्हर ते खडी केंद्राचा मालक अशा कष्टमय जीवनाचा प्रवास केलेल्या लक्ष्मण चौगुले यांनी अणदूर चिवरी रोडवर २५ एकर जमीन घेऊन एस.बी.आय. अणदूर शाखेच्या सहकार्याने ५ कोटींचा तूळजाई स्टोन क्रशर चा प्लांट उभा केला असून त्यातून अनेक गरजू तरुणांना रोजगार मिळणार आहे, या वेळी बांधकाम कामगारांचा भेट वस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सुरुची भोजनासह, संगीत रजनीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी प्रसिद्ध कीर्तनकार इंदोरिकर महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते, संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संतोष पवार यांनी केले तर आभार उद्योजक लक्ष्मण चौगुले यांनी मानले. कार्यक्रमास बालाजी घुगे, दयानंद मुडके, आप्पू धमुरे, प्रशांत मिटकर, आविनाश मोकाशे, बाबू शेख, इमाम शेख, गोविंद शिंदे, दिपक घुगे, बबलू काळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मधुकर बंदपट्टे, कमलाकर घुगे, डॉ. हरिदास मुंडे, तीप्पना कबाडे, रखमाजी गायकवाड, संतोष नाईक, माणिक निर्मळे, यशवंत मोकाशे, राहुल घोडके, श्रीमंत राठोड, नागेश कुंभार, मुज्जु मकानदार, श्रीनाथ महानोरे यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खते द्या : आ. पाटील

### पंढरपुरात खरीप हंगाम पूर्व बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ मे-**

केंद्र व राज्याच्या योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी तालुका प्रशासन व कृषी विभागाने एकत्रितपणे काम करावे तसेच शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खत कसे उपलब्ध होईल याबाबत ही नियोजन करण्याच्या सूचना आमदार अभिजीत पाटील यांनी दिल्या.



आ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपुरात तालुकास्तरीय खरीप हंगामपुर्व नियोजन बैठक सिंहगड कॉलेज, कोर्टी, पंढरपूर येथे संपन्न झाली. खरीप हंगामाच्या पूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीला पंढरपूर कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, तहसीलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. आमदार पाटील म्हणाले की, आताचे युग हे आधुनिक तंत्रज्ञानाचे असून कृषीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी एआय तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण केव्हीके बारामती येथे घेण्याचे सांगितले. तसेच गावोगावी, वाडीवस्तीवर योजनाचे क्यूआर कोड बोर्ड लावावेत, जमीन सुपीकता बोर्ड लावण्याचे सांगितले. केंद्रातील योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी तालुका प्रशासन व कृषी विभागाने एकत्रितपणे काम करावे तसेच शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खत कसे उपलब्ध होईल याबाबत ही नियोजन करण्याच्या सूचना आमदार अभिजीत पाटील यांनी दिल्या. यावेळी ३१ वेगवेगळ्या मोहिमांची माहिती शेतकऱ्यांना देत तालुका कृषी अधिकारी सुर्यकांत मोरे यांनी खरीप हंगाम नियोजनाचे सादरीकरण केले. तसेच उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. यावेळी एमआरईजीएस फळबाग लागवड योजनेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या प्रगतशील शेतकरी धनराज खोत, आनंद ढवळे, सुहास यादव यांचा आ. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# सिकंदर शेख ठरला मंद्रूपचा पिर शेखसाहेब केसरीचा मानकरी

### डंकी डावावर विजय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

मंद्रूप येथील पीर शेखसाहेब सालार ऊरूस यात्रेनिमित्त आयोजित कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांनी हरीयाणाच्या विक्रांतकुमार याला डंकी डावावर चीत करून तीन लाखांचे बक्षीस पटकाविले. पीर शेखसाहेब सालार ऊरूस यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धे चे उद्घाटन कुस्तीगीर परीषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहीते पाटील व यात्रा कमिटीचे अध्यक्ष ॲड. राजेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तीन लाख ७५ हजारांची कुस्ती लावण्यात आली.



महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर, माजी सभापती दादा कोरे, गुरूसिद्ध म्हेत्रे, माजी सरपंच नजीर आवटे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष शब्बीर मुल्ला, बाबूलाल लिगेवान, माजी उपसरपंच रमेश नवले, सुरेश पाटील, चंद्रकांत देशमुख,नितिन टेळे, सुनिल टेळे, इब्राहीम मुल्ला, राजकुमार व्हनमाने, संतोष बरूरे, म्हाळप्पा नरूटे, श्रीमंत रूपनर, निसार तोबोळी, जावेद तोबोळी, विठ्ठल बंडगर, हुसेनशहा मकानदार, सलीम शेख, सिकंदर आवटे, रमेश वाघमोडे, अमीर शेख, मळसिद्ध टेळे, बाळू शेंडगे, मुबारक मोमीन, धानेश शेख, मदार शेख, बुडन शेख, दयानंद ख्याडे, राजकुमार हेसे आदि उपस्थीत होते.

खंडू वाघमोडे यांच्या स्मरणार्थ निखिल वाघमोडे यांच्याकडून विजेत्याला चांदीचा गदा देण्यात आला.तर सोने चांदीचे व्यापारी सतीश वेर्णेकर यांच्याकडून चांदीचा कडा देण्यात आला. माजी उपसरपंच रमेश नवले व पैलवान सुनिल टेळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# माळशिरस लोकअदालतमध्ये १,३५२ प्रकरणे निकाली

### १६ कोटी १३ लाख ७३ हजार १०४ रकमेची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ११ मे-**

येथील न्यायालयात राष्ट्रीय महा लोकअदालतमध्ये १३५२ प्रकरणे निकाली काढण्यात येऊन १६ कोटी १३ लाख ७३ हजार १०४ रकमेची वसुली करण्यात आली.



उच्च न्यायालय मुंबई, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरचे अध्यक्ष एस.एस. शर्मा व सचिव यू. पी. देवर्षी व रा.वी. ताम्हाणेकर अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती माळशिरस तथा जिल्हा न्यायाधीश १ माळशिरस यांच्या मार्गदर्शनाखाली व विधीज्ञ संघ माळशिरस यांच्या सहकार्याने १० मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महा लोकअदालतमध्ये १३५२ प्रकरणे निकाली काढण्यात येऊन १६ कोटी १३ लाख ७३ हजार १०४ रकमेची वसुली करण्यात आली.

महाअदालतीसाठी येथे सहा पॅनल तयार करण्यात आलेले होते. रा. वि.ताम्हाणेकर अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती माळशिरस तथा जिल्हा न्यायाधीश -१ हे पॅनल प्रमुख होते. सदर लोक अदालतीत ४७० प्रकरणे तडजोडी निकाली काढण्यात आली तसेच दाखल पूर्व बँक (पतसंस्था,नगरपरिषद, नगरपंचायत, ग्रामपंचायत) यांची व गुन्हा कबुलीची ८८२ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

लोक अदालत यशस्वी होण्यासाठी विधीज्ञ संघ माळशिरस व सर्व न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पिलीव येथे शैक्षणिक दाखले काढण्यासाठी विद्यार्थ्यांची लगबग

**तभा वृत्तसेवा,**
**पिली, दि. ११ मे-**

महाराष्ट्रात नुकताच बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन लवकरच दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर होणार आहे. निकालानंतर पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे काढणयासाठी सध्या विद्यार्थी व पालकांची महाईसेवा केंद्राकडे मोठी गर्दी दिसत आहे. जातीचे दाखले, उतपन्नाचा दाखला, नानक्रिमीलेअर, डोमासाईल अशी पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे काढताना विद्यार्थी व पालकांचा महाईसेवा केंद्राकडे मोठा ओढा सध्या दिसत आहे. सध्या गावा गावात महाईसेवा केंद्र व आपले सरकार सेवा केंद्र झाल्यामुळे शैक्षणिक दाखले काढणयासाठी माळशिरस तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची किंवा हेलपाटे मारणयाची गरज भासत नाही. गावात महाईसेवा केंद्र व आपले सरकार केंद्र झाल्यामुळे गावा गावातच दाखले काढणे शक्य झाले आहे. यामुळे विद्यार्थी व पालकांचा वेळ वाचतो तसेच पैसे सुद्धा वाचतात.

# मातृदिनानिमित्त आईंसाठी संगणक शिक्षण

### पंढरपुरातील आयआयटी कॉम्प्युटर्सच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ मे-**

मातृदिनाचे औचित्य साधून आयआयटी कॉम्प्युटर्स, पंढरपूर येथे एक आगळावेगळा आणि हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांच्या आईंसाठी खास संगणक शिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या आईला स्वतः शिकवण्याचा अभिमान आणि आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.



या उपक्रमात आयआयटी कॉम्प्युटर्सचे संचालक नितीन आसबे , दत्ता कळकुंबे, रोहिणी मांजरे , वैष्णवी पाटील यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात गुलाब पुष्प देऊन मातांचे स्वागत करून झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या आईला संगणक सुरू करणे, बंद करणे, टायपिंग करणे, ग्रेटिंग कार्ड तयार करणे, एक्सेलमध्ये निकाल बनवणे, पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन तयार करणे, आर्टिफिशियल इंटेलीजेन्सी मध्ये वर्डआर्ट एआयचा वापर करणे, तसेच 'ईरा' प्रणालीविषयी माहिती देणे आणि ती वापरण्याचे प्रशिक्षण दिले. मातांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याची उत्सुकता दिसून आली. पहिल्यांदाच संगणकासमोर बसलेल्या अनेक माता या अनुभवाने भारावून गेल्या. कार्यक्रमानंतर सर्वांना थंड पेय देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भावना बोलून दाखवत आईबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी रोहिणी मांजरे व नितीन आसबे यांनी आईचे महत्व अधोरेखित केले. उपस्थित मातांनी अशा उपक्रमांचे कौतुक केले. मातांनी आपल्या प्रतिक्रिया देताना आयआयटी कॉम्प्युटर्सचे मन:पूर्वक आभार मानले. आमच्याच लेकरांनी संगणक शिकवला, ही भावना शब्दांत सांगता येणार नाही, असे सांगताना त्यांचे डोळे पाणावले.

# उळेगावच्या 'त्या' पुलाचे काम गतीने

### वाहनधारकांतून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्रं ५२ चे चौपदरीकरणाचे काम करताना दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावचा जुना पूल तसाच ठेवल्याने या रस्त्यावर वारंवार अपघात होत होते. तत्कालिन प्रकल्प संचालकांच्या एका चुकीमुळे अनेक अपघात होवून काहीजण जखमी झाले तर अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. दरम्यान, आता नवीन प्रकल्प संचालक राकेश जावदे यांनी या पुलाचे पाडकाम गतीने करण्यास सुरूवात केल्याने उळेगावकर नागरिक आणि अनेक वाहनधारकांतून समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



उळे येथील त्या अरुंद पुलावर राष्ट्रीय राजमार्ग बनविल्यापासून महिना दोन महिन्याला अपघाताची मालिका सुरूच होती. त्या अरुंद पुलाकडे संबंधित अधिकाऱ्यांचे तसे दुर्लक्षच झाल्याने याचा त्रास मात्र अनेक वाहनचालकांना सहन करावा लागला आहे. नवीन वाहनचालकांना या अरुंद पुलावरून गाडी चालविताना पुलाचा अंदाज येत नसल्याने अपघात होत असत. यामुळे या अरूंद पुलाचे रूंदीकरण होणार की असेच घडणारे अपघात संबंधित अधिकारी बघतच राहणार? असा संतप्त सवाल वाहनचालक व स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात असे. यासाठी स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांनी लोकशाही मार्गाने आवाज उठविताच महामार्गाचे प्रकल्प संचालक राकेश जावदे यांनी दिल्ली येथील महामार्गाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करून या पुलाचे काम मंजूर करून आणले आहे. एकाच आठवड्यात या पुलाचे पाडकाम २५ टक्केच्याही पुढे गेल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, पावसाळ्याच्या तोंडावर याचे काम सुरू केल्याने पावसाळ्यापूर्वी या पुलाचा पाया आणि पिलर उभारणी करणे गरजेचे आहे. यामुळे काम गतीने चालू असल्याची माहिती मिळाली.

### ४ महिन्यांत नाविण्यपूर्ण पुलाची निर्मिती

उळेगाव येथील त्या अरूंद पुलावर वारंवार अपघात होत होते. यामुळे वाहनधारकांनीही नव्याने पूल उभारण्याची मागणी लावून धरली होती. यामुळे आम्ही उळेगाव येथील या अरूंद पुलाची नव्याने उभारणी करण्यासाठी आराखडा तयार करून आमच्या दिल्ली येथील वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला होता. त्यास मंजुरी आल्याने आता प्रत्यक्षात काम चालू केले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी हा पूल उभारण्यासाठी पायाभरणी व पिलर उभे केले जातील. यानंतर पावसाळ्यातही याचे काम चालूच राहणार आहे. किमान ३ ते ४ महिन्यात हा नाविण्यपूर्ण पूल उभारण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. साधारणत: या कामासाठी अंदाजे दीड कोटीपर्यंत खर्च होण्याची शक्यता आहे.

**- राकेश जावदे, महामार्ग प्रकल्प संचालक.**

# पंढरपुरात राष्ट्रीय लोकअदालतध्ये ८७७ प्रकरणे निकाली

### ७३ कोटी २५ लाख ६५ हजारांची तडजोड शुल्क वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ मे -**

तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांच्या वतीने जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे १० मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये एकुण ८७७ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये एकूण ७३ कोटी २५ लाख ६४ हजार ९०२ रुपयांची तडजोड शुल्क वसूल झाले तसेच ५ वर्षावरील जुनी ७९७ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आले असल्याची माहिती डी. एन. सुरवसे, अध्यक्ष, तालुका विधीसेवा समिती, पंढरपूर तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश, पंढरपूर यांनी दिली. या लोकअदालतीसाठी एकुण ७ पॅनलची व १ नियमित न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस. बी. देसाई, न्यायाधीश श्रीमती एस. एस. पाखले, ए. ए. खंडाळे, एन. एस. बुद्रुक, श्रीमती एस. एस. राऊळ, श्रीमती. के. जे. खोमणे, पी. पी. बागुल, श्रीमती पी. आर. पाटील यांनी काम पाहिले.

दरम्यान लोकअदालत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी डी. एन.सुरवसे तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश, तसेच श्रीमती एस. एस. पाखले, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर, ए. ए. खंडाळे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर व एन. एस. बुद्रुक, २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन संपन्न केली. या लोकअदालतीस विधीज्ञ, बैंक कर्मचारी, महावितरणचे अधिकारी, पक्षकार, न्यायालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते व त्यांचे सर्वांचे सहकार्याने सदरचे लोक-अदालत यशस्वीरित्या पार पाडण्यात आले आहे.





**बालपणीचा काळ सुखाचा**
सोशल मीडियाच्या काळात लहानगे सर्रास मोबाईल मधील विविध गेम्सच्या खेळात व्यस्त दिसतात. पण ग्रामीण भागात आजही मांडलेल्या कोयांच्या डावात रमलेली मुले हे चित्र सध्या दुर्मिळ होत चालले आहे. खर्डी (ता.पंढरपूर) येथे टिपलेले छायाचित्र.
**(छाया:-अमोल कुलकर्णी)**



## महत्वाचे...



### बार्शीच्या वृक्ष संवर्धन समितीला राज्यस्तरीय नेचर केअर पुरस्कार

**बार्शी, दि. ११ मे-**

नेचर केअर फर्टीलायझर यांच्यावतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय नेचर क्लियर पुरस्कार बार्शीच्या वृक्ष संवर्धन समितीला देण्यात आला. विटा (जि.सांगली) येथे संपन्न झालेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. वृक्ष संवर्धन समितीने आजपर्यंत केलेल्या वृक्ष लागवड आणि संवर्धन या कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. रुपये एकावन्न हजार आणि सन्म ानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप होते. या पुरस्कारासाठी राज्यभरातून ८० नामांकने आली होती. त्यातून वृक्ष संवर्धन समिती बार्शीची निवड करण्यात आली. या पुरस्कार वितरण सोहळ्याला सेंद्रिय शेती अभ्यासक कृषी भूषण राजेंद्र भट, सिने अभिनेत्री सायली संजीव, नेचर फर्टीलायझर चे अध्यक्ष जयंत बर्वे, कार्यकारी संचालक जयदेव बर्वे, संचालिका कामाक्षी बर्वे, पर्यावरण अभ्यासक आशिष वेले, पुरस्कार निवड समितीचे अरुण नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. वृक्ष संवर्धन समितीने गेल्या सहा वर्षापासून अविरतपणे सकाळी दोन तास श्रमदान करुन साधारण पंचवीस हजार झाडे लावून ती जगवली आहेत. विटा जिल्हा सांगली येथे झालेल्या या कार्यक्रमाला वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### भगवंताच्या कृपेने विजय थोरातांना भक्तीरचना निर्मितीचा प्रसाद : डॉ. जयवंत महाराज बोधले

**बार्शी, दि. ११ मे-**

भगवंताची विशेष कृपा असल्यानेच विजय थोरात यांना भक्तीरचना निर्मितीचा प्रसाद भगवंताकडून मिळाला आहे, असे प्रसंशोद्गार हभप. जयवंत बोधले महाराज यांनी काढले. भगवंत जन्मोत्सवाचे औचित्य साधून विजय थोरात कोरे रचित व स्वरबध्द 'भगवंत महात्म्य' व 'भगवंत आरती' या रचनांचे ध्वनी स्वरुपातील संग्रहाचे विमोचन व लोकार्पण हभप. बोधले महाराजांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. भगवंताचे महात्म्य बार्शी पुरतेच मर्यादित न राहता महाराष्ट्रभर पोहोचावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. ८ मे रोजी सायंकाळी भगवंत मंदिरात बोधले महाराजांचे प्रवचनापूर्वी हा सोहळा संपन्न झाला. भगवंत भक्त विजय थोरात कोरे यांनी ग्रामदैवत श्री भगवंतावर तयार केलेल्या १९ रचनांपैकी स्वरबध्द केलेल्या ११ भक्ती रचनांचा 'भगवंत भजनांजली' कार्यक्रम ५ मे रोजी सकाळी भगवंत मंदिरात संपन्न झाला. सूत्रसंचालन शितल कुलकर्णी यांनी केले. हार्मोनियम वादक अण्णा खारे, पखवाज वादक ऋषिकेश गोंदील व अभिजीत कदम हे साथीला होते. त्यांनी सादर केलेल्या भक्तीरचनांना उपस्थितांनी मनापासून दाद दिली. यावेळी श्री भगवंत देवस्थान पंच कमिटी अध्यक्ष दादासाहेब बुडुख, अमृत राऊत, सचिन वायकुळे, माऊली उद्योग समूहाचे आनंद राऊत व त्यांच्या मातोश्री, योगदान सेवा महिला समिती, मानवता संयुक्त संघ, भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बार्शी तालुका अध्यक्ष संगीता पवार, मिटे, लूमसे, बांगर, बागल, डीडवळ, सौदागर, शिवाजी गायकवाड, गुरुदत्त कुलकर्णी उपस्थित होते.

### विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे बुधवारी उद्घाटन

**सोलापूर, दि. ११ मे-**

स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुपुत्र स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्रास सुरवात होणार आहे. याचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात १४ मे रोजी सकाळी ११ वाजता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विधान परिषद सदस्य आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, कुलगुरू प्रा डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्र कुलसचिव अतुल लकडे हे उपस्थित राहणार असल्याची माहिती अध्यासन केंद्राचे अध्यक्ष व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड यांनी दिली. यावेळी या कार्यक्रमात शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू तसेच आंतरराष्ट्रीय व खेलो इंडिया पदक प्राप्त व प्रशिक्षक, राज्यस्तरीय पोर्ट्रेट वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण होणार आहे. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ विकास पाटील, डॉ शिवाजी शिंदे, प्रा नेताजी कोकाटे, प्रा विकास शिंदे, प्रा विष्णू वाघमारे, प्रा चंद्रकांत चव्हाण, प्रा सज्जन पवार, प्रा अरुण सोनकांबळे प्रा राजेंद्र गायकवाड आदी परिश्रम घेत आहेत.

**सत्कारमूर्ती असे :** पारस सुरेश गायकवाड, वैष्णवी राम गायकवाड (एमपीएससी परीक्षेतील यशस्वी), आदित्य अनिल गिराम (शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त), दीपक चिकणे (आंतरराष्ट्रीय आर्चरी प्रशिक्षक)श्रुती आनंद चव्हाण (खेलो इंडिया पदक प्राप्त), ववेक मिस्कीन (लाठी काठी दांडपट्टा प्रशिक्षक), पवन भोसले (खेलो इंडिया महाराष्ट्र तलवारबाजी प्रशिक्षक).

# जिल्ह्यात २६ गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा

## मागेल त्या गावांना मिळणार टँकर; उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ११ मे-**



गतवर्षी जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने फेब्रुवारीम ध्येच दुष्काळी नियोजन आराखडा तयार केला होता आणि १३७ गावे, ९१२ वस्त्यांवर राहणाऱ्या ४ लाख लोकांसाठी तब्बल १६७ पाण्याचे टँकर एप्रिलपासून चालू केले होते. या टँकरची २५० च्या जवळपास संख्या गेली होती. यंदा जिल्ह्यात मुबलक पाणीसाठा असल्याने एप्रिल-मे महिन्यातच काही गावात पाणीटँकर चालू करावी लागली. दरम्यान, सध्या जिल्ह्यातील २६ गावात ३२ टँकरने पाणीपुरवठा सुरू असून, मागेल त्या गावांना टँकर देणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोषकुमार देशमुख यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. ११) दिली.

यंदा जिल्ह्यात पाणी टँकरची मागणी कमीच असली तरी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ४० कोटी १६ लाख १२ हजार रूपयांचा पाणी टंचाई कृती आराखडा तयार करून विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविला होता; त्यांच्या मंजुरीनंतर तो पाणी टंचाई आराखडा शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, सध्या माळशिरस तालुक्यात १४ गावांना पाणीटँकर सुरू केले आहे. तर मंगळवेढा ५, दक्षिण सोलापूर ५, अक्कलकोट ३, उत्तर सोलापूर ४ आणि सांगोला १ असे पाणीटँकरचे नियोजन केले आहे. दरम्यान, मागेल त्या गावाला पाणी टँकर मिळेल मात्र त्याचे निकष पाहूनच पाणी टँकर देण्यात येणार असल्याची माहितीही देशमुख यांनी दिली.

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहे ऑक्टोबर २०२४ ते जून २०२५ अखेर पाठविलेल्या पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये आवश्यक खर्च २१ कोटी ४३ लाख ७१ हजार इतका अपेक्षित आहे. यामध्ये प्रस्तावित योजनांची संख्या ११३५, प्रस्तावित गावे ६८० आणि १९३३ वाड्यांचा समावेश आहे. तर उपसा सिंचन योजनेची वीज देयके देणेकरिता २ कोटी रू., प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची वीज देयके थकबाकी देणेकरिता र. रूपये १०६१.०५, व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची टंचाई कालावधीतील वीज देयके देणेकरिता ६११.३६ लाख असा १८ कोटी ७२ लाख ४१ हजार इतका निधी गृहित धरण्यात आला आहे. एकंदरीत, पाणी टंचाई कृती आराखड्यातील आवश्यक खर्च २१ कोटी ४३ लाख ७१ हजार आणि वीज देयके थकबाकी देणेकरिता १८ कोटी ७२ लाख ४१ हजार असा एकूण ४० कोटी १६ लाख १२ हजाराचा पाणी टंचाई आराखडा यंदा तयार केला आहे. यंदा मात्र एप्रिलपासूनच पाणीटँकर सुरू झाले असून, सध्या अवघे ३२ टँकर सुरू केले आहेत. या चालू वर्षात सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा अन् जनावरांच्या चाऱ्याचा आजतागायत त्रास झाला नाही. पाणी टँकर चालू करण्यासाठी तहसीलदार, प्रांताधिकारी यांना अधिकार दिले असून, त्यांच्या अहवालानंतर आम्ही पाणीटँकरला मंजुरी देतो.

### पाणी टंचाईसाठी सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांचे मायक्रोप्लॅनिंग

सध्या जवळपास सर्वच तालुक्यांना भरपूर पाणी आहे. ज्या गावातील मोठे साठवण तलाव, शासनाच्या सार्व. विहिरी, अधिगृहण करावयाच्या विहिरी, गावातील बोअर्सना पाणी नसेल तरच पाणीटँकर देण्यात येते. पाणीटँकर सुरू करण्यापूर्वी शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांकडून सर्व पाणीस्त्रोतांची चौकशीही होते आणि नंतरच त्या गावाला पाणीटँकरने पाणीपुरवठा सुरू होतो. एकंदरीत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पाणी टंचाईसाठीसुध्दा मायक्रोप्लॅनिंग केला असल्याने शासनाचे पैसेही मोठ्या प्रमाणावर वाचणार आहेत.

### 'या' गावांना टँकर

माळशिरस: गारवाड, मगरवाडी, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, लोणंद, लोंढेमोहितेवाडी, कोथळे, शिवारवस्ती, निटवेवाडी, पळसमंडळ, भांब, फडतरी, कदमवाडी आदी गावात प्रत्येकी १ म्हणजे १४ पाणीटँकर सुरू केले आहेत. मंगळवेढा तालुक्यातील येड्राव १, लक्ष्मीदहिवडी २, आंधळगाव २ असे ५ पाणीटँकर सुरू आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डी १, कणबस १, इंगळगी १, बंकलगी २ अशी ५ टँकर सुरू आहेत. अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे २, वसंतराव नाईकनगर १ अशी ३ टँकर सुरू आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यात रानमसले २, पडसाळी २ अशी ४ टँकर आणि सांगोला तालुक्यातील राजापूर या गावात १ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.





# श्री भगवंताच्या उत्सवमूर्तीची शोभायात्रा

## शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत; टाळ, मृदंगाच्या गजरात दिंडींची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मे-**



सनई चौघड्याचे मंजूळ स्वर.. टाळ, मृदंग व म्युझिकल बॅण्ड पथकांच्या वाद्यांच्या गजरात श्री भगवंताच्या उत्सवमूर्तीची शोभायात्रा, दिंडी बार्शी शहराच्या प्रमुख मार्गावरुन उत्साहात काढण्यात आली. यावेळी बार्शीकरांनी मोठया भक्तीभावाने दर्शन घेतले. शोभायात्रेत यंदा प्रथमच सोंगे सादर करण्यात आली. नऊ बैलगाड्यातील सोंगे यंदाच्या शोभायात्रेचे विशेष आकर्षण ठरले.

शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता डॉ.जयवंत बोधले महाराज व माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी श्री भगवंताच्या उत्सवमूर्तीचे पूजन केले. यावेळी बडवे मंडळी, ट्रस्टी व भगवंत भक्त उपस्थित होते. माजी आमदार राजेंद्र राऊत व भगवंत देवस्थान समितीचे अध्यक्ष व ट्रस्टी, भगवंत महोत्सव समितीचे पदाधिकारी यांनी उत्सवम ूर्ती मंदिराबाहेर रथात आणली. त्यानंतर श्रींच्या उत्सवमूर्तीच्या नगरप्रदक्षिणेस सुरुवात झाली.

शोभायात्रेत अग्रभागी सनई चौघडा, त्यापाठोपाठ तालुक्यातील भजनी मंडळे, डोक्यावर तुळस घेऊन महिला भाविक सहभागी झाल्या होत्या. शोभायात्रेत तेरच्या वैराग्य महामेरु मुला-मुलींच्या वारकरी शिक्षण संस्थेतील एकाच पेहरावातील सुमारे ८० बालवारकरी भगवा झेंडा घेऊन टाळ-मृदंगाच्या गजरात तल्लीन होवून नाचत होते. सौंदरे येथील नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेतील बालवारकरीही दिंडीत सहभागी झाले होते. बार्शीकरांनी उत्साहात शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत केले.

माजी आमदार राजेंद्र राऊत,जयवंत बोधले महाराज हे स्वत: शोभायात्रेत प्रारंभापासून समारोपापर्यंत सहभागी झाले होते. यावेळी भगवंत देवस्थानचे ट्रस्टी, भगवंत बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारीही उपस्थित होते.

# जिल्ह्यातील केळी पिकाला तापमान वाढीचा फटका

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.११ मे-**



सध्या उन्हाळ्यातील तापमान वाढीचा फटका जिल्ह्यातील केळी पिकांना बसत असून काढणीला आलेली केळी वाढलेले तापमान व उन्हाळ्यातील गरम हावेच्या परिणामामुळे बागेतील केळीची झाडे मध्येच पिचकून पडत असल्याने शेतकऱ्यांचे त्यांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच नवीन केळी लागवड केलेल्या अनेक शेतकऱ्यांनी केळीला उन्हापासून वाचण्यासाठी क्रॉप कव्हर चा वापर केल्यामुळे त्याची तीव्रता काहीशी कमी जाणवत आहे.

जिल्ह्यामधील अनुकूल वातावरण गेल्या तीन चार वर्षांपासून केलेला मिळणारा चांगला दर अनेक शेतकरी केळी पिकाकडे वळताना दिसतात प्रत्येक वर्षी वर्षी केळीच्या लागवडीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे मात्र उन्हाळ्यातील तापमान वाढीचा फटका केळी पिकांना बसू लागला असून यावर्षी सोलापूर जिल्ह्यातील तापमान ४४ अंशाच्या पुढे गेल्याने या तापम ानाचा परिणाम केळी पिकावर दिसू लागला आहे. यामध्ये केळीचे झाडे मधूनच पिचकून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. याचा मोठा फटका केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसत असून यामुळे केळीच्या उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर घट निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या क्रॉप कव्हरचा वापर करून उन्हाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न अनेक शेतकरी करताना दिसत आहेत.

> यावर्षी वाढलेल्या उन्हांची तिव्रता केळीच्या झाडाला सहन होत नाही. काढण्या योग्य झालेली केळीची झाडे अर्ध्यातून पिचकून पडण्याचे परिणाम प्रमाण वाढत आहे . लहान केळीच्या रोपांना क्रॉप कव्हर वापरून कोणाची तीव्रता कमी करता येऊ शकते परंतु मोठ्या झालेल्या बागेमधील झाडे पिचकून पडत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.
>
> **- नानासाहेब साळूंके (केळी उत्पादक शेतकरी शेटफळ)**

# मराठा सेवा संघाची भूमिका सर्व चळवळींमध्ये समन्वय ठेवण्याची

## डॉ. दिलीप चौधरी; मराठा सेवा संघ अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ११ मे-**





समन्वयाच्या अभावामुळे चळवळीमध्ये फूट पाडण्याचे काम केले जाते. परिवर्तनाची ताकत ही संघटित ताकत आहे. सर्वच बहुजन चळवळींनी एकत्र येण्याची गरज आहे. या सर्व चळवळींमध्ये समन्वय ठेवण्याची मराठा सेवा संघाची भूमिका असल्याचे मत चंद्रपूरचे डॉ. दिलीप चौधरी यांनी व्यक्त केले.

स्मृतीभवन शंकरनगर अकलूज येथे मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित केलेल्या म हाअधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या सत्रात बहुजन चळवळींचा समन्वय, आवश्यकता आणि कृती कार्यक्रम या विषयावर ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी अमरावतीचे अरविंद गावंडे, मौलाना आझाद वि.म प्रदेश उपाध्यक्ष हसीब नदाफ, जो.शा.बा.संघटना अध्यक्ष युवराज पवार, बुद्धिस्ट जिल्हाध्यक्ष तुकाराम बनसोडे यांनीही या चर्चासत्रात सहभाग घेतला.

यावेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर, प्रदेशाध्यक्ष डॉ. विजय घोगरे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, अर्जुन तनपुरे, राज्य उपाध्यक्ष अरविंद गवंडे मधुकर मेहकरे,प्रा. आरती पवार यांचे सह राज्यातून आलेले सेवा संघाचे पदाधिकारी, प्रमुख, मान्यवर म ोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना दिलीप चौधरी म्हणाले, जाती जातीत फूट पाडण्यासाठी शेजारील राष्ट्राने हल्ले केले. परंतु आपला देश एकसंघ राहिला, हे सर्वांचे यश आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचेपासून महात्मा गांधी पर्यंत सर्वांनीच बहुजनांना एकत्र करून चळवळी उभारल्या. व त्यात यश प्राप्त केल्याचे दिसते. चळवळी केवळ भावनिक होऊन नव्हे तर व्यवहारिक पद्धतीने चालवल्या पाहिजेत. तुमचे आमचे ध्येय हे मानवी उन्नतीसाठी असेल तर यामध्ये समन्वय ठेवणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान व संसाधने हे कधीच समाजाच्या विनाशासाठी नसतात. परंतु त्याचा वापर योग्य ठिकाणी व योग्य गोष्टीसाठी झाला पाहिजे. आजही बहुजनांना संघर्ष का करावा लागतो, यावर विचारमंथन व्हायला पाहिजे असेही दिलीप चौधरी म्हणाले. आंतरराष्ट्रीय घडाम ोडी आणि मराठा सेवा संघ या विषयावर संघाचे संस्थापक सचिव निर्मलकुमार देशमुख यांनी परदेशात असणाऱ्या विविध विभागातील संधीचे विश्लेषण केले. शेती, औद्योगीकरण, पर्यटन, आधुनिक तंत्रज्ञान यामध्ये कोणत्या देशात कशी संधी उपलब्ध आहे याचे स्पष्टीकरण केले. तरुणांनी अभ्यास करून या संधीचे सोने करण्याचे आवाहनही त्यांनी केले. विविध क्षेत्रातील माहिती हीच मोठी ताकद आहे. त्यांनी विविध देशातील भौगोलिक, सामाजीक, विविध तंत्रज्ञानातील क्रांती व मनुष्यबळाची कमतरता यावर सविस्तर भाष्य केले.

या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी असणारे नागपूरचे डॉ. नंदकुमार राऊत म्हणाले, आपल्या तरुणांनी देशाबरोबर परदेशात ही कार्यरत राहावे. भगवानराव वाघोले यांनी आपला कार्य व शेतीतील संधी स्पष्ट केली. यावेळी प्रदीप एकतपुरे उपस्थित होते. इतिहासाचार्य मा.म. देशमुख बहुजन इतिहास व प्रबोधनाचे अध्वर्यू या विषयावर प्रा. प्रेमकुमार बोके यांनी विचार व्यक्त केले. यावेळी अध्यक्षस्थानी मधुकरराव मेहकरे होते. प्रा विद्या पंडित कॉ. शरद पाटील यांची इतिहास मीमांसा आणि मार्क्स, फुले, आंबेडकरवाद या विषयावर प्रदेश कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे व कॉ. किशोर ढमाले यांनी विचार व्यक्त केले. सकाळच्या सत्रात सूर्यो दयाच्या कविता या कवी संमेलनात कविंनी सहभाग नोंदवला.